
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. ७४५९



# आमचे नेते

★ ★ ★
★ ★
★
★

With the compliments of
the Director of Publicity,
Government of Maharashtra
Sachivalaya, Bombay 32.

REFBK-0011648

लेखक

रमणलाल शहा

# आमचे नेते

क्र. ११२६८

लेखक

रमणलाल शहा

REFBK-0011648

आवृत्ति १ ली ] मूल्य : रु. १·२५ न.पैसे [ पुनर्मुद्रण ऑगस्ट १९६१

प्रकाशक :
चिंतामण अनंत कुबेर,
दहिवडी, ता. माण,
जिल्हा सातारा.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुद्रक :
अ. कृ. कुलकर्णी,
आनंद प्रिंटिंग प्रेस
सातारा प्रायव्हेट लिमिटेड,
१८२, सोमवार पेठ, सातारा.

प्रिय सुहृद,

श्री. चंद्रहार पाटील,

ज्यांच्या गोड सहवासामुळे

जीवन सुसह्य झालें,

यांना

# प्रेमपूर्वक अर्पण

– रमणलाल शहा.

# चार शब्द–

यशवंतरावाचे विचार लोकांना सांगावेसें मला कां वाटलें? त्यांच्याबद्दल मी लिहिण्यास कां प्रवृत्त झालों? ते मुख्यमंत्री आहेत म्हणून? नजीकच्या काळांत भारताचें नेतृत्व करतील म्हणून? छे! मुख्यमंत्री या पदापेक्षा त्यांच्यामध्ये आकर्षून घेणाऱ्या इतरहि गोष्टी आहेत. त्यांनी माझें मन आकर्षित करून घेतलें आहे.

इतिहासाच्या अध्ययनाची, दैनंदिन घडामोडी जाणण्याची, घटनेच्या कार्यकारणभावाची संगत लावावयाची, उद्यां काय होईल, राजकारणाला कसें वळण लागेल यांचे अंदाज बांधण्याची अगदी समजूं लागल्यापासून जात्या आवड! संयुक्त महाराष्ट्राचें आंदोलन सुरू झालें. यशवंतरावांच्या विचारांवर टीका होऊं लागली. राजकीय जीवनांतून हद्दपार करण्याचे जणूं प्रयत्न सुरू झाले. त्यामुळे मन विषण्ण झालें. कोणतेंहि सत्य हें एका सिद्धांतांत सामावलेलें नसतें. एखाद्या चांगल्या, सर्वमान्य झालेल्या प्रश्नालाहि दुसरी बाजू असण्याचा संभव असतो; एखादी बाजू उपेक्षित झाली असल्याची शक्यता असते; एखादें अंग दुर्लक्षित झालें असल्याचेंहि शक्य असतें; जगांत अंतिम सत्य म्हणून गोष्ट असूं शकत नाही. तेव्हा मी म्हणतों तेंच चिरंतन व शाश्वत सत्य असा कोणी आग्रह धरूं शकत नाही. निदान लोकशाहीच्या विचारांत हें बसत नाही. पण कांही बुद्धि–वाद्यांनी मात्र उलट बुद्धिभेद केला. आम्हीं म्हणतों तेंच सत्य! आम्हींच तेवढे देशप्रेमी!! आम्हींच खरें शिवाजीचे अनुयायी! आम्हींच खरें महाराष्ट्राच्या हाडामासाचें सुपुत्र! एखादा सामान्य माणूस ज्या गोष्टी बोलावयास व लिहावयास कचरेल अशा गोष्टींचा उच्चार चांगल्या समजल्या गेलेल्या लोकांच्याकडून झाला.

यशवंतरावांवर टीकेचा भडिमार झाला, पण ते निश्चयाने व धीराने चालले होते. लोकांच्या टीकेच्या झंझावातांत त्यांचा दिवा विझत होता. ते परत दिवा लावीत होते. कांही सहकारी सोडून गेले, कांही मागे राहिले. रस्ता अडचणीचा व जिकीरीचा होता, परंतु यशवंतराव पुढेच चालले होते! पुढेच चालले होते!! त्यांच्या बोलण्यांत, वागण्यांत निश्चिती दिसूं लागली, वेग दिसूं लागला, बोलण्यांत द्रष्टेपण दिसूं लागलें. तेव्हापासून त्यांच्याकडे मन ओढ घेऊं लागलें. माझा जीवनाकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन आहे.

मनुष्य यशस्वी किंवा अयशस्वी होतो याला विशेष महत्त्व नाही. तो जीवनांत आपल्या सहकाऱ्यांशीं कसा वागतो, त्याचें उद्दिष्ट कोणतें आहे, तो कोणत्या मार्गानें जात आहे, संकटाच्या, आनंदाच्यावेळीं त्याचें वर्तन कसें असतें, टीकेच्या व स्तुतीच्यावेळीं त्याच्यांत कोणता फरक पडतो, जीवनांत वेगवेगळ्या परिस्थितींत तो कसें वागतो, वेगवेगळ्या घटनांचा, त्याच्यावर कोणता परिणाम होतो इत्यादि गोष्टी माझें मन आकर्षित करून घेतात.

अलीकडे ते कॉंग्रेसचे खजिनदार झाले, वर्किंग कमेटीवर त्यांची निवड झाली; परदेशांतील बातमीपत्रें त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा करूं लागले. प्रत्येक क्षेत्रांत त्याना यश मिळालें. त्यांच्याबद्दल डोक्यांत खूप विचार असावयाचे. बऱ्याच वेळीं मनामध्ये विचारांची खूप गर्दी व्हावयाची शेवटीं विचारांना शब्दांचा आकार द्यावयाचें ठरलें मूळ कल्पना १२ मार्चच्या दिवशी हें चरित्र प्रकाशित करावें अशी होती. परंतु बऱ्याचशा मित्रांच्या आग्रहास्तव २३ जानेवारीलाच करावें असें ठरलें आणि हें ठरलें ६ जानेवारीला ! ६ दिवसाच्या अवधींत आणि तेहि व्यावसायिक व्याप संभाळून भराभर सुचतील तसे विचार लिहून काढले. श्री. अनंतराव कुलकर्णी ह्यांनी हें काम आपलेंच समजलें म्हणूनच ही पुस्तिका अल्पावधिमध्ये छापून झाली. तेव्हा त्यांचें कितीहि आभार मानलें तरी तें कमीच ! श्री. चिंतोपंत कुबेर यांनी अल्पावधिमध्यें प्रस्तावना लिहून दिली. त्यांचें कसें आभार मानू ? वास्तविक या पुनर्मुद्रणाच्यावेळीं महाराष्ट्राचे शिक्षणमंत्रि व ना. यशवंतरावांचे एक सहकारी ना. बाळासाहेब देसाई यांची प्रस्तावना घ्यावयाची होती परंतु वेळेअभावी ते जमू शकले नाही.

अर्थात् प्रेरणा देण्याचें काम श्री. चंद्रहार पाटील यांचें. आजपर्यंत त्यांनी व मी एकेठिकाणीं बसून नेहमी वैचारिक मंथन केलें. प्रत्येक विचार तावूनसुलाखून व पारखून घेतला. त्यांचें आभार मी मानीत नाही. त्यांनाहि आभार मानलेलें आवडणार नाही. त्याचप्रमाणे सुरवातीला ही कल्पना प्रेमळ पत्नीला सांगितल्यावर तिनें एकसारखें कार्यप्रवृत्त केलें हें मी विसरूं शकत नाही. वास्तविक अत्यंत घाईनें हें सारें लिहिलें असल्याने थोड्या सचिततेने व कांही आशेनें हें सर्वांच्यापुढे ठेवीत आहे.

१२-१-१९६१ रमणलाल शहा, खटाव

# प्रस्तावना–

श्री. रमणलाल शहा यांनी ना. यशवंतराव चव्हाण यांचें चरित्र लिहून फार मोठी कामगिरी केली आहे. यापूर्वी ना. चव्हाणांचे चरित्राचा एक ग्रंथ प्रकाशित झाला आहे. परंतु श्री. शहा यांनी लिहिलेल्या या पुस्तिकेला एक निराळंच महत्त्व आहे. त्या दृष्टीने लेखन क्षेत्रांतील हा त्यांचा प्रयत्न निश्चित कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे.

ना. यशवंतराव चव्हाणांचें चरित्र लिहावयाचें ही कांही सामान्य गोष्ट नाही. तसेंच अशा थोरामोठ्यांच्या चरित्रास प्रस्तावना लिहावयाची तीहि त्याच तोलाच्या व्यक्तीची असावी अशी सामान्यत: प्रथा आहे. परंतु त्यांच्या कार्याचें विश्लेषण व समालोचन करण्याचा हा एक नवीन प्रयत्न श्री. रमणलाल शहा यांनी केला आहे. कारण त्यांतून महाराष्ट्रांतील सुबुद्ध सुशिक्षित व तरुण मंडळींच्या मनांत यशवंतरावांच्या विषयीं काय कल्पना आहेत, कोणत्या अपेक्षा आहेत याचें दर्शन व्हावें. त्याचप्रमाणे दुसऱ्या कोणाच्या मनांत असलेला संकोच दूर होऊन त्यांनी धडाडीने व आत्म-विश्वासाने अशा प्रकारच्या साहित्य निर्मितींत पुढे यावें.

श्री. शहा यांनी पुस्तिकेची मांडणी अत्यंत अभिनव पद्धतीने व आकर्षक केली आहे. लिखाणांतून त्यांच्या भाषाप्रभुत्वाची, कार्यकारण-भावाची संगति लावण्याच्या त्यांच्या पद्धतीची कल्पना येते. सर्वसाधारणपणे ना. चव्हाणांच्या जीवनांतील ठळक गोष्टी सांगून त्याचे विचार, कार्यपद्धति, आठ दहा वर्षांतील त्यांची कर्तबगारी याचें मार्मिक व सुगम विवेचन केलें आहे. पुस्तिका लिहावयास मिळालेला सहा दिवसांचा अवधि पाहून तर त्यांच्या लेखन कौशल्याची अधिकच साक्ष पटते.

ना. चव्हाण हे दोन तपें राजकारणांत आहेत. बेचाळीसच्या लढ्यांत त्यांचा फार मोठा भाग होता. परंतु प्रत्यक्ष इतर व्यक्तींचा त्यामानाने खूपच बोलबाला झाला. तथापि त्यांनी अप्रसिद्ध राहून संघटनेंत काम केलें व वेळ आली तेव्हा परिस्थितीने दिलेलें आव्हान स्वीकारून त्यांनी स्वत:च्या अंगचें कर्तृत्व दाखविलें यांतच त्यांच्या मोठेपणाचें सार सामाविलें आहे.

द्विभाषिकाचे मुख्यमंत्रिपद हें परिस्थितीचें आव्हान होतें व संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति ही त्यांच्या मुत्सद्देगिरीची साक्ष आहे. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या अगोदरचा काळ त्यांच्या कसोटीचा होता. एकीकडे संसदेचा निर्णय व एकीकडे जनतेची मागणी ह्या पेचांतून संसदेचा निर्णय राबविण्याचा ना. चव्हाण यांनी घेतलेला निर्णय हा लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत योग्य होता. असें आम्हां सर्वांना वाटत होतें; व त्याकाळापासूनच त्या निर्भय व दूरदृष्टीच्या निर्णयामुळे आम्ही त्यांच्या नेतृत्वाकडे आकर्षित झालों. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत असा एक क्षण होता कीं महाराष्ट्रांतील कॉंग्रेस संघटना भावनेच्या भरांत नामशेष होणार काय अशी भीति उत्पन्न झाली होती. द्विभाषिकाच्या मुख्यमंत्रिपदाचा काटेरी मुकुट स्वीकारणें म्हणजे एक कसोटी होती. परंतु चव्हाणांसारखा दूरदृष्टीचा विचारी, संयमी नेता ऐनवेळीं उभा राहिला व सर्व विरोध स्वीकारून आव्हानाचा स्वीकार केला.

आज भारतांमध्ये कॉंग्रेसपक्ष हा सर्व राजकीय पक्षांमध्ये बलिष्ठ, कार्यक्षम व मोठा असा राजकीय पक्ष आहे. परंतु या सर्वांपेक्षा भारतांमध्ये लोकशाही नांदली पाहिजे, वाढली पाहिजे हा कॉंग्रेस पक्षाचा प्रयत्न आम्हांला जास्त मोलाचा वाटतो. आणि त्या दृष्टीने जेव्हा यशवंतराव म्हणतात की, "मी परमेश्वराजवळ कांही मागावयाचें झालें तर कॉंग्रेस कायम जगावी हें मागणार नाही. तर भारतांत हजारों वर्षांनंतर जें लोकांचें राज्य निर्माण झालें आहे, तें कायम जगावें हें मागणें मागतों." आणि जेव्हा यशवंतराव असें बोलूं लागतात तेव्हा आमचीं मनें त्यांच्या वाणींतून प्रकट होत आहेत असें वाटतें. त्यांच्यांतील व आमच्यांतील हा सुसंवाद जेव्हा अनुभवास येतो तेव्हा आनंदाचें भरतें येतें व अशा नेत्यावरील श्रद्धा जास्तच गाढ होते.

हा प्रयत्न म्हणजे ना. यशवंतराव चव्हाणांच्या जीवनाची रूढ अर्थाने माहिती देणारें पुस्तक नव्हे. ह्यामध्ये फक्त त्यांच्या जीवनाच्या व्यक्तित्वाच्या विकासाला चालना देणाऱ्या घटनांचा व प्रसंगांचा उल्लेख आहे. रूढ अर्थाने त्यांचें चरित्र लिहिण्याचा श्री. शहा यांचा मानसहि नाही.

कारण ना. यशवंतरावांना आम्ही एक विचार म्हणून मानतो. व त्यांचे विचार सर्वसाधारण जनतेपर्यंत पोहोचविणें ही आम्ही आमची जबाबदारी मानतों. त्यादृष्टीने श्री. रमणलाल शहा यांनी हा प्रयत्न केला आहे व तो पुष्कळ अंशीं सफल झाला आहे.

श्री. रमणलाल शहा यांनी ना. चव्हाणांच्या जीवनांवर जी पुस्तिका लिहिली आहे त्याला प्रस्तावना लिहावी अशी माझी योग्यता नाही, तो माझा अधिकारच नाही. कारण चरित्र साध्या व्यक्तीचें नाही. तसें पाहिलें तर अशा पुस्तकांस प्रस्तावनेची गरज नाही परंतु कांही प्रथा असतात व आपण त्या पाळतों इतकेंच !

विशेष म्हणजे ह्या पुस्तिकेची निर्मिति श्री. चंद्रहार पाटील, श्री. रमणलाल शहा व मी या आम्हां सर्वांच्या गेल्या तीन चार वर्षांतील राजकारणांवरील चर्चेचा परिपाक आहे व त्या दृष्टीने आमच्या सामुदायिक चर्चेंतून, चिकित्सिकेंतून निर्माण झालेली ही पुस्तिका आहे. तेव्हा मी प्रस्तावना लिहिण्याचें धाडस केल्यास तें कांही फारसें औचित्यास सोडून होणार नाही असें वाटतें.

त्यांच्या नेतृत्वाचा, विचारांचा, मार्गदर्शनाचा लाभ अखंड मिळो हीच प्रार्थना !

दहिवडी (ता. माण)
१२-१-१९६१

चिंतामण अनंत कुबेर

(library stamp, illegible)



नामदार श्री. यशवन्तरावजी चव्हाण

११२४८

"ज्याला आयुष्यांत काय काम करावयाचे हें कळलें आहे तो खरा भाग्यवान्......"

आज जवळ जवळ ह्या गोष्टीला तीस बत्तीस वर्षें झालीं. इंग्रजी चौथ्या इयत्तेचा वर्ग. नुकतीच प्राथमिक शाळेंतून दुय्यम शाळेंत मुलें आलीं. नवीन विचारांचें बीजारोपण नुकतेंच सुरूं होऊं लागलें. आकांक्षाचे, आशेचे, महत्त्वाकांक्षेचे अंकुर नुकतेच फुटूं लागले. इंग्रजी शब्द उच्चारतांच आपण खरोखरीच कोणीतरी मोठे होणार असें त्या कुमारांना वाटूं लागलें.

शिक्षक जिज्ञासेने प्रत्येकाला, "तूं कोण होणार, रे," असें विचारीत होते. पहिला, "मी लो. टिळक होणार" असें म्हणाला दुसरा "मी कवी यशवंत होणार" असें उत्तरला. तिसरा "मी क्रिकेटीयर होणार" असें स्वप्न बोलला. चौथ्या विद्यार्थ्याची पाळी आली. त्या विद्यार्थ्याच्या डोळ्यांत चमक दिसत होती. डोळे बाणेदार दिसत होते. तो तरतरीत व तडफदार विद्यार्थि उद्गारला ! "मी यशवंतराव होणार."

किती सार्थ आणि महत्त्वपूर्ण उद्‌गार ! आत्मप्रत्ययाचा व आत्मविश्वासाचा साक्षात्कार इतक्या लहानपणीं, इतक्या बाल-वयांत झालेला पाहून मनाला एक प्रकारचं विलक्षण आश्चर्य वाटतं, एक प्रकारचं कौतुक वाटतं.

लहानपणीं मनोरथ न रचणारा कोणी असूं शकेल ? कल्पनेंत रमण्याचं, कल्पनेनं आकाशांत उड्डाण करण्याचं, स्वप्नांत दंग होण्याचं, आशेच्या हिंदोळ्यावर झोके घेण्याचं, पत्त्याचे बंगले बांधण्याचं, वाळूचे किल्ले रचण्याचं हें वय असतं. हें वय निरागस असतं, निष्पाप असतं, आशावादी असतं, श्रद्धाशील असतं. ह्याच वेळेपासून जगांतील साऱ्या सुंदर कल्पनांवर, उत्तुंग ध्येयावर, भव्य विचारावर, दिव्य घटनांवर, उत्कट भावनांवर स्वभावतः तो विश्वास ठेवूं लागतो. जगांतील पराक्रमी पुरुषांच्या, वीरांच्या, त्यांच्या असामान्य कर्तृत्वाच्या, अलौकिक त्यागाच्या, असाधारण देशप्रेमाच्या अलोट धैर्याच्या कथाकहाण्या त्याच्या मनाला भुरळ पाडतात. त्याच्या अंतःकरणाला पीळ पाडतात. त्याच्या हृदयाला साद घालतात. पण हळुहळु संसारांतील कटु सत्यं त्याला बोचूं लागतात. आर्थिक व सामाजिक विषमतेचे चटके बसूं लागतात. कल्पनेंतील फुगे फुटूं लागतात. समाजाच्या मानाने आपण व आपली शक्ति खुजी आहे याची जाणीव होते. सत्यसृष्टी व स्वप्नसृष्टी. आदर्श व वास्तव यांतील फरक कळूं लागतो. आणि मग फारच थोडया लोकांना आपलें मनोरथ सिद्धीला नेण्यांतील समाधान लाभूं शकतं. परिस्थितीचे दास होऊन त्याप्रमाणे वारा नेईल तिकडे नाव हाकारणारेच फार ! आपल्याला ज्या दिशेनं जावयाचे आहे त्या दिशेने नावेला हाकारण्याचें भाग्य फारच थोडयांचं ! !

# २

" आम्हांला ह्या लिंबाच्या झाडावर झेंडा लावावयास कोणीं सांगितलें नाही. आम्हांला ध्वजवंदन करावयास कोणी शिकविलें नाही. आम्ही हें स्वयंस्फूर्तीने करीत आहोंत...... "

यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१४ रोजीं देवराष्ट्रें ह्या गावीं झाला, देवराष्ट्रं हें त्यांचें आजोळ ! सातारा जिल्ह्यांतील विटे हें त्यांचें मूळ गाव. त्यांच्या जन्माच्या आधीं थोड्याच दिवसांपासून त्यांच्या वडिलांनी–बळवंतरावांनी–चार पांच एकर शेती करावयास सुरवात केली होती. भारतांतील शेतकरी म्हटला म्हणजे कशी बशी स्वतःची एक दोन एकर शेती असलेला, दोन–चार एकर वाट्याने कसणारा, कशी तरी दोन तोंडें मिळविणारा, जगाला जगवून स्वतः अर्धपोटी राहणारा, एक-दोन गाई म्हैशी पाळून उदरनिर्वाह करणारा, प्रसंगीं सावकाराचें ऋण काढणारा, आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. बळवंतरावांच्या जीवनाचें चित्र यापेक्षा वेगळें नव्हतें. सर्वसामान्य शेतकऱ्याप्रमाणे जिकीरीचें, कष्टाचें पण समाधानाचें जीवन ते व्यतीत करीत होते. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट म्हणजे ते एका सब्जज्ज्याच्या घरीं दूध घालीत होते. त्यांच्या ओळखीमुळे बळवंतरावांना कोर्टातील बेलिफाचें काम मिळालें.

यशवंतरावांना गणपतराव व ज्ञानोबा हे दोन भाऊ व राधाबाई ही बहीण, पांच–सहा माणसांचं एवढं हें कुटुंब. तीन–

चार वर्षांच्या नोकरीनंतर बळवंतरावांची बदली विट्याहून कऱ्हाडला झाली आणि त्यांचा संसार नीटनेटका व सुस्थिर होऊन सुरळीत मार्गावर लागण्याचीं चिन्हें दिसू लागलीं. पण दैवाला हें पाहवलं नाही, प्लेगाची सांथ आली व तिनं बळवंतरावांचा बळी घेतला. घरांतील कर्तासवरता आधार नाहीसा झाला. कुटुंबांतील सर्वांच्या पुढं एक मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं. मुलें पोरकीं झालीं. पित्याच्या वात्सल्याला व मायेला आचावलीं; मार्ग-दर्शनाला, कौतुकाला आणि प्रेमळ रागाला पारखी झालीं. पित्याचा खडबडींत हात कौतुकानं व प्रेमभरानं आता पाठीवर फिरणार नव्हता. पण दुःखाचा विचार करावयाला वेळ होता तरी कोठे ? भाकरीचा, पोटाचा यक्षप्रश्न डोळ्यांपुढे आ वासून उभा होता. सारीं मुलं लहान, कोवळीं, मायेच्या पंखांखाली वावरणारीं ! कुठं आता जाणार तीं ! पण यशवंतरावांची आई मोठी धीराची बाई होती, त्या वीर मातेला गप्प बसून चालणार नव्हतं, गांगरून भागणार नव्हतं, डगमगून जगायचं नव्हतं, परिस्थितीला झुंज द्यावयाची होती, टक्कर द्यावयाची होती. त्या तेजस्वी मातेचे यशवंतराव हे तेजस्वी पुत्र !

कराडच्या दयाळू सब्जज्ज्यांचें शिफारसपत्र घेऊन त्या साताऱ्च्या न्यायाधीशांकडे आल्या. त्यांना सारी हकीकत सांगून थोरल्या मुलाला वडिलांची जागा देवविली. यशवंतराव सर्वांत लहान. सगळ्यांत जो लहान असेल त्याची नेहमीच जपणूक केली जाते. सर्वजण त्याचें लाड करतात. त्यांच्या मामांनी त्यांना देवराष्ट्रांस नेले व प्राथमिक शाळेंत त्यांचें नांव घातलें. लहान मुलांना आजोळचें विलक्षण वेड लागत असतें. मामा व मामी फार लाडक्या व आवडत्या असतात. "मामाचा वाडा चिरबंदी"

वाटत असतो. दर उन्हाळ्याच्या सुट्टींत तो मामा येण्याची वाट पाहात असतो. मामांच्या घरीं यशवंतरावांनी मराठी चौथीपर्यंत दिवस घालविले. व परत ते आपल्या माऊलीच्या प्रेमळ छत्राखाली आले. यशवंतरावांची सातवी पास झाली. त्या काळांत सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या मानानं सातवीपर्यंतचं शिक्षण नोकरी करण्याइतपत पुरेसं होतं. मुलाने प्रपंच्याच्या मदतीच्या दृष्टीनं नोकरी करावी ही कल्पना. परंतु त्यांना असलेली शिक्षणाची तीव्र आसक्ति पाहून त्यांची तीव्र ज्ञानलालसा व तळमळ पाहून त्यांचें नांव कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये दाखल करण्यांत आलें.

त्यांची ग्रहणशक्ति व स्मरणशक्ति लहानपणापासून तल्लख होती. कोणताहि नवीन विषय ते ताबडतोब आत्मसात करीत असत. सुरुवातीपासून शालेय अभ्यासक्रमापेक्षा इतर विषयांचीं पुस्तकें वाचण्याकडे त्यांचा कल दिसून येई. अर्थात् परीक्षेच्या अभ्यासक्रमाकडे त्यांनी अगदीच दुर्लक्ष केलें नाही. किंबहुना त्यांच्या आर्थिक परिस्थितीने त्यांना तिकडे दुर्लक्ष करूं दिलें नाही. निरनिराळ्या देशांतील देशभक्तांचीं चरित्रें वाचल्याची त्यांना विलक्षण आवड. त्यांच्या कहाण्या वाचण्याची फार हौस. त्याचप्रमाणे इतिहास हाहि विषय सुरवातीपासून आवडीचा.

तरीपण ते अभ्यासांतील किडा कधीच झाले नाहीत. मनाच्या विकासाप्रमाणे शरीराची वाढसुद्धा त्यांनी पद्धतशीर केली. गणपतरावांनी—त्यांच्या वडील भावांनी—त्यांच्यामध्ये कुस्तीची आवड निर्माण केली. जोर बैठका असा व्यायाम करून आणि कुस्त्या खेळून त्यांनी आपलें शरीर पिळदार केलें. त्याच्या जोरावर अनेकवेळां कुस्त्यामध्ये चँपियनशिप मिळविली. मन व

शरीर बळकट केलें. निरोगी शरीरांतच निकोप मन राहूं शकतें. व ह्याच जोरावर पुढेही त्यांनी आयुष्याच्या मैदानावर अनेक कुस्त्या मारल्या व बरेच फड जिंकले. मराठमोळच्या जीवनाची त्यांना मुळापासूनच आवड. धोतर व फेटा यांचीहि मनस्वी हौस. क्रिकेटचाहि ओढा होता. पण परिस्थितीने त्यांना तो खेळ खेळूं दिला नाही.

घरांत आर्थिक दृष्टीने पालकांचा आधार नाही. शिक्षणाची तर अनिवार्य ओढ व तळमळ. त्यामुळे नादारीचा अर्ज घेऊन ते चालकमंडळांपैकी एका गृहस्थांकडे गेले. परंतु शिफारस-पत्रावर सही देण्याचं त्या गृहस्थांनी नाकारलें. यशवंतरावांच्या स्वाभिमानी बालमनाला ही गोष्ट जिव्हारीं लागली. त्यांचें मानी मन तडफडून उठलें. स्वतंत्रमन जागृत झालें व आयुष्यांत परत लाचारीने कोणाकडेही नादारीकरितां तोंड वेंगाडावयाचें नाही असें निर्धारपूर्वक त्यांनी ठरविलें व हा निश्चय शेवटपर्यंत त्यांनी पाळला.

बालवयापासूनच देशप्रेमाची ज्योत त्यांच्या हृदयामध्ये धगधगत होती. डोक्यांमध्ये सारख्या नवीन नवीन कल्पना घोळत असावयाच्या. कांहीतरी नवीन करावें, अद्भुत करून दाखवावें अशी ईर्ष्या मनांमध्ये सारखी रूंजी घालत असावची. १९३० सालच्या चळवळींत ते भाग घेऊं लागले. हायस्कूलच्याच आवारांत लिंबाच्या झाडांवर तिरंगी झेंडा लावून ध्वजवंदन करूं लागले. आजच्या विद्यार्थ्यांना तिरंगी ध्वज हातीं घेणं, वंदे-मातरम् म्हणणं म्हणजे विशेष वाटणार नाही. पण त्या काळांत ध्वजवंदन करणें, वंदे-मातरम् म्हणणें, प्रभातफेरी काढणें म्हणजे कारावासाला निमंत्रण देण्यासारखी गोष्ट होती, आणि तेंहि विद्यार्थीदशेंत !

पण नेपोलियनप्रमाणे भीति हा शब्द त्यांच्या कोशांतच नव्हता. साहस व धाडस हे त्यांचे लहानपणापासूनचे स्थायीभाव झाले होते. झेंडावंदनाला कांही मित्र असत. १९३४ च्या जूनमध्ये ते मॅट्रिक झाले.

मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर उच्चशिक्षणाकरितां कोठे जावयाचें हा प्रश्न होता. त्यावेळीं महाराष्ट्रांत बहुजनसमाजाच्या दृष्टीने कोल्हापूर संस्थान बौद्धिकदृष्टचा पुढारलेले व प्रगतीशील होतें. श्री छत्रपति शाहू महाराजांना शिक्षणाचें महत्त्व पटल्यामुळे विद्यार्थ्यांना फीची सवलत, नादारी, शिष्यवृत्त्या वसतिगृहाची सोय इत्यादि सोयी उपलब्ध करून देऊन बहुजनसमाजांतील विद्यार्थ्यांना पुढे आणण्याची त्यांची प्रामाणिक खटपट असे. साहजिकच यशवंतरावांनी आपला मोहरा कोल्हापूराकडे वळविला. डॉ. बाळकृष्णांचें लक्ष त्यांच्यावर पहिल्यापासून होतें. गरिबीने त्यांचा सारखा पाठलाग चालविला होता. यामुळे वेळेवर फी न भरतां येणें हा नियमच होता. परंतु डॉ. बाळकृष्ण त्यांना जमेल त्यावेळीं फी देण्याची सवलत देत असत.

हें शिक्षण घेत असतांना लक्षांत घेण्यासारखी गोष्ट घडली. हायस्कूलमध्ये ते शाळेच्या आवारांत झेंडावंदन करीत असत. कांही वर्षे अलिगड विद्यापीठाचे उपकुलगुरु असलेले श्री. नुरुल्ला हे त्यावेळीं शाळातपासनीस होते. शाळातपासण्याकरितां ते शाळेच्या समोरच उतरले होते. दुसरें दिवशीं सकाळीं साडेआठ वाजतां चाळीस–पन्नास विद्यार्थि झेंडावंदन करत असतांना त्यांनी पाहिलें. त्यांनी लगेच शाळाचालकांना याबाबत विचारणा केली. अर्थात् शाळाचालकांना ही गोष्ट माहित होती. व त्याला प्रेमाची सहानुभूतीहि होती. परंतु त्यांनी वरील गोष्टीची पृच्छा होतांच

कानांवर हात ठेवला. श्री. नुरुल्लांनी ही गोष्ट स्वत: पाहिली असल्यामुळे ह्या गोष्टीचा छडा लावण्याचें त्यांनी ठरविलें. टिळक हायस्कूल हें त्यावेळचें नांवाजलेलें असल्यामुळे ह्या गोष्टीचा बभ्रा झाल्यावर सबंध गावभर त्यामुळे खळबळ माजली. कांही लोक यशवंतरावांना व त्यांच्या सहकाऱ्यांना नांवें ठेवूं लागले. कारण अशा प्रसंगामुळे शाळा बंद ठेवण्याचा व शाळेची मंजुरी जाण्याचा प्रसंग येतो कीं काय अशी त्यांना काळजी वाटूं लागली. त्याच दिवशीं श्री. नुरुल्ला हे शाळेंत आले. वर्गावर्गांत हिंडून झेंडावंदनांत कोणीकोणी भाग घेतला होता असें विचारूं लागले. झेंडावंदनांत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांपैंकी शे. ८४ ते ९० टक्के विद्यार्थि यशवंतरावांच्याच वर्गांतील होते. वर्गांत ते आल्याबरोबर 'झेंडा कोणी लावला' व कोणी ही गोष्ट करावयास सांगितलें, असें विचारल्यावरोबर यशवंतरावांनी 'आम्हांला ह्या लिबाच्या झाडावर झेंडा लावावयास कोणी सांगितलें नाही. ध्वजवंदन करावयास कोणी शिकवलें नाही. आम्हीं हें स्वयंस्फूर्तीने करीत आहोंत." असें बाणेदारपणाचें उत्तर दिलें व आपल्याला इतर विद्यार्थ्यांचीं नांवें माहीत असलीं तरी आपण तीं सांगणार नाही. असें रोखठोकपणें सांगितलें.

श्री. नुरुल्लांना यशवंतरावांच्या निर्भयपणाचें कौतुक वाटलें. त्यांनी त्यांना बाहेर बोलावून शाळाचालकांची तुम्हांला फूस आहे काय वगैरे गोष्टी विचारल्या. तरीपण त्या गोष्टी आम्ही स्वतःच्या इच्छेने केल्या, आम्हांला कोणीहि ह्याबाबत सूचना केल्या नाहीत म्हणून सांगितलें. यशवंतरावांच्या निर्भयतेचें कौतुक वाटून श्री. नुरुल्लांनी त्यांना परत अशा गोष्टी करूं नका व संस्थेला धोक्यांत आणूं नका म्हणून सांगितलें. येथून यशवंतरावांचा आशावाद द्विगुणित झाला.

कॉलेजमध्ये त्यांच्या ह्या राजकीय चळवळी चालत असत· इतिहास, अर्थशास्त्र, घेऊन ते बी. ए. झाले व कायद्याचा अभ्यास करण्याकरितां ते पुणें येथे आले व एल्. एल्. बी. ची परीक्षा ते उत्तीर्ण झाले. येथून पुढे त्यांना संपूर्णपणें राजकीय कार्याकरितां वाहून घेतां येऊं लागले.

## ३

"...काँग्रेस हा केवळ एक राजकीय पक्ष नाही· भारताला समाजवादाच्या दिशेने नेणारी व लोकसेवेची थोर परंपरा असलेली ती एक राष्ट्रीय आघाडी आहे,..."

सामान्य माणसें राजकारणाचा अर्थ फार संकुचित करून घेतात. सभा घेणं, फेऱ्या काढणं, घोषणा करणं, मोर्चे संघटित करणं, मिरवणुका लढविणं आणि त्याकरितां वारे-माप आश्वासनांचा वर्षाव करणं विरोधी पक्षाला शिव्या देणं-ह्या साऱ्या गोष्टींना आज राजकारण म्हणून अर्थ येऊन बसला आहे स्वातंत्र्यापूर्वीची उदात्तता, त्याग, तपश्चर्या, दीर्घोद्योग, सेवेची आंस व तळमळ ह्या गोष्टींचा लोप होऊं लागला आहे. भावनेची, श्रद्धेची व निष्ठांची खोली नाहीशी होऊं लागली आहे. उथळपणा व चंचलपणा ह्या गोष्टींची वाढ होऊं लागली आहे.

यशवंतरावांचा 'राजकारण' या शब्दाचा अर्थ वेगळा व निराळा आहे. राजकारणाकडे व्यापक दृष्टीने ते पाहत असतात. त्यांच्या दृष्टीने राजकारण म्हणजे देशसेवा असें समीकरण होऊन बसलें आहे. राजकारण हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. देशसेवेचें, लोकांच्या कल्याणांचें, लोकांच्या अडचणी निवारण करण्याचें एक प्रभावी साधन ह्या व्यापक दृष्टिकोनांतून

ते राजकारणाकडे पाहत असतात. ते म्हणतात, " मी परमेश्वरा–जवळ जर कांही मागत असेन तर मी असें कांही मागत नाही की देवा कॉंग्रेसचें राज्य राहूं दे. तें मागणें मीं मतदारांकडे मागतों. मतदारालाच म्हणतों की तूं कॉंग्रेसला मत दे. पटलें तर दे. कॉंग्रेसचा कार्यक्रम तपासून दे. मी परमेश्वराला म्हणेन की, चंद्र व सूर्य उगवत आहेत तोपर्यंत जनतेचें हें राज्य कायम ठेव, चिरंतन ठेव. "

राजकारणाचें त्यांना बाळकडूच होतें म्हटलें तरी चालेल. यशवंतरावांचा पहिला कारावास त्यांना खरोखर एका दृष्टीने कटुतेचा वाटला असेल. वक्तृत्व स्पर्धेकरितां त्यांची हायस्कूलमध्ये असतांना पुण्याला जाण्याकरितां निवड झाली. परंतु पुण्याला जाण्याला भाड्याला पैसे आणावयाचे कोठून ? एका मित्राने स्वतःच्या मोटारींतून त्यांना पाठविलें. मित्र हेंच यशवंतरावांचें भांडवल, संपत्ति ! पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरांत वक्तृत्व–स्पर्धेंत यशवंतराव पहिले आले. दीडशे रुपये पारितोषिक मिळालें. लहान मुलांना एक रुपाया म्हणजे केवढी संपत्ति वाटते. आणि त्यांतून गरीब विद्यार्थ्याला स्वतःच्या कर्तबगारीने मिळ–विलेले १५० रु. म्हणजे केवढें कौतुक वाटलें असेल? त्यांना व त्यांच्या भावांना व मातोश्रींना केवढा आनंद वाटला असेल ! परंतु १९३० सालच्या चळवळींत भाग घेतला होता. त्यांत त्यांना शिक्षा झाली व दंडही झाला. मिळालेले पैसे वाऱ्यावर उडून जावे तसे झाले व निघून गेले. सुरवातीपासूनच संपत्तीने त्यांच्याशीं पाठशिवणीचा खेळ सुरूं केला.

परत त्याना १९३२ सालच्या चळवळींत १८ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. शाळेंत असतानांच त्यांच्या या

अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ..........(११).......... नों. दि: ..................

चळवळ्या व धडपड्या स्वभावामुळे ते कराड शहर व आस-पासच्या खेड्यांत लोकप्रिय झाले. आसपासच्या खेड्यांतून व्याख्यानें देण्याकरितां त्यांना निमंत्रणें येऊं लागलीं. अर्थात् चळवळ सुरूं झाल्याबरोबर अधिकाऱ्यांनी त्यांनाच पकडल्या-बरोबर चळवळ थंडावेल म्हणून त्यांना पकडलें व येरवडा तुरुंगांत त्यांची रवानगी झाली.

तेथून सुटका झाली. हें सारे त्यांचे उद्योग हायस्कूलमध्ये असतानांच. दरिद्रि अवस्थेंत पोटाला चिमटा काढून चालूं होते. नंतर मात्र त्यांनी अभ्यासांत मन घातलें व मॅट्रिक झाले. राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे असतानांच राजकारणांत ते जास्त भाग घेऊं लागले. राजकारण त्यांच्या आयुष्याचें एक महत्त्वाचें अंग होऊन बसलें. त्यावेळेपासूनच ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सभासद होते. इकडे अभ्यास चालूं होता आणि दुसरीकडे कूपरशाहीविरुद्ध झुंज देण्याचेंहि काम सुरूं होतें. १९३७ सालच्या आसपास कूपरशाहीचें प्रस्थ सातारा जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर होतें. जमीनदार, सरंजामदार, श्रीमंत व सावकार मंडळी यांच्यामध्ये त्यांचें विशेष वजन होतें. श्री. सर धनजीशाहा कूपर ह्यांची एक बडे उद्योगपति म्हणून प्रसिद्धि होती. ते नुसते श्रीमंत व कारखानदार नव्हते तर मुत्सद्दी व महत्त्वाकांक्षी असे राजकारणी पुरुष होते. आणि त्यादृष्टीने जिल्ह्यांतील सर्व सरंजामी व प्रतिगामी शक्तींना त्यांनी एकत्र आणलें होतें. अशा प्रवृत्तींना विरोध करणारा, समाजवादाची प्रेरणा व ध्येयवाद असलेला, पुरोगामी, विचाराचा गट यशवंतरावांनी काँग्रेसमध्ये तयार केला व प्रखरपणें व प्रभावीपणाने कूपरशाहीला विरोध केला.

त्यानतर १९४२ सालचें 'चले-जाव' आंदोलन आलें. त्यावेळीं मुंबईमध्ये ए. आय. सी. सी. चें अधिवेशन होतें. बरेंचसे कार्यकर्ते त्या अधिवेशनाला जमले होते. यशवंतराव ए. आय. सी. सी. चे सभासद होते.

सातारा जिल्ह्यांत राजकीय वातावरणाला त्यावेळीं उधाण प्राप्त झालें होतें. लहानमोठचा सर्व कार्यकर्त्यांच्या मनांमध्ये देशाच्या स्वातंत्र्याशिवाय दुसरा विचार नव्हता. चर्चेला दुसरा विषय नव्हता. साहजिकच मुंबईच्या अधिवेशनाला सातारा, मिरज, सांगली भागांतून सुमारें तीनशें कार्यकर्ते जमले होते. मुंबईचें त्यावेळचें ज्वलंत वातावरण पाहून कार्यकर्त्यांचीं अंतःकरणें पेटलीं होतीं. गांधीजींच्या 'करा अथवा मरा' या घोषणेने सर्वांना स्फूर्ति व प्रेरणा मिळाली. या सर्व गोष्टींचा विचार करून पुढील कार्यक्रमाची व चळवळीची रूपरेषा व मार्ग आखण्याकरितां सर्व मंडळी गिरगांवच्या बद्रिका-निवासांत जमली व तेथें कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यांत आला. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं मोठमोठे मोर्चे संघटित करावयाचे ठरविण्यांत आलें. सर्वजण मुंबईहून परत आले. मुंबईहून परत आल्यावर थोडयाच दिवसांनी तरुणांची यशवंतरावांनी गुप्त बैठक घेतली.

त्या बैठकीमध्ये त्यांनी तरुणांना मार्गदर्शन केलें. त्या-काळांतसुद्धा यशवंतराव किती काळजीपूर्वक बोलत असत हें पाहण्यासारखे आहे. येनकेनप्रकारेण चळवळ करावयाची, हुल्लडबाजी करावयाची असा क्षुद्र दृष्टिकोन त्यांनी आपल्या डोळयासमोर ठेवला नव्हता. अशावेळींसुद्धा त्यांनी जमलेल्या युवकांना यथातथ्य परिस्थितीची कल्पना दिली. ते म्हणाले, " ही चळवळ तुरुंग भरतीची नाही. 'करूं किंवा मरूं' या इर्षेने

हा स्वातंत्र्यलढा लढावयाचा आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्ध आपणांस आमजनतेची क्रांति करावयाची आहे. या लढ्यांत आपल्या सर्वस्वाची होळी होईलच. परंतु या क्रांतीच्या होमकुंडांत प्रसंगीं स्वत:चीही आहुती द्यावी लागेल. या सर्व परिस्थितीचा आपण आपल्या मनाशीं दहादां विचार करून निर्णय घ्या. अविचाराने कोणतेंहि पाऊल टाकूं नका. तुमचें शिक्षण, आईबाप या सर्वांना तुम्हाला सोडावें लागणार आहे. आपल्या भावी आयुष्याच्या सुखस्वप्नांची होळी करावी लागेल याचा विचार मनाशीं पक्का केलात तर तुम्हाला हें क्रांतिकार्य करतां येईल. आपल्या नुकसानीची जबाबदारी आपण स्वत: पत्करण्यास तयार असले पाहिजे. एवढी ज्यांची तयारी असेल त्यांना मी काय करावयाचें तें सांगेन." या सर्व भाषणांवरून यशवंतरावांचे विचार समजून येतात. कोणतीहि गोष्ट करतांना ते स्वत: त्याचा दहादां विचार करीत असत. मुख्यमंत्रीपदाचीं स्वप्नें त्या काळांत त्यांना पडलीं नव्हतीं. इतकेंच नव्हे तर राजकीय स्वातंत्र्यच केव्हा मिळेल ह्याचा पत्ता नव्हता तर मग मंत्रीपदाचें व सत्तेचें नांव कशाला ? त्याचप्रमाणे एकदां एखाद्या गोष्टीचा विचार करून निर्णय घेतल्यानंतर ह्या निर्णय घेण्यामुळे होणाऱ्या परिणामाची ते कधीच क्षिती बाळगीत नसत.

अधिवेशनाहून परतल्यावर कराड, वडूज, पाटण, तासगांव इत्यादि ठिकाणच्या मोर्चांना त्यांनी मार्गदर्शन केलें. विशेषत: वडूजच्या मोर्चाला तीव्र स्वरूप आलें. गोळीबार झाला. नऊजण मृत्युमुखीं पडले. हुतात्मा परशुराम घाडगे ह्याने मरेपर्यंत हातांतून झेंडा सोडला नाही. राष्ट्राच्या, देशाच्या, मातृभूमीच्या वेदीवर त्याने आपलें बलिदान केलें. राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां त्याने आपला देह अर्पण केला. अशामुळे मानवहानी निष्कारण होणार हें लक्षांत

घेऊन यशवंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी भूमिगत राहण्याचा निर्णय घेतला. त्यांची कार्य करण्याची पद्धति, लोकांमधील त्यांचे बद्दलची अमाप लोकप्रियता, त्यांचें संघटनकौशल्य, लोकांना जागृत करण्याची त्यांची हातोटी इत्यादि गोष्टी ध्यानांत घेऊन त्यांना पकडण्यासाठी ब्रिटिश सरकारने १००० रु. चें बक्षीस लावलें. परंतु त्यांना जनतेचें उत्स्फूर्त सहकार्य होतें. त्यांना जेवण पोहोचविणें, निरोप पोहोचविणें, सहकार्य देणें, लागेल ती मदत पुरविणें इत्यादि कामें जनता स्वयंस्फूर्तीने करीत होती. प्रत्यक्ष आपल्याला जरी काम करतां येत नसलें तरी हे जे देशभक्त काम करीत आहेत त्यांना तरी मदत करावी ही भावना जनतेमध्ये होती.

कांही कालानंतर मात्र त्यांना हिंसात्मक चळवळ बंद करावी असें वाटूं लागलें. किंबहुना आपल्या साध्याप्रमाणेच आपल्याजवळ साधनाचीहि शुचिता असावयास पाहिजे. ह्या गांधीजींच्या शिकवणूकीचा त्यांच्या मनावर पगडा बसूं लागला. मात्र बेचाळीसच्या क्रांतीचें नांव निघाल्याबरोबर सातारा जिल्ह्याचें नांव चटकन् डोळ्यांपुढे येतें, अग्रभागीं उभें राहतें. शेकडों तरुण या चळवळींत सामील झाले, प्राणपणाने लढले, आणि महाराष्ट्राच्या वीरश्रेचें, पराक्रमाचें, लढाऊ प्रवृत्तीचें व क्षात्रतेजाचें दर्शन भारताला व ब्रिटिश सरकारला झालें. या चळवळीमधून काँग्रेसला संघटनेच्या दृष्टीने खूप तरुण मिळाले. बरीच मोठी शक्ति मिळाली. राजकीयदृष्टचा बौद्धिक जागृति झाली.

त्यानंतर चार पांच वर्षांनी या भूमिगत गटामध्ये मतभेद होऊं लागले. एका गटाला जिल्हा लोकल बोर्डाचा अध्यक्ष हा आपल्याच गटांतील असावा असें वाटूं लागले. ही गटबाजीची

प्रवृत्ति व फुटीर वृत्ति अशीच वाढूं दिली तर पक्ष म्हणून कार्य करणें अशक्य होईल आणि पक्ष, ध्येय व तत्त्वज्ञान या गोष्टी मागे पडून वैयक्तिक महत्त्वाकांक्षेस अवसर दिल्यासारखें होईल हें ओळखून त्यांनी प्रतिगामी गटाचा पराभव केला.

देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यादृष्टीने राजकारणाचे वारे वाहूं लागले. भारतांतील चाळीस कोट जनतेची आकांक्षा पुरी होणार होती. मातृभूमीच्या अंगावरच्या पारतंत्र्याच्या शृंखला गळून पडणार होत्या. भारताची मान अभिमानाने उंचावणार होती. इ. स. १९४६ सालीं निवडणुका घेण्यांत आल्या. लोकशाही राज्याची नांदी सुरू झाली. जनतेला आपले आवडते, लाडके पुढारी व नेते निवडण्याची संधि प्राप्त झाली. पुढाऱ्यांच्या कर्तृत्वाला आव्हान मिळालें. यशवंतराव निवडणुकींत यशस्वी झाले व गृहखात्याच्या उपमंत्रिपदाची माळ त्यांच्या गळ्यांत पडली. अजूनहि सातारा जिल्ह्यांतील बऱ्याचशा भूमिगत पुढाऱ्यांवर वारंटें होतीं. त्यावेळीं हा प्रश्न कौशल्यानें, सहानुभूतीने व समजूतपणाने हाताळणाऱ्या व्यक्तीची आवश्यकता होती. कित्येकांच्या जीवनमरणाचा तो प्रश्न होता. अशावेळीं यशवंतरावांनी हा प्रश्न उत्कृष्ट रीतीने हाताळला.

## ४

"...... स्वातंत्र्य मिळाल्यानंतर म. गांधी भारताचे राजे होतील! व त्यांचें लग्न इंग्लंडच्या युवराज्ञीशीं लागेल !!!"

स्वातंत्र्याच्या अगोदर जनतेच्या आशा अपेक्षा उंचावल्या होत्या. कांही अज्ञ लोकांना निदान एवढें माहीत होतें की ब्रिटिश सरकारचें राज्य जाऊन आपलें राज्य होणार आहे. प्रत्येकजण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काय होणार याचा अंदाज आपल्या मनाप्रमाणे

करीत होता. श्री. अनंत काणेकरांनी मुंबईतील एका पोष्टमनला स्वातंत्र्यानंतर काय होईल असें तुला वाटतें असें विचारल्यावर तो म्हणाला, " अहो, आता महात्मा गांधी भारताचे राजे होणार व इंग्लंडचा राजा आपली मुलगी त्यांना देणार. " ही गोष्ट श्री. काणेकरांनी विलींग्डन कॉलेज, सांगली, येथे सांगितली. खरोखर हंसूं येतें हें ऐकल्यावर. जनतेच्या किती भोळ्या भाबड्या कल्पना होत्या हेंहि दिसून येतें.

महाराष्ट्रामध्येहि स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदर बहुजन-समाजामध्ये वेगवेगळ्या आकांक्षा निर्माण झाल्या. तुरुंगांत जाऊन आलेल्यापैकी कांहीना आपणच आता सत्तेवर येणार असें वाटूं लागलें. अर्थात् त्यांना हें वाटणें अगदी न्याय्य, साहजिक होतें. त्यांची अपेक्षा रास्त होती. आपली गुलामी जाऊन आपण खरे-खुरे सत्ताधारी होणार अशीं स्वप्नें बहुजनसमाजांतील कांही मंडळी बाळगून होती. स्वातंत्र्य मिळालें पण आपली उपेक्षा झाली आपण दुर्लक्षिलें गेलों ही समजूत बळावत चालली. आपल्या त्यागाची कदर होत नाही. हें शल्य मनामध्ये घर करूं लागलें. त्यामुळे नैराश्याचे व वैफल्याचे वारे महाराष्ट्रांत वाहूं लागले. त्यांतून कॉंग्रेस संघटनेबद्दल असंतोष व अविश्वास निर्माण होऊं लागला.

या परिस्थितीचा विचार करण्याकरितां बहुजन समाजांतील मंडळी एकत्र जमली. श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली दोनदां बैठकी झाल्या. बऱ्याच मंडळींचा कॉंग्रेसपासून फुटून निघण्याचा कल दिसूं लागला. मात्र भारताची एकात्मकता अभंग टिकवावयाची असेल व आपली प्रगति व उन्नति करावयाची असेल तर कॉंग्रेसपासून फुटून

चालणार नाही; फार तर काँग्रेस अंतर्गतच आपला गट ठेवावा असें जमलेल्या मंडळींना यशवंतरावांनी सांगितलें. काँग्रेसपासून फुटून बहुजनसमाजाचा निश्चित विकास होणार नाही अशी खात्री होती. परंतु इतक्या दूरवर व खोलवर विचार करण्याच्या मनःस्थितींत त्यावेळचे इतर पुढारी नव्हते. कारण त्यांतील प्रत्येकाला आजची परिस्थिति डांचत होती. राजकारणी व मुत्सद्दी माणसाच्या पल्लेदार दृष्टीचा व तत्त्वज्ञानी माणसाच्या द्रष्टेपणाचा त्यांच्यामध्ये अभाव होता. सारी इतर मंडळी भावना-वश झाली होती. खूप विचारविनिमय झाला. मोठ्या प्रमाणावर खल करण्यांत आला. परंतु महाराष्ट्राच्या दुर्दैवाने त्यागी, निष्ठावंत, बहुजनसमाजाच्या हिताकरितां हाडें झिजवलेलीं, त्याच्या सुखाकरितां काया झिजवलेलीं, समाजांत मान्यता असलेलीं श्री. तुळशीदास जाधव, श्री. शंकरराव मोरे, श्री. माधवराव बागल, श्री. बाबूराव जेधे, श्री. दत्ता देशमुख, श्री. भाऊसाहेब राऊत इत्यादि मंडळी काँग्रेसमधून बाहेर पडली व त्यांनी शेतकरी-कामकरी नांवाचा पक्ष स्थापन केला. या नव्या पक्षाचा हिरिरीने व वीरश्रीने प्रचार करण्यास ही मंडळी उभी राहिली. पक्षाला तत्त्वज्ञानाची बैठक देण्याकरितां श्री. शंकरराव मोरे यांच्यासारखे कायदेपंडित व घटनातज्ञ पुढे सरसावले व साम्यवादी बैठक पक्षाला देण्याचा ते प्रयत्न करूं लागले. राजकीय तत्त्वज्ञानाचा गाढ व्यासंग असलेले श्री. र. के. खाडिलकर हेहि पक्षाला मदत करण्याकरितां पुढे आले. कम्यु-निस्टांची व यांचीं मतें मिळतीं जुळतीं असूनहि इटलीच्या डाव्या गटाप्रमाणे त्यांनी आपला पक्ष वेगळा ठेवला व आम्ही कम्यु-निस्टांप्रमाणे रशियाच्या मार्गदर्शनावर अवलंबून न राहतां राष्ट्रीय परंपरा व सांस्कृतिक वारसा टिकविण्याचा प्रयत्न करून

स्वत:चा वेगळा पक्ष ठेवणार अशी त्यांनी भूमिका घेतली होती. परंतु या पक्षामध्ये एकजिनसीपणा, एकसंघपणा कधीच निर्माण होऊं शकला नाही. चार-पांच वर्षांच्या कालावधीनंतर अंतर्गत लाथाळी माजूं लागली, वैयक्तिक कलह व भांडणें होऊं लागलीं; एकमेकांमध्ये वैमनस्य माजलें. कांही कार्यकर्ते इतर पक्ष शोधूं लागले; कांही काँग्रेसमध्ये परत येऊं लागले. थोडक्यांत अंतर्गत कलह व अंगभूत दोषांमुळे हा पक्ष मूळ धरूं शकला नाही.

तरीपण काँग्रेसला सुरुवातीला हा फार मोठा शह होता. कारण बरीच मंडळी या पक्षाकडे झुकूं लागली. जनता या पक्षाकडे सहानुभूतीने पाहूं लागली. शे. का. पक्षांतील कार्यकर्त्यांना नवीन निर्मावियाची जिद्द व ईर्षा लागली होती. महाराष्ट्रांत काँग्रेस अल्पमतांत राहते कीं काय अशी शंका येऊं लागली. अशावेळीं श्री. भाऊसाहेब हिरे व यशवंतराव पुढे आले. महाराष्ट्रांत काँग्रेस स्थिर करण्यासाठी भाऊसाहेबांनी खूप प्रयत्न केले. यशवंतरावांनी त्यांना निष्ठापूर्वक साथ दिली. त्यावेळेपासून मुख्यमंत्री होईपर्यंत त्यांनी श्री. भाऊसाहेब हिरे यांना साथ दिली, सहकार्य दिलें. त्या काळांत ह्या दोघांनीहि काँग्रेस मजबूत ठेवली. मंत्री मंडळामध्ये शिस्त व एकोपा या दृष्टीने श्री. मोरारजीभाईनाहि ते सहकार्य देत असत. संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळाचा एकोपा टिकणें, त्यांच्यामध्ये एकात्मभाव असणें, शिस्त असणें, एकमेकामध्ये सामंजस्य असणें हें फार महत्त्वाचें असतें. कारण जनतेला मंत्रिमंडळ हें संयुक्तरीत्या जबाबदार असतें. त्या दृष्टीने व पक्षशिस्तीला अग्रहक्क देणारे यशवंतराव श्री. मोरारजीभाईंच्या बरोबरहि निष्कपटपणाने व प्रांजलपणाने वागत होते. सगळ्यांशीं-मग तो विरोधक कां असेना-त्यांच्याशी प्रांजलपणाने वागावयाचें, त्यांच्यातील अवगुणांकडे, दोषांकडे, उणीवांकडे न पाहतां त्यांच्या चांगुलपणाकडे व चांगल्या गोष्टीकडे पाहावयाचें ही यशवंतरावांची

पहिल्यापासून भूमिका दिसते. एक उत्कृष्ट प्रशासक या दृष्टीने श्री. मोरारजीभाईंच्याकडे ते पाहात असत. व त्यांच्या अनुभवाचा फायदा घेत. परंतु याचाहि कांही मंडळींनी गैरसमज केला. गांधींच्या ब्रिटिशांबरोबर वागण्याचाहि कांही वेळां गैरसमज होत असे. अर्थात् हा त्या लोकांचाहि दोष नसतो. सर्वच माणसें फार मोठ्या उंचीवर सर्वांच्याकडे समत्वदृष्टीने पाहूं शकत नाहीत. मात्र लोकांच्या टीकेला व गैरसमजाला भिऊन विचार–पूर्वक ठरविलेलें धोरण व वागण्याची पद्धत यशवंतरावांनी कधीच बदलली नाही.

१९५२ च्या निवडणुकांमध्ये श्री. भाऊसाहेब हिरे व यशवंतराव यांच्यावर खूप जबाबदारी पडली. कारण स्वातंत्र्यानंतर तसें पाहिलें तर ही पहिली निवडणुक होती. त्याकरितां प्राणपणाने लढणें, प्रसंगीं जिवाचें रान करणें आवश्यक होतें. यशवंतरावांनी आपल्या अमोघ वाणीने, असामान्य व असाधारण वक्तृत्वाने महाराष्ट्रांतील बहुसंख्य जनतेचा पाठिंबा कॉंग्रेसला मिळवून दिला. महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर जनतेने कॉंग्रेसला कौल दिला. व श्री. मोरारजीभाईंच्या मंत्रिमंडळामध्ये त्यांचा समावेश झाला. व पुरवठा खात्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यांत आली.

भारत हा मोठ्या लोकसंख्येचा देश आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदर लहानमोठ्या पुढाऱ्यांनी आपल्याला, देशाच्या खनिज संपत्तीचा, क्षेत्रफळाचा नैसर्गिक साधन संपत्तीचा, उपलब्ध असलेल्या साधनांचा विचार न करतां, सुचतील तीं भाषणें केलीं. जनतेला वारेमाप आश्वासनें दिलीं. अज्ञान, दारिद्र्य, सामाजिक विषमता, रोगराई, एवढें नव्हें तर भारतांमध्ये जी जी म्हणून अपूर्णता दृष्टोत्पत्तीस येते तिचें कारण म्हणजे केवळ ब्रिटिश सरकारचें ह्या ठिकाणीं असणारें अस्तित्त्व ! भारताची प्रगति न होण्याला

ब्रिटिश सरकारचा फार मोठा अडसर होता, नव्हे तें एक महत्त्वाचें कारण होतें ही गोष्ट सामान्य माणूसहि मान्य करील. परंतु सर्व दोषांची व उणिवांची जबाबदारी, अपूर्णतेचा, असमृद्धतेचा दारिद्र्याचा दोष सरकारवर टाकण्याची संवय त्यावेळेपासून जोपासण्यांत आली. साहजिकच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर यक्षिणीच्या व जादूच्या कांडीप्रमाणे देशाचा कायापालट होणार व देशामध्ये एकदम सुबत्ता, समृद्धि व संपन्नता नांदणार अशी भाबडी जनता आशा बाळगून होती.

इतकेंच नव्हे तर बुद्धिवादी म्हणविणाऱ्या लोकांच्या- मध्येहि ह्याबद्दल थोडासा भ्रम होता. पूर्वीपासून गोपाळ गणेश आगरकर ह्या द्रष्टयांचाच केवळ या बाबतींत अपवाद केला पाहिजे. त्यांनी व 'बी' सारख्या कवींनी सामाजिक दोषांची व विषमतेची जबाबदारी आपल्यावर घ्यावयास पाहिजे असें आवर्जून प्रतिपादिलें होतें. कांही लोक अकारण आशावादी होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रत्येकजण भारताची इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशांशी तुलना करूं लागला. कांहीजण प्रगतीच्या वेगाच्या दृष्टीने लोकशाही भारताची हुकुमशाही रशिया व चीन ह्या देशां- बरोबर तुलना करूं लागलें. कांही लोक सुधारणा होऊन द्यावयास कांही वेळ वाट पाहण्यास तयार नव्हते. परंतु इंग्लंड, रशिया, अमेरिका, आस्ट्रेलिया इ. देशांची लोकसंख्या, त्या देशाचें क्षेत्रफळ, लोकसंख्येचें क्षेत्रफळाशीं असलेलें प्रमाण, तेथील खनिज संपत्ति, नैसर्गिक साधन संपत्ति, भौगोलिक परिस्थिति, तेथील लोकांची परंपरा, तेथील लोकांची चिकाटी, दीर्घोद्योग करण्याची प्रवृत्ति इ. गोष्टी फारच थोडेजण लक्षांत घेत. राष्ट्राच्या अभ्युदयाकरितां हजारो त्यागी, निष्ठावंत, प्रयत्नशील लोकांची गरज असते, त्यांचे परिश्रम आवश्यक असतात. अशा कर्तबगार व कर्तृत्ववान

माणसांच्या कार्यांतून इतिहास घडविला जातो. त्यांतून एक देशाची स्वतंत्र परंपरा व संस्कृति निर्माण होतें आणि मग तो देश, तें राष्ट्र जगामध्ये अग्रभागीं मिरवतांना दिसतें. रशियाच्या व चीनच्या प्रगतीबद्दल (?) मनामध्ये मोह होणें नैसर्गिक आहे. परंतु पूर्वी रोम शहर हें सुद्धा हजारों गुलामांच्याकडून वेठीच्या पद्धतीने बांधून घेतलें. त्यांच्या घामांवर, श्रमांवर, रक्तांवर हजारों राजवाडे, गगनचुंबी इमारती, पुतळे, कलात्मक संग्रहालयें व चर्चेस उभारण्यांत आलीं. पण लोकशाहींत लोकांना राजी राखून, त्यांचें मतपरिवर्तन व हृदयपरिवर्तन करून, सर्वांची सांगड घालून काम करून घेणें किती अवघड असतें हें फारच थोडे जाणतात. त्यांतून भारताची परिस्थिति बारकाईने पाहिल्यास हें विदारक सत्य लवकरच उमजेल. आम्ही फक्त एक राष्ट्राची घोषणा करतों. पण प्रत्यक्षांत काय, भाषा, पेहेराव, हवामान, अन्नधान्य, परंपरा, आचारविचार या दृष्टीने आम्ही किती वेगळे आहोंत? आम्हांला इंग्लंडचा इतिहास ज्ञात आहे, इंग्रजांचा स्वभाव माहित आहे. परंतु किती मद्रासी लोकांना काश्मीर, मारवाड किंवा पंजाब येथील लोकांची किती माहिती आहे? वेगळे होण्याची, दुसऱ्या राज्यांतील लोकांना टाकून बोलण्याची चटकन् स्फूर्ति होते. हिंदी राष्ट्रभाषा करण्याचा साधा प्रश्न. पण तेवढ्या प्रश्नावर किती मतभेद!

या सर्व प्रश्नांत अन्नधान्याचा प्रश्न सर्वांत अवघड. अन्नधान्याचा प्रश्न हा माणसाच्या जीवनमरणाशीं निगडित झालेला असतो. अतिवृष्टि, अनावृष्टि, महापूर इत्यादि नैसर्गिक आपत्तींनी परिणाम होणारा हा प्रश्न! अशा पार्श्वभूमीवर यशवंतरावांनी हें पुरवठाखातें आपल्या हातीं घेतलें. त्यावेळच्चें केंद्र सरकारचें पुरवठाखातें श्री. रफी अहंमद किडवाई यांचेकडे

होतें. प्रथम दर्शनींच त्यांच्यामध्ये व यशवंतरवांच्यांत अकृत्रिम स्नेह निर्माण झाला. आपल्या सौजन्यशील व स्नेहशील वागणुकीने श्री. किडवाईचें सहकार्य यशवंतरावांनी संपादन केलें. पुरवठा खातें हातीं घेतल्यावर एकाच वर्षांत त्यांनीं आपलें नवें अन्नधान्य धोरण जाहीर केलें. त्यावेळीं नियंत्रणामुळे जनतेची कुचंबणा होत होती; लोकांना गैरसोय सोसावी लागत होती. त्याकरितां आकाशवाणीवरून व्यापाऱ्यांना व धान्यउत्पादकांना त्यांनी व्यक्तिशः आवाहन केलें व कळकळीची विनंती केली. ते म्हणतात, "आम्ही जो नवा प्रयोग करीत आहोंत त्याचें यश धान्य पिकविणाऱ्यांच्या आणि व्यापाऱ्यांच्या राष्ट्रीय सद्भावनेवर अवलंबून आहे. ते सरकारशीं सहकार्य करतील, किंमती वाढणार नाहीत याची काळजी घेतील आणि जेथे गरज आहे त्या ठिकाणीं मोकळेपणाने धान्यपुरवठा करतील अशी आशा आहे. टीकाकारांना आणि अर्थतज्ञांनाहि अशी विनंती आहे की, त्यांनी जरा दम धरावा. आम्ही स्वीकारलेल्या धोरणाला यश येण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करावें. त्याचप्रमाणे साठेबाजी व नफेबाजी, व इनर समाजविरोधी कृत्यांना आळा घालण्यास सर्व तऱ्हेचे कडक उपाय सरकार योजील व तें सरकारचें आद्य कर्तव्य आहे असें मी जाहीर करतों."

राज्यकारभार करतांना साचेबंद किंवा ठराविक चौकटीचें धोरण आखून चालत नाही. बऱ्याच वेळीं लवचिक आणि परि-स्थितीला अनुरूप असें धोरण आखावें लागतें, त्याचवेळीं नियंत्रण हें फार थोड्या कालावधीकरितां आहे. नंतर तें उठणारच हा आत्मविश्वास त्यांच्या ठायीं होता. प्रत्येक क्षेत्रामध्यें, प्रत्येक विषयांवर, प्रत्येक प्रश्नावर, मग तें अर्थशास्त्र असो, शिक्षणशास्त्र असो, राज्यशासन अंतर्भूत प्रश्न असो, त्याचा ते सखोल अभ्यास

करतात; त्यावर दीर्घकाल मनन व चिंतन करतात आणि मगच स्वतःचीं अशीं ठाम मतें बनवतात. त्यावेळीं ते म्हणाले, " पुरवठा खातें बंद करावें लागलें नाही तर मला स्वतःला आश्चर्य वाटेल " रफी अहमद किडवाईंच्या ठिकाणीं आपल्या धोरणांबद्दल जो आत्मविश्वास असे तसाच यशवंतरावांच्या ठायीं दिसून येतो.

आणि खरोखरीच थोडयाच कालावधीनंतर पुरवठाखातें बंद पडलें. त्याची आवश्यकता संपली. स्थानिक स्वराज्य, जंगल, व विकास हीं खातीं त्यांच्याकडे आलीं. यशवंतरावांना नवीन खात्यांतील अनुभवाची संधी मिळाली. लोकशाहीमध्ये ग्राम-पंचायतीना खूपच महत्त्व आहे. ग्रामपंचायतीमध्ये गावांच्या कर्तबगारीचें उद्यम शीलतेचें प्रतिबिंब पडलेलें असतें. भारत हा अनेक खेडयांचा बनलेला देश आहे. ग्रामीण भागाची, जनतेची सुधारणा होणें म्हणजेच भारताची सुधारणा होण्यासारखें आहे. शाळा, ग्रामपंचायत व सहकारी सोसायटी या तीन संस्था परिणामकारक रीतीने काम करणाऱ्या नसतील तर गावाची प्रगति होणार नाही. ग्रामीण जनतेच्या अडीअडचणी, त्यांच्या गरजा, त्यांच्या भावना व कल्पना, त्यांची विचार करण्याची पद्धति, एखाद्या घटनेमुळे त्यांचीं होणारी प्रतिक्रिया—या साऱ्या गोष्टींचें पुढाऱ्याला, नेत्याला जर सम्यक् ज्ञान असेल तरच तो त्यांच्या सुधारणेचा मार्ग आखूं शकेल, शहरीं वातावरणांत राहिलेल्या माणसाला प्रत्यक्ष खेडयांतील अनुभव काय असतात हें नुसतें कल्पनेने समजणार नाही. यशवंतरावांचें जवळजवळ सारें जीवन खेडयांतून गेलें असल्यामुळे, वेगवेगळया नैमित्तिक राजकीय कामामुळे आपल्याच नव्हे तर महाराष्ट्रांतील कित्येक खेडयांचें प्रत्यक्ष, वास्तववादी चित्र त्यांच्या डोळयासमोर उभें

आहे. गामपंचायतींच्या प्रगतींतील, विकासक्रमांतील अडथळे, त्यांच्या उणीवा व मर्यादा त्यांना संपूर्णपणे ज्ञात आहेत. राज्य-कारभाराचें व लोकशाहीचें शिक्षण देणारी संस्था या दृष्टीने ग्रामपंचायतीचें महत्त्व त्यांनी अचूक हेरलें आहे आणि त्या दृष्टीने त्यांनी १९५४ सालीं राज्याच्या पातळीवर ग्रामपंचायत संघाची स्थापना केली. पुणें येथे ग्रामपंचायत संघाच्या अधि-वेशनाचें उद्‌घाटन करतांना ते म्हणाले, "ग्रामपंचायती या केवळ खेडेगावच्या नागरी कारभार चालविणाऱ्या यंत्रणा नव्हेत तर त्यांचेवर खेडेगावांतील समाजजीवनाचें सर्व तऱ्हेचें कल्याण करण्याची जबाबदारी आहे. सरकार अशा विचारांत आहे की, मोठमोठ्या ग्रामपंचायतीकडे सारा वसुलीचें काम द्यावें. पंचा-यतीच्या सभासदांनी आणि अधिकाऱ्यांनी स्वतःच्या हितापेक्षा सामाजिक हितास अधिक प्राधान्य द्यावें अशी त्यांना माझी विनंती आहे." बडोद्याला ते "म्हणाले, ग्रामपंचायतींनी नागरी जीवनाच्या सुखसोयी पुरवण्यापुरतेंच आपलें कार्य मर्यादित करूं नये. त्यांनी ग्रामीण जीवनाच्या आर्थिक व सामाजिक उन्नती-साठी झटावें. पंचायत ही केवळ स्थानिक स्वराज्याचा घटक नसून ती लोकशाही यंत्रणेचा पाया आहे."

जंगलें हीं राष्ट्राची संपत्ति आहे व त्या संपत्तीचें संरक्षण व संवर्धन व्हावें यासाठीहि त्यांनी खूप तळमळीने कार्य केलें.

ह्या प्रत्येक खात्यांतून, वेगवेगळ्या भूमिकांतून काम करीत असतांना केवळ आपल्यावर तें काम पडलें आहे, तें कसेंतरी पार पाडलें पाहिजे अशी भावना त्यांनी कधी बाळगली नाही. स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षम, परिणामक्षम व सुव्यवस्थित कशा होतील याचा ते नेहमी विचार करीत असत. त्यादृष्टीने

युरोप, अमेरिका इत्यादि ठिकाणीं स्थानिक संस्था कशा कारभार करीत आहेत याचा त्यांनी जाणीवपूर्वक अभ्यास केला. ही प्रयोगशीलता, उद्यमशीलता व संस्कारक्षमता त्यांच्या अभ्युदयास बऱ्याच अंशी कारणीभूत झाली आहे.

## ५

"………मुंबई कोठें आहे याचें उत्तर भूगोलाच्या परिभाषेंत द्यावें लागेल. मुंबई भौगोलिक दृष्टचा महाराष्ट्रांतच आहे. हें आजपर्यंत कोणी नाकारलें नाही. इतिहास कांही गोष्टी दडवून ठेवत असेल पण भूगोल कांही दडवूं शकत नाही………"

भारतांत निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक आहेत, कोणतेंहि तत्त्व डोळ्यांसमोर न ठेवतां, लोकांच्या सोयींचा, त्यांच्या विकासाचा विचार न करतां, राज्यकारभाराच्या सोयीनुसार ब्रिटिशांनी वेगवेगळे प्रांत पाडले होते. त्यामुळे एकच भाषा बोलणारे लोक वेगवेगळ्या प्रांतांतून किंवा राज्यांतून विभागले गेले होते. उदाहरणार्थ मराठी भाषा बोलणारी जनता मुंबई, कर्नाटक, मध्यप्रदेश, म्हैसूर संस्थान इत्यादि विभागांतून विभागली होती. त्यावेळी (व अजूनहि थोड्याफार प्रमाणांत) राज्यकारभार हा बराचसा इंग्रजी भाषेंतून चालला होता. त्यामुळे सरकारी अधिकारी, मोठे कार्यकर्ते व सर्वसामान्य जनता यांच्यामध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली होती. इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय सभेच्या प्रारंभीच्या कामकाजांत इंग्रजीचेंच वर्चस्व होतें. राष्ट्रीय सभेची वैचारिक भूमिका समाजांतील सर्व थरांत प्रसृत व्हावयाची

असेल तर लोकांच्या भाषेंतून विचारांचा प्रसार व्हावयास हवा हें प्रथम महात्मा गांधींनी ओळखलें.

लोकांनी मनापासून राज्यकारभारांत भाग घ्यावा असें वाटत असेल, खऱ्या अर्थानें लोकशाही राज्य असावें असें वाटत असेल तर लोकांची भाषा राज्यकारभाराच्या सर्व थरांतून चालावयास पाहिजे ही गोष्ट कोणीहि अमान्य करणार नाही. १९२० सालापासून काँग्रेसनेत्यांना याचें महत्व पटलें होतें व काँग्रेससंघटनेची पुनर्घटना भाषिक तत्त्वावर व्हावयास सुरवात झाली व ज्या ज्या वेळीं हा प्रश्न उपस्थित होई त्या त्या वेळीं, "काँग्रेसच्या हातीं राज्यसत्ता येतांच भाषिक तत्त्वांवर प्रांताची पुनर्रचना करण्याचें कार्य काँग्रेस पार पाडील" असें आश्वासन नेते प्रगटपणे देत होते. त्यावेळेपासून भाषिक प्रश्न हा राष्ट्र–वादाच्या एका मोठ्या भावनेचें अंग होऊन बसला होता.

महाराष्ट्राच्या दृष्टीने पाहिलें तर लो. टिळकांनीसुद्धा "भारतांत लोकशाही यशस्वी व्हावी यासाठी एकभाषी राज्यें निर्माण केलीं पाहिजेत" असें निःसंदिग्ध आपलें मत मांडलें होतें. त्याचप्रमाणे श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. म. म. पोतदार, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. माडखोलकर, श्री. दा. वि. गोखले, बॅ. रामराव देशमुख, श्री. धनंजयराव गाडगीळ, श्री. शंकरराव देव इत्यादि मंडळींनी त्यानंतर या दिशेने प्रयत्न केले. व सुरुवातीला श्री. स. का. पाटीलहि या बाबतींत प्रयत्न करणारां–मध्ये होते. त्यानंतर श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. भाऊसाहेब हिरे यामध्ये सामील झाले.

१९४८ सालीं दार कमिशनची नेमणूक झाली. व तिने मुंबईचा महाराष्ट्रांत समावेश न करण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे मुंबईंतील धनिक उद्योगपतीहि मुंबई महाराष्ट्रांत

घालण्यास जोराचा विरोध करूं लागले. त्यानंतर आंध्रमधील जनतेने आपल्या स्वतंत्र भाषिक राज्याची तीव्रतेने मागणी केली व त्यांनी आपलें वेगळें भाषिक राज्य मिळविलें. परत हा प्रश्न घसास लागला. त्यांतून फाजलअल्ली कमिशनची नेमणूक झाली. त्यांनीहि सरतेशेवटी मुंबई एकटया महाराष्ट्रांत घालण्यास नकार दिला. कमिशनचा असा अहवाल होणार म्हणून वृत्तपत्रामध्ये अगोदरच बातमी फुटली होती. म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने संयुक्त महाराष्ट्राचा जोरदार पुरस्कार केला. फाजलअल्ली कमिशनने समतोल द्विभाषिकाचा पुरस्कार केला व स्वतंत्र विदर्भाची मागणी मान्य केली.

यशवंतराव सुरुवातीला समतोल द्विभाषिकाचे विरोधक होते. काँग्रेसश्रेष्ठींच्या निमंत्रणानुसार श्री. शंकरराव देव, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. भाऊसाहेब हिरे व श्री. यशवंतराव चव्हाण इत्यादि काँग्रेस कार्यकर्ते दिल्लीला गेले. श्री. शंकररावांनी अचानक द्विभाषिकाची भूमिका घेतली. अशा बैठकीस भूमिका सोडून जावयास यशवंतराव तयार नव्हते. परंतु शेवटीं सर्वांच्या विनंतीला मान देऊन ते गेले. नंतर अनेक पर्याय निघूं लागले. मुंबई महाराष्ट्रांत येत नाही असें पाहतांच मुंबईतील जनतेमध्ये क्षोभ निर्माण झाला, जनता प्रक्षुब्ध झाली व दंग्याला सुरुवात झाली. त्यामुळे मुंबई ही केंद्रशासित ठेवावी अशी कल्पना निघाली. ही कल्पना महाराष्ट्रांतील जनतेला मुळांतच मान्य होण्यासारखी नव्हती. परंतु दंगा सुरूं झाला व मुंबईमध्ये नाहक गोळीबार झाला. लोकांना शांत करण्याचे प्रयत्न फसूं लागले. त्यानंतर पंडित नेहरूंनी मुंबई केंद्रशासित ठेवण्याचा निर्णय हा त्रिकालाबाधित नाही; हा एक प्रयोग आहे; पांच वर्षांनी तुम्ही हा निर्णय बदलून घेऊं शकाल. अशी सूचना केली. तरी लोकांचा

असंतोष ओसरण्याचीं चिन्हें दिसेनात. मध्येच आपल्या अधिकारांत संयुक्त महाराष्ट्र परिषदेचें विसर्जन करून श्री. शंकरराव देव मोकळे झाले.

काँग्रेसनेते चळवळींतून बाजूला झाले. चळवळीचें नेतृत्व कोणीं करावें असा प्रश्न उभा राहिला. साहजिकच स्फटिकासारखें शुद्ध चारित्र्य असलेली, प्रखर तत्त्वनिष्ठा असलेली एस्. एम्. सारखी व्यक्ति पुढे झाली. आणि ही ऐतिहासिक जबाबदारी अत्यंत कौशल्याने व संयमाने त्यांनी शेवटपर्यंत पार पाडली. विविध पक्षांतील व अपक्ष नेत्यांना व जनतेला शेवटपर्यंत एका भावनेच्या पातळीवर ठेवणें हें किती दुष्कर व दुर्घट होतें हें सर्वांच्या प्रत्ययाला चांगलेंच आलें आहे. त्यांच्यासारखी दीर्घ तपश्चर्या व उत्कृष्ट ध्येयवाद असलेली व्यक्ति त्याठिकाणीं नसती तर समिति शेवटपर्यंत अभंग राहिली असती कीं नाही अशी शंका निर्माण व्हावी इतकें त्यांचें व्यक्तिमत्त्व प्रभावी व मार्गदर्शक ठरलें. त्यांच्या संयमी नेतृत्वामुळे व विवेकीभूमिकेमुळे पुढे झालेल्या निवडणुकांत समितीला मोठ्या प्रमाणांवर विजय मिळाला. त्यांच्या नेतृत्वाचा महाराष्ट्राला फायदा झाला.

त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेतमध्ये राजीनाम्याचा प्रश्न निघाला. अशा गोंधळलेल्या परिस्थितींत राजीनामे देणें म्हणजे अराजकतेला संधि मिळाल्यासारखें होईल. म्हणून राजिनामे देण्याचे यशवंतरावांनी नाकारले. व शंकरराव देवांच्या चंचल निर्णय घेण्यामुळे पक्षशिस्त बिघडते म्हणून त्यांचें नेतृत्व खेदाने यशवंतरावांनी झुगारून दिलें. फलटणला असतांनाच "संयुक्त महाराष्ट्र आणि पं. नेहरू यांच्यापैकी कोणती तरी एक गोष्ट स्वीकारण्याचा प्रश्न पुढे आला तर मी पंडित नेहरूंना अग्रहक्क

देईन," असें त्यांनी जाहीर केलें. त्यावेळपर्यंतसुद्धा मुंबईबद्दलची भूमिका त्यांनी सोडली नव्हती. तरी महाराष्ट्रीयेतर लोकांना आपली भूमिका पटल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. असें त्यांनी घोषित केलें.

त्यांच्या या भूमिकेचा खूप विपर्यास झाला. निंदेचा भडिमार झाला. टीकेच्या तोफांचा गडगडाट सुरूं करण्यांत आला. काँग्रेसच्या पुढाऱ्यांची हेटाळणी व निंदा सुरूं झाली. काँग्रेसबद्दल छद्मीपणें व अवहेलतेने बोललें जाऊं लागलें. वैयक्तिक निंदेचा गदारोळ उडविण्यांत आला. काँग्रेस व तिचे नेते यांच्यावर टीका करण्यांत अहमहमिका लागली. वाणींचा व लेखणीचा उपयोग यशवंतरावांना बदनाम करण्याकडे होऊं लागला. लोकांना आपलें प्रामाणिक मत सांगण्याचा, आपली भूमिका पटवून देण्याचा मूलभूतहक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. सभांतून गोंधळ व हुल्लडबाजी सुरूं केली. वास्तविक संयुक्त महाराष्ट्रवादी नेत्यांना आपल्या मताची जर एवढी खात्री होती तर यशवंतराव व जनता यांच्या आड येण्याचें कांहीच कारण नव्हतें. सामान्य कुवतीच्या अर्धवट ज्ञानाच्या, तपश्चर्या, त्याग, पक्षनिष्ठा यांतील कांही नसणाऱ्या मंडळींना यशवंतरावांना शिव्या देऊन व श्रीशिवाजी महाराजांच्यापासून, फुले, आंबेडकर, रानडे, लो. टिळक इत्यादि झाडून थोर पुरुषांच्या नांवाचा जयजयकार करून सवंग लोकप्रियता मिळण्याची सुलभ संधि प्राप्त झाली होती.

यशवंतरावांच्या राजकीय कसोटीचा हा प्रसंग होता. परिस्थिति अशी होती की, सामर्थ्यवान माणसाचेंहि हृदय दुभंगून गेलें असतें. पण सह्याद्रींतील कणखरपणा व दणकटपणा यशवंतरावांच्या हाडीमाशीं पुरेपूर बाणला होता. अंगामध्ये चिवटपणा व चिकट–

पणा होता. शौर्याने व चिकाटीने लढण्याची जिद्द होती. प्रसंगीं आत्मार्पण करण्याची तयारी होती. मन व मनगट बळकट होतें. लो. टिळकांच्यावर 'सुरत कांग्रेस' च्यावेळीं असाच प्रसंग आला होता, पण तो प्रसंग कांही तासांचा होता. पण यशवंतराव भ्याले नाहीत, डगमगले नाहीत, घाबरले नाहीत, किंकर्तव्यमूढ झाले नाहीत, रणांगणांवरून पळून जावयाचे त्यांनी ठरविले नाही. महाराष्ट्राचा खराखुरा पुत्र होता तो! बाजी प्रभू, राजे संभाजी, मुरारबाजी यांचा वारसा होता. त्यांची परंपरा होती. त्यांनी लोकमताला धडक मारावयाची ठरविली. त्यांचा आवाकाच मोठा होता. मोठीं कामें आपण सहज करूं अशी जिद्द होती; आत्म-विश्वास होता. इतर एखाद्या व्यक्तीने राजकीय संन्यास घेतला असता. कारण तसें करणें सोपें असतें. तत्त्वज्ञानाचा मुलामा देऊन रणांगणावरून पळ काढणें सोपें होतें. परंतु हा सोपा व सुलभ मार्ग त्याच्या झुंजार प्रवृत्तीला व प्रकृतीला मानवणारा नव्हता.

मतभेदाचें, टीकेचें व अपमानाचें हालाहाल विष त्यांनी पचविलें. सांगलीला ते म्हणाले, "मला मुद्दाम बदनाम करा-वयाचें असेल तर तो उद्देश साध्य होईल कदाचित्; पण सत्य बदनाम होणार नाही. एक वेळ अशी येईल की जाहीरपणें नाही, किमान माझ्या कानांत तरी तुम्हीं हें कबूल कराल की १९५५-५६ मध्ये तुम्हीं जें बोललांत तें खरें होतें........ झगड्याने वैराने मुंबई मिळणार नाही आणि मिळाली तरी ती मुंबई असणार नाही ...... मी जो राजकारणांत आलों आहें तो सेवेचा अधिकार घेऊन आलों आहें. लोकांना मी आवडलों नाहीं तर मला असेंब्लींत पाठवूं नका; पण माझा सेवेचा अधिकार

कोणीहि काढून घेऊं शकणार नाही. तसाच मीहि कांही अगदीच पालापाचोळ्याचा नाहीं की विरोधाची फुंकर मारून मी उडून जाईन. पंचवीस वर्षांचें माझें राजकीय जीवन जनतेपुढे आहे, मी त्याची जाहीर चौकशी करून घेण्यास तयार आहे. यशवंतराव राजकारणांतून सहजासहजीं उठून जाणार नाही. कृष्णाकांठच्या पाण्यावर आणि मातीवर मीहि वाढलों आहें. मी म. गांधी, नेहरूंना मोठा म्हणतों म्हणून तक्रार आहे. त्यांना मोठे म्हणूं नको तर मग कोणत्या थोबाडाला म्हणूं ? स्वातंत्र्यदिनी घरावर काळें निशाण लावणाऱ्यांना कां मोठा म्हणूं ? कणाकणाने राबून ज्यांनी या देशाचें स्वातंत्र्य आणलें, या देशासाठी प्राणहि दिला त्यांना मोठे म्हणूं नको तर म्हणूं तरी कोणाला ?" राज्य-पुनर्रचना बिलावर असेंब्लींत ते म्हणाले, "मुंबई कोठे आहे याचें उत्तर भूगोलाने द्यावें लागेल आणि निसर्गाने तें आधीच देऊन ठेवलें आहे. मुंबई कोणाची याचें उत्तर भूगोलाच्या परिभाषेंतच मिळालें पाहिजे, आणि मुंबई भौगोलिक दृष्टया महाराष्ट्रांत आहे हें कोणीहि नाकारलें नाही. पं. नेहरूंनीहि ही गोष्ट मान्य केली आहे. इतिहास कांही गोष्टी दडवून ठेवत असेल, पण भूगोल कांही दडवूं शकत नाही." सातारला ते म्हणाले, "काँग्रेसपेक्षा देश मोठा आहे ही माझी भूमिका पूर्वी होती, व आजहि आहे. मी देवाजवळ काँग्रेस जगावी असें मागत नाही. सुराज्य मागतों. स्वातंत्र्य टिकावें असें मागतों" ते पुढे म्हणाले, "आपली मागणी न्याय्य आहे. तेव्हा ती मिळेल त्यांत शंका नाही. काळ वेळ लागेल, पण मिळेल. योग्य मार्गानेच जाऊन ती मिळवूं."

खूप ठिकाणीं विरोध होत होता. "अरे" म्हटले की, "कारे" म्हणण्याची सामान्य माणसाची वृत्ति असते. परंतु इतकी अमर्यादा सत्ता पाठीशीं असतांना त्याचा बदला न घेण्याचा मोह

फारच थोड्यांना टाळतां आला असता. परंतु ह्या सर्व प्रकारांमध्ये यशवंतराव शांत राहिले; स्थितप्रज्ञासारखी व कर्मयोग्यासारखी त्यांनी आपली दृष्टी ठेवली. त्यावेळीं, तशा प्रसंगीं यशवंतरावांची जीभ बेफाम, बेताल झाली नाही. तिने आपला उद्दामपणा व्यक्त केला नाही. या सर्व विरोधी शस्त्रां-वर त्यांनी आपले क्षमेचें व प्रेमाचें अस्त्र सोडलें; वाणीवर संयम ठेवला. आणि त्या संयमांतून त्यांना अपार शक्ति प्राप्त झाली. अनपेक्षित प्रसंगाच्यावेळीं व संकटाच्यावेळीं त्यांनी आपलें मन दोलायमन होऊं दिलें नाही. उलट बुद्धि स्थिर व निश्चल राखली. विरोधी लोकांच्या निर्भत्सनेवर, टीकेच्या माऱ्यावर क्षमेचें व प्रेमाचें अस्त्र सोडलें. विरोधीलोकांच्या टीकेचीं टोकें बोथट झालीं. त्यांना चिडविण्याचा खूप प्रयत्न केला. पण विरोधकांना यशस्वी होण्याची संधि यशवंतरावांनी दिली नाही. अर्थात त्यावेळीं त्यांनी विवेकी, संयमी, समतोल, शांततेची भूमिका स्वीकारली याचा अर्थ नेभळटपणाने ते वागले नाहीत. प्रत्येक ठिकाणी कितीहि प्रखर विरोध असला तरी ते निर्धाराने आपले विचार बोलतच. विरोधकांनी त्यांच्यासमोर एक डाव टाकला होता. यशवंतराव सत्तेवर असल्यामुळे त्यांच्यावर डाव उलट-विणें विरोधकांना सोपें होतें. विरोधाचा, दंगा करण्याचा, हुल्लडबाजीचा व निदर्शनांचा उच्चांक गाठावयाचा व परिस्थितीच अशी करून ठेवावयाची की, त्यांना लाठीमार, अश्रूधूर, गोळीबार करण्याची आवश्यकता भासावी. अन् ही संधि चालून आली की मराठी भाषेंतील अस्सल शब्द वापरून गाळीव विशेषणें काढून यशवंतरावांना लावावयाचीं व लोकांच्या प्राणहानीबद्दल अश्रू गाळून फडकीं ओलीं करावयाचीं. पण महा-राष्ट्राच्या सुदैवाने व कांही विरोधी मंडळींच्या दुर्दैवामुळे त्यांना

ही संधि मिळाली नाही. हे सर्व प्रकार होत असतांना यशवंतराव मेरुपर्वतासारखे निश्चल राहिले. आपला मार्ग बरोबर आहे हा विश्वास होता. अडचणीच्या प्रसंगी श्री. किसन वीर, श्री. पार्लेकर, श्री. वसंतराव पाटील यांच्यासारखे झुंजारवीर व त्यांचे सहकारी आपल्या पाठीशीं आहेत हा विश्वास होता.

यानंतर विदर्भासह विशाल द्वैभाषिक आलें. श्री. चिंतामणराव देशमुख, श्री. अशोक मेहता, आचार्य कृपलानी, श्री. ह. वि. कामथ, श्री. फिरोज गांधी इत्यादि मान्यवर नेत्यांनी व २८६ खासदारांनी ह्याला पाठिंबा दिला होता. यशवंतरावांनी द्वैभाषिक स्वीकारलें व तें राबविण्याची व चालविण्याची अनुकूलता त्यांनी दर्शविली. सुरुवातीला संयुक्त महाराष्ट्रवादी असणारे यशवंतराव द्विभाषिकाला कसे अनुकूल झाले असा सहज सुचण्यासारखा प्रश्न आहे. " भारताच्या निष्ठेला मीं माझें शिर एकदांच वाहिलेलें आहें " असें समर्पक उत्तर एकाच वाक्यांत त्यांनी दिलें. संसदीय लोकशाहीमध्ये लोकसभेचे निर्णय हे प्रामाणिकपणे व बिनतक्रार मान्य केले पाहिजेत. लोकसभा जे जे निर्णय घेईल ते ते सर्व बरोबर असतील असें नाही. परंतु सुरुवातीला शिस्त म्हणून मानावेत, विश्वास व निष्ठा ठेऊन आदेश पाळावा. त्यांतूनहि न पडल्यास प्रतिनिधींचें मतपरिवर्तन करून आदेश वा निर्णय बदलून घेण्याची संधि आहेच असें त्यांचें ह्याबाबत धोरण होतें. शिवाय एकदा का फुटीरपणाची, संसदेचे निर्णय डावलण्याची संवय जोपासली तर राष्ट्राच्या एकात्मतेच्या दृष्टीने परिणामी ते घातुक ठरेल, आणि मग देशाचें दुर्दैव जवळ येण्यास विशेष अवकाश राहणार नाही.

शेवटीं द्विभाषिक चालविण्याची जबाबदारी यशवंत-रावांच्यावर पडली. महाराष्ट्रांतील लोकांनी आजपर्यंत मिळविलें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत.

खूप परंतु त्यांना कोणतीहि गोष्ट टिकवितां येत नाही. मराठे राज्य मिळवतील पण राज्य चालविण्याची पात्रता व कुवत त्यांच्या ठिकाणीं नाही. आपआपसांत भांडणारे व त्यांत नाश पावणारे इत्यादि गैरसमजुती आणि अनेक पूर्वग्रह महाराष्ट्राबद्दल इतर प्रांतियांच्यामध्ये होते. यशवंतरावांनी आपल्या कर्तृत्वाने या सर्व आरोपाला चोख उत्तर दिलें आहे. मराठे राज्य करतील, चालवतील, एवढेंच नव्हे तर इतरांपेक्षा कांकणभर जास्त पण कमी नाही हें महाराष्ट्राच्या थोर सुपुत्राने, महान नेत्याने सिद्ध करून दिलें. कारभाराच्या दृष्टीने त्यांनी अत्यंत हळुवारतेचीं व सावधानतेचीं पाऊलें टाकलीं. बरेचसे नाजुक प्रश्न रेशमी हाताने, कौशल्याने व मुत्सद्देगिरीनें हाताळले. सौजन्यपूर्ण व स्नेहशील वागणुकीने विरोधकांचे मित्र झाले. दूर गेलेले जवळ येऊं लागले. मुंबईला कामगारांच्या वतीने झालेल्या सत्कारप्रसंगीं श्री. कन्हैयालाल मुन्शी म्हणतात, "आतापर्यंत दोन मुख्यमंत्री झाले. ते सर्वसाधारण परिस्थितींत अधिकारावर येऊन त्यांना त्यांच्या सर्व कारकीर्दींत जें यश मिळालें नाही त्याहून अधिक यश यशवंतरावांनी राज्याच्या स्फोटक आणि अस्थिर अवस्थेंत मुख्य-मंत्रीपदाची जबाबदारी पत्करून अवघ्या एका वर्षांत मिळविलें. यक्षिणींच्या कांडीप्रमाणे त्यांनी सर्व गोंधळाच्या परिस्थितींत फरक केला. आणि शांततामय लोकशाही वातावरण निर्माण केलें. मीहि गृहमंत्री होतों. मला या जबाबदारीची जाणीव आहे. बंदुकीच्या सहाय्याशिवाय आम्ही संपूर्ण शांतता राखू शकलों नाही. त्यांनी आपल्या गोड स्वभावाने व बंदुकीच्या सहाय्या-शिवाय बिकट परिस्थितींत शांततामय व लोकशाही वातावरण निर्माण केलें आहे. काँग्रेसच्या तरुण रक्ताचा व पुरोगामी विचाराचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे यशवंतराव हेच होत." त्यांच्या

कार्याची, प्रशासनाची सर्वजण तोंडभर स्तुती करूं लागले, प्रशंसा करूं लागले.

परंतु जनता समाधानी नाही, उत्साही नाही, विकासकार्यांत ती रस घेत नाही, ती कार्यविन्मुख आहे असे त्यांना वाटू लागले. तरीपण शेवटीं पं. नेहरू, इंदिरा गांधी, ह्यांनी या प्रश्नाला परत चालना दिली. त्याशिवाय लोकसभेंत श्री. नाथ पै, श्री. र. के. खाडिलकर यांच्यासारखे नेते प्रयत्न करीत होते. जयप्रकाशांचाहि नैतिक पाठिंबा होताच. याकरितां नेहरूंना यशवंतरावांना त्यांची संमति विचारणें आवश्यक होते. तीन-चार वर्षें उत्कृष्ट कारभार केल्यामुळे व त्याच्या आगोदरपासूनहि वरीष्ठ मंडळींमध्ये त्यांच्याबद्दल आदर व विश्वास निर्माण झाला होता. त्याचाहि संयुक्त महाराष्ट्र निर्मितीला फार मोठा उपयोग होऊं लागला. यशवंतरावांचें मत निर्णायक ठरलें. त्यांच्या मताला विशेष किंमत होती. त्यांनी प्रांजलपणें नेहरूंना सांगितलें की, मी द्विभाषिकाचा कारभार यशस्वीरीत्या करूं शकलों असलों तरी जनतेचें संपूर्ण समाधान मी करूं शकलों नाहीं. या सर्वांचा परिणाम म्हणजे लोकसभेने मुंबईसह महाराष्ट्र मान्य केला. जनतेच्या मनाची कदर राखली गेली. लोकशाहीचा विजय झाला. लोकांच्या मतांचा गौरव झाला. साडेतीन कोटी मराठी जनतेने उराशीं बाळगलेलें स्वप्न साकार झालें. महाराष्ट्राचें भाग्य उदयास आलें. महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला संधि मिळाली; पराक्रमाला आव्हान मिळालें.

पण संयुक्त महाराष्ट्राच्या उत्साहांत एक न्यून राहिलें आहे. बेळगांव व कारवारचा भाग हा महाराष्ट्रांत सामील व्हावयास हवा आहे. मराठी भाषिकांची ती न्याय आकांक्षा आहे. केवळ महाराष्ट्रांतील जनतेला बेळगांव-कारवार भाग आपल्यांत

यावा असें वाटतें असें नाही. त्या सीमा विभागांतील जनता महाराष्ट्रांत यावयास केव्हा मिळते म्हणून वाट पहात आहे, त्याकरितां तळमळत आहे. प्रयत्नांची पराकाष्टा करीत आहे. वास्तविक हा प्रश्न मागेच सुटला असता. पहिल्यापासून मराठी नेते ह्याबाबत जागरूक राहिले असते तर ह्या प्रश्नाबाबत इतकी गळचेपी झालीच नसती. महाराष्ट्र एकीकरण समिति व संयुक्त महाराष्ट्र समिति ह्यांनीहि हा प्रश्न सारखा जागता ठेवला व वातावरण जिवंत ठेवण्यास मदत केली. आजपर्यंतच्या मराठी नेत्यांनी आपल्या बुद्धिवादाचें व मुत्सद्देगिरीचें दिवाळें काढलें नसतें तर ह्या प्रश्नाची इतकी गुंतागुंत झाली नसती. ह्या सीमा विभागाबाबत स्वत: यशवंतरावांनी १ मार्च १९६० मध्यें विधान-सभेंत ठराव मांडला व सर्वांनी एकमुखी पाठिंबा दिला. त्यावेळच्या द्विभाषिक विधानसभेंत गुजराती आमदारांचा व नामदारांचा पाठिंबाहि यशवंतरावांनी मिळविला. मागणीला नैतिक वजन आणलें. हा प्रश्न सुटावा म्हणून सीमेच्या विभागांतील लोकांइतकीच यशवंतरावांची कळकळ आहे. त्याकरितां ते सारखे वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करीत आहेत. आपली न्याय व रास्त भूमिका पटवून देण्याची शिकस्त करीत आहेत. खेडें हा घटक धरावा आणि भाषिक बहुसंख्या आणि सलगतता या तत्त्वांवर सीमेचा प्रश्न सोडवावा अशी तर्कशुद्ध आणि योग्य भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. सुरुवातीला हा प्रश्न सुटलेला आहे तो परत उपस्थित करावयाचें कारण नाही अशी हट्टी व अन्यायी भूमिका घेणारे म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. जत्ती आताशीं चर्चा करावयास व लवाद नेमण्याच्या सूचनेला मान्यता देण्यास तयार झाले आहेत. नजीकच्या भविष्यकाळांत यशवंतरावांच्या वास्तववादी भूमिकेने, मागणी मांडण्याच्या पद्धतीने, समाज नेतृत्वाने व विधायक

मुत्सद्देगिरीने हा प्रश्न सुटेल अशी सर्वांची आशा आहे. तो भाग्याचा व आनंदाचा दिवस लवकर येवो हीच इच्छा व परमेश्वराजवळ प्रार्थना ! संयुक्त महाराष्ट्राचा जयजयकार असो ! संयुक्त महाराष्ट्र संपन्न व चिरायु होवो ! !

## ६

### " वक्ता दशसहस्रेषु । "

हें युग लोकशाहीचें आहे. वक्तृत्त्वाचा वेल लोकशाहीमध्ये फोफावतो. ज्या ठिकाणीं मतस्वातंत्र्य असेल, आणि व्यक्ति स्वातंत्र्याला अवसर असेल त्या ठिकाणीं निर्भयपणें मतप्रतिपादन करतां येतें. तेथेच विचाराला उत्तुंगता प्राप्त होते. मानवाची सांस्कृतिक, अध्यात्मिक व नैतिक उन्नति अशाच ठिकाणी व अशाच मोकळ्या व खुल्या वातावरणांत होते. लोकशाहीमध्ये शब्दांना विलक्षण महत्त्व प्राप्त होतें. विचारांची देवाणघेवाण चालू असते. सत्तारूढ पक्षाला आपले निर्णय व आपलें धोरण जनतेला पटवून द्यावयाचें असतें. वक्तृत्त्वाच्या जोरावर डेमॉस्थिनीस व सिसरो यांनी राष्ट्राला नवचैतन्य दिलें; राष्ट्रांमध्ये जिवंतपणा निर्माण केला. लो. टिळकांनीं आपल्या सिंहगर्जनेने भारत दुमदूमून सोडला होता.

त्यादृष्टीने पाहतां यशवंतरावांना वक्तृत्त्वाची अमोलिक देणगी प्राप्त झाली आहे. लहानपणापासून मनांतील विचार व्यक्त करण्याची त्यांची धडपड दिसून येते. हायस्कूलमध्ये असतांनाच स्पर्धेकरितां प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड झाली. स्पर्धा पुण्यालाच होत्या. श्री. माटे, श्री. केळकर, श्री. करंदीकर असे

चोखंदळ व मार्मिक परीक्षक होते. यशवंतरावांना आयत्यावेळी आलेला विषय 'ग्रामसुधारणा !' बोलण्याला वेळ दहा मिनिटें, यशवंतरावांचें भाषण सर्वांना आवडलें. दहा मिनिटें आणखी देण्यांत आली. पहिला क्रमांक मिळाला. १५० रु. चें बक्षीस मिळालें. धडपडीचें चीज झालें. आत्मविश्वास द्विगुणित झाला. ग्रामसुधारणेवर दहा मिनिटें बोलले. आयुष्यभर ग्रामसुधारणा प्रत्यक्ष केली. शाळा कॉलेजांत बोलणारे खूप असतात. बक्षीसें, प्रशस्तिपत्रकें, रौप्यपदकेंहि खूपजण मिळवितात. स्पर्धेच्या दृष्टीने विषयाची तयारी करतात. स्पर्धा संपते. बक्षीस मिळतें. आणि सारें संपतें. आयुष्यभर ते विद्यार्थी मूक राहतात. पण यशवंत-रावांना केवळ स्पर्धेकरितां बोलावयाचें नव्हतें. मनात उर्मि येत होती व ती उर्मि, खळबळ, ज्वलंत भावना त्यांना बोलावयास भाग पाडित होती. आता त्यांना आयुष्यभर बोलावयाचें होतें. तें तर व्रतच घेतलें होतें. त्याकरितां अभ्यासाची, दीर्घ परिश्रमांची खोल व्यासंगाची जरुरी होती. पण सुरुवातीपासून त्यांनी निष्ठापूर्वक व विचारपूर्वक परिश्रम घेतले, प्रदीर्घ वाचन केलें. त्यावर मनन व चिंतन केलें. कारण वक्त्याच्या भाषणाचा चिरस्मरणीय परिणाम व्हावयाचा असेल, त्याचें व्याख्यान संस्मरणीय ठरावयाचें असेल, लोकांनी त्यापासून चिरंतन स्फूर्ति घ्यावी असें वाटत असेल, विचारांना शाश्वतता यावयाची असेल तर वक्तृत्वाला अध्ययनाची, व्यासंगाची जोड पाहिजे हें त्यांनी जाणलें होतें. व त्याकरितां स्वतंत्र विचार करण्याची, बुद्धिवादी पद्धतीने विचार मांडण्याची संवय ठेवली. वाचन चौफेर व विस्तृत ठेवलें.

माझ्या मतें यासर्व असामान्य व प्रभावी वक्तृत्वाला जर सर्वांत प्रामुख्याने कोणती गोष्ट कारणीभूत झाली असेल तर

त्यांच्या ठायीं असलेला आत्मविश्वास. माणसाच्या ठिकाणचा आत्मविश्वास वजा केला तर हालचाल करणारें तें एक निर्जीव यंत्र ठरेल. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या वेळीं "मला जें कांही जनतेला सांगावयाचें आहे तें लोकांना पटेल ही भीति समितीच्या पुढाऱ्यांना वाटते म्हणून माझा आवाज जनतेपर्यंत पोहोचण्याच्या मार्गांत हे अडथळे निर्माण करत आहेत." हे त्यांनी काढलेले उद्गार त्यांच्या स्वत:विषयीच्या आत्मविश्वासाचें द्योतक आहेत. पहिल्यापासून त्यांना स्वसामर्थ्याची जाणीव झालेली आहे. कित्येकांना स्वतःबद्दलच संपूर्ण ज्ञान झालेलें नसतें. अंगीकृत कार्यावर श्रद्धा असल्याशिवाय व प्रखर ध्येयनिष्ठा असल्याशिवाय माणसाच्या अंगीं आत्मविश्वास निर्माण होत नाही.

लोक त्यांचें भाषण मंत्रमुग्ध होऊन ऐकतात. लोकांच्या पौरुषाला, पराक्रमाला, सत्वाला त्यांच्या विचारांतून आव्हान मिळतें. कांही वेळां तर साक्षात् ध्येयवाद त्यांच्या रूपाने बोलत आहे असें वाटतें. पुण्याला काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरांत आक्टोबर १९६० सालीं बोलतांना ते म्हणाले, "आम्हांला राजकारणांत तुम्ही या; सभा, व्याख्यानें द्या, म्हणून कोणी आमंत्रण दिलें नव्हतें. आम्ही स्वेच्छेने ह्यांत सामील झालों आहोंत. जंगलांत कोणी बुद्धिपुरस्सर झाडें लावीत नाही. तरी तीं झाडें शेकडों फूट उंच वाढतात. राजकारणाची ज्याला गोडी वाटत असेल, सेवेची गोडी असेल, फळाची इच्छा न धरतां, इतर कोणती अपेक्षा न करतां, ध्येयवादाने काम करावयाचें आहे त्याला येथे निश्चित संधि आहे, वाव आहे."

बोलण्याच्या ओघांत कांही शब्दांच्या ते सहज व्याख्या करून जात. पुणें येथे एकदां ते म्हणाले, "कार्यकर्ता म्हणजे

नुसता व्यासपीठावर सभा सांगणारा नव्हे तर कोणत्याहि प्रसंगी हाक दिल्यावर ज्या भोवती शेपन्नास सहकारी गोळा होतात, धावून येतात, हाकेला ओ देतात तो खरा कार्यकर्ता." बऱ्याचवेळीं त्यांच्या छोटद्या छोटद्या वाक्यांमध्ये खूप अर्थ भरलेला असतो.

वक्त्याला काय बोलावें यापेक्षां काय बोलूं नये हें कळावें लागतें. आपलें भाषण कुठे व केव्हा संपवावें हें उमजावें लागतें. आपल्याला जें सांगावयाचें आहे तें सुरुवातीला अगदी संथ रीतीने सांगतात. जें सांगावयाचें आहे त्या मुद्याला एकदम हात घालतात. प्रश्नाची पार्श्वभूमी व त्यांतील टप्पे समजावून देतात, व मग आपला हुकमी एक्का बाहेर काढतात. लोखंड तापल्यावरच घाव मारावा लागतो तरच तो वर्मी बसतो.

वक्तृत्वाला बऱ्याचवेळीं आकर्षक व्यक्तिमत्वाचा फायदा होतो. यशवंतरावांचें व्यक्तिमत्व हें सौजन्यशील व त्याबरोबरच डौलदार व रुबाबदार आहे. त्यांच्या बोलण्यामध्ये डौल दिसून येतो. बोलण्यांत एक प्रकारची शान व झलक दिसून येते. सांगण्याची विशिष्ट शैली असते. बोलण्यामध्ये गोडवा असतो. उच्चारामध्ये ऋजुता असते. मधूनच शालीनता प्रगट होते. व त्यांच्या वक्तृत्वाची छाप पडते. एका ठिकाणीं "साध्य आणि साधन" याचा विचार व यांतील भेद स्पष्ट करून सांगताना ते म्हणतात, "राज्य चालविणें हें आपलें साध्य नाही. तुम्हा आम्हांला शेवटीं जें कांही निर्माण करावयाचें आहे त्याचें तें एक साधन आहे. हें नवें राज्य बनवायच्या मागची कल्पना तरी काय आहे? कोणीतरी मुख्यमंत्री बनावें, आणि इतर कांहीजणांनी मंत्री बनावें, एवढ्यासाठीच जर राज्यें बनवावयाचीं असतील तर मीं म्हणेन की हीं राज्यांचीं दुकानें बंद झालीं तर उत्तम. मला त्यांत कांहीहि

वाटणार नाही. देशाचें राज्य, देशांतलें स्वराज्य हें एका विशिष्ट ध्येयासाठी स्थापन झालें आहे. देशाला मोठें करावयाचें हें तें ध्येय. देश मोठीं करावयाचा म्हणजे देशाचा भूगोल नव्हे तर इतिहास मोठा करावयाचा. म्हणजेच बुद्धी व शील व अशाच अनेक तऱ्हेच्या गुणांनी मोठी असणारीं माणसें आपल्या देशांत निर्माण करावयाचीं. हें काम तुम्हा आम्हांला करावयाचें आहे. एका मोठ्या सामाजिक आणि आर्थिक ध्येयवादाच्या दिशेने आपण आपलीं पावलें टाकण्याचा प्रयत्न करीत आहोंत आणि त्याचें साधन आपलें हें राज्य आहे."

भाषण कार्यकर्त्यांच्या समोर असो, दुय्यम शाळेंतील विद्यार्थ्यांच्या समोर असो, महाविद्यालयीन विद्यार्थि असोत, शेतकरी परिषद असो, सरकारी अधिकारी असो, तसेंच विधान-परिषद, साहित्यिक परिषद, विकास अधिकाऱ्यांची परिषद, रंगभूमीचें उद्‌घाटन, तरुणांचा मेळावा, अर्थशास्त्रज्ञांची परिषद कोठेंहि ते बोलतांना श्रोत्यांना रंगवून व गुंगवून सोडतात. निवेदनाच्या कौशल्याने साऱ्यांचें रंजन करतात. आपल्या वक्तृत्व शैलीने व वाक्‌कौशल्याने हजारों लोकांचीं अंत:करणें ते काबीज करतात.

उत्कृष्ट वक्ता हा एका अर्थाने उत्कृष्ट साहित्यिक असतो. साहित्याची त्याला आवड असते, काव्याचें तो सुंदर रीतीने रसग्रहण करतो. प्रतिभाशाली लेखकांच्या व कवींच्या साहित्य-कृति त्याच्या डोळ्यांखालून गेल्याशिवाय राहत नाही. तरच त्याच्या बोलण्यामध्ये भाषेची सफाई, प्रसाद, उच्च अभिरुचीचा अविष्कार दिसून येईल. विदर्भ साहित्य संमेलनाच्या विसाव्या अधिवेशनांत ते म्हणतात, "निव्वळ शब्दलालित्याच्या भरीस

न पडतां ज्ञानेश्वर, टिळक, आगरकर यांच्या उज्ज्वल साहित्य परंपरा लक्षांत घेऊन मराठी साहित्यिकांनी मानवतावादी साहित्य निर्माण करावें. ज्ञानेश्वरांच्या वाङमयांतील वेग मानवतावादी होता. त्यांनी एवढ्या लांब पल्ल्याची उडी घेतली की. त्यांची बरोबरी कोणालाच करतां आली नाही. संत वाङमयाने मराठी भाषेला महान् ठेवा दिला आहे. निव्वळ शब्दलालित्याच्या मागे लागून भागणार नाही, त्यांत मानवता ओतली पाहिजे. समाजाला प्रगतीच्या दृष्टीनें पुढें नेणारें सामर्थ्य शब्दांत निर्माण व्हावयास हवें. ही वाट जे शब्द दाखविणार नाहीत ते शब्दच नव्हेत! राजकारणी लोक जगाचें पाऊल निश्चित प्रगतीकडे टाकू शकणार नाहीत पण साहित्यिकांना शब्दांच्या जोरावर मंगलतेकडे व प्रगतिकडे जगाचें पाऊल नेतां येईल. साहित्यिकाला भाषेच्या व राज्याच्या मर्यादा नकोत. साहित्य हें अमर्याद असावें. प्रगतीकडे नेणारें साहित्य निर्माण करा" अशा त्यांच्या व्याख्यानांतून संतांच्याबद्दल आदर, साहित्याचा व्यासंग, उच्च अभिरुची, उत्कट बुद्धिवाद, देशाविषयी व मानवतेविषयी गाढ प्रेम, ह्या गोष्टी आढळून येतात. लोकांच्याबद्दल त्यांच्या मनांत अपार सहानुभूति वसत असते व थोर विचारांची बैठक आचाराला असते. आणि म्हणूनच सहानुभूतीच्या व आपुलकीच्या कडा रुंदावतात व विस्तारतात.

तरुणांपुढे बोलतांना त्यांच्या बोलण्याला वेग येतो, भाषा जास्त ओघवती होते. शब्दांमागे विचार धांवत असतात. त्यांतून तेजस्वी विचार प्रसवतात. तरुणांना निकोप व तेजस्वी मार्गदर्शनाचा लाभ होतो. कांही तरी नवीन ऐकल्याचा, मूलगामी शिकल्याचा, साऱ्या जीवनाला छेडून, स्पर्श करून जाणारे ऐकल्याचा प्रत्यय युवकांना येतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या–

अनुक्रम ........ वि.
क्रमांक ........ नों. दि.


समोर बोलतांना त्यांचे विचार विमानाप्रमाणे उंच अंतराळांत विहार करतात व युवकांना ते ध्येयाच्या उत्तुंग शिखरावर घेऊन जातात व त्यांच्यामधील सद्‌भावना, सत्प्रेरणा जागृत करतात. विद्यार्थ्यांना कार्यप्रवण करेल असा अमर संदेश मिळतो.

त्यांच्या बोलण्यांत, कामांत व वागण्यांत जरी गति असली, वेग असला तरी त्या सर्व गोष्टींमध्ये समतोलपणा उठून दिसतो. समतोलपणा हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. इतकेंच नव्हे तर महत्त्वाच्या भाषणांच्या प्रसंगीं राज्यकर्त्याला, सत्तास्थानांवर अधिष्ठित असणाऱ्या व्यक्तीला बोलण्यामध्ये जी सावधगिरी पाळावी लागते ती ते अचूक पाळतात व शब्दांना आपले मालक होऊं देत नाहीत. ज्याच्याजवळ पराक्रम आहे, बुद्धि आहे, शब्दांचें अगणित भांडार आहे, ज्याच्या शब्दांना कान देणारी जनता आहे, अशा माणसाला वारेमाप बोलण्याचा मोह किती होत असेल. पण वाणीवर असामान्य संयम असलेले ते पहिल्या प्रतीचे वक्ते आहेत. अफाट जनसमुदायासमोर दिसल्या–बरोबर चेतना निर्माण होणारे व भडकून बोलणारे वक्ते महा–राष्ट्राला ठाऊक आहेत. अर्थशास्त्राचा, राज्यशास्त्राचा गाढ व्यासंग असलेले, राजकारणाचा दीर्घ अनुभव असलेले, काँग्रेस करितां खरोखर प्रामाणिक धडपड केलेल्या श्री. काकासाहेब गाडगीळांचें उदाहरण या दृष्टीने पाहण्यासारखें आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत काकांना शब्दांवर प्रभुत्व ठेवतां आलें नाही. बोलणारा वक्ता प्रामाणिकहि असूं शकेल. त्याचे विचारहि प्रामाणिक असूं शकतील तरीपण विचारसुद्धा व्यक्त करण्याची पद्धत, त्याची मर्यादा, विशिष्ट वेळीं विशिष्ट शब्दांना प्राप्त होणारा अर्थ या साऱ्या गोष्टी वक्त्याने तपासल्या पाहिजेत. जनतेची विशेषतः बुद्धिवादी व सत्तेच्या स्थानांवर असलेल्या

व्यक्तीकडून याबाबत मोठी अपेक्षा असते. या सर्व गोष्टींची यशवंतरावांना पूर्ण जाणीव दिसते.

१८५६ मध्ये मुंबई असेंब्लीच्या अधिवेशनांत प्रांत-पुनर्रचनेच्या बिलावर बोलतांना ते म्हणतात, " अध्यक्षमहाराज, या प्रश्नासंबंधी आपल्या देशामध्ये व राज्यामध्ये इतकें लिहिलें व बोललें गेलें आहे कीं, ज्या योगाने हा प्रश्न सोडविण्याला मदत होण्याऐवजी अधिक गुंतागुंत होईल असें आणखी कांही तरी बोलून त्यामध्ये भर टाकण्याची माझी विलकूल इच्छा नाही... " पुढे ते म्हणतात, " मुंबई महाराष्ट्राची आहे की नाही याविषयी बोलतांना कोणती परिभाषा वापरावी याबद्दल मी थोडासा संकोचलों आहे. शब्दांनी भावना पूर्णतया व्यक्त होतातच असें नाही. आणि कधी कधी शब्दांनी गैरसमज व गोंधळ वाढण्याचा प्रकार घडतो असा माझा अनुभव आहे, म्हणून शब्दांचा वापर करतांना मी काळजी घेत आहे. " व त्यांनी लगेच पुढे मुंबई ही महाराष्ट्राची आहे असें सांगून टाकलें. आपली बाजू सत्य, न्याय, रास्त व योग्य असली तरी आपण बोलतांना दुसऱ्यांच्या भावना कशा न दुखावल्या जातील हें पाहिलें पाहिजे. सत्य हें नेहमी कटु रीतीनेच सांगितलें पाहिजे असें नाही. किंवा रोखठोकपणें व मोठ्या आवाजांत सांगितलें तरच तें सत्य व गोड हळुवार शब्दांत सांगितलें तर तें सत्य नव्हे असें नाही.

परंतु कांही लोकांची स्थिति लोकांनी आपली आंगठी पाहावी म्हणून त्याकरितां घर जाळणाऱ्या बाईप्रमाणे असते. त्यांना सत्याची चीड असत नाही, मानवतेचें प्रेम नसतें, लोकांच्या सुखदुःखाचा, भल्याबुऱ्याचा विचार नसतो. विचार असतो तो याचा की, माझीं भाषणें लोकांनी ऐकावीत, बेफाम व बेफाट

शब्दाना टाळ्या द्याव्यात, वर्तमानपत्रांत देशभक्त म्हणून डांगोरा पिटला जावा, भाषणाच्या वृत्तांताने वर्तमानपत्राचे रकानेच्या रकाने भरावेत, भाषणाला जाड टाईपांचा मथळा असावा आणि जमले तर मोठा फोटोहि यावा. पण असली सवंग लोकप्रियता फार दिवस टिकत नाही. सदासर्वकाळ माणसें भुलत नाहीत, फसत नाहीत, थापांच्यावर विश्वास ठेवीत नाहीत.

इंद्रधनुष्याप्रमाणें, मोरांच्या नर्तनाप्रमाणें त्यांचें वक्तृत्व लोभस असतें. विचाराच्या कारंजांतील पाणी भावनारूपी सहस्र जलधारांतून थुईथुई नाचत असतें. परंतु आपल्याला जनतेचें केवळ रंजक करावयाचें नाही, भावनांचा केवळ फलोरा फुलवावयाचा नाही, शब्दांचा डोलारा उभा करावयाचा नाही, नुसतें गोड शब्दांनी रिझवावयाचें नाही, श्रोत्यांना झुलवावयाचें नाही, उपमादृष्टान्ताचें बुडबुडे उत्पन्न करावयाचे नाही, पांडित्याचा प्रसर करावयाचा नाही तर लोकांच्यापुढे निश्चित स्वरूपाचा दृष्टिकोन ठेवावयाचा आहे, विचार पटवून व समजून द्यावयाचे आहेत याचा ते विसर कधीहि पडूं देत नाहीत.

त्यांचें भाषण ऐकावयास मिळालें व त्यामुळे आपला दिवस कारणीं लागला, सार्थकी लागला असें जें लोकांना वाटतें त्याचें कारण यशवंतराव प्रामाणिकपणे व अंतःकरणाच्या शुद्धतेने बोलत आहेत हें त्यांच्या मनावर पक्कें ठसलेलें असतें. आपल्याला जें सांगण्यांत आलें त्यांत लवमात्रहि दोष नाही, दंभ नाही, सोंग नाही, बनवाबनवी नाही, फसवाफसवी नाही. मनांत एक, बाहेर एक असा बनाव नाही. सारें सरळ, स्पष्ट, साधें सोपें व सुलभ ! सारें मनाच्या गाभाऱ्यांतून बाहेर आलेलें, अंतःकरणांतून बाहेर पडलेलें ! ही गाढ श्रद्धा जनतेची त्यांच्याबद्दल असते. मन थोर असेल, अंतःकरण पवित्र असेल, भाव शुद्ध असेल तरच

व्याख्यात्याच्या विचारांना श्रोत्यांच्या अंतःकरणांत कायमचा प्रवेश मिळतो. त्याचे विचार जनतेच्या मनांत कायमचें घर करून बसतात.

जीवनाकडे ते आशावादी दृष्टीकोनाने पाहतात. संयमी वृत्तीने, संकुचित विचारांनी, पूर्वग्रहांनी, दूषित कल्पनांनी, कलुषित मनांनी, व विकृतींनी त्याचें जीवन डागळलेलें नाही. आणि त्यामुळेच कोणताहि नवीन विचार ते ताबडतोब आत्मसात करतात, ग्रहण करतात. बऱ्याचवेळी असें घडते की, वय जसजसें वाढतें तसतसें आयुष्यांत सुखद अनुभवांपेक्षा कटु अनुभवांची भर पडत जाते. जीवन हें नागमोडी वळणांचें आहे. हा प्रत्यय येतो. मानवतेवरचा, मांगल्यावरचा, शुचितेवरचा, साऱ्या दिव्य व भव्य कल्पनांवरचा विश्वास उडून जाऊं लागतो. मन चिडखोर बनतें, अश्रद्धा व शंकेखोरपणा वाढतो. संवेदनाचें क्षितिज अरुंद होत जातें, नवीन संस्कार होण्याची क्षमता क्षीण होऊं लागते, नवनवीन विचारांनी व कल्पनांनी अंतःकरण रोमांचित व्हावयाचें बंद होतें. जीवनाची एक ठराविक चाकोरी बनते. जीव–नांत साचेबंदपणा यावयास सुरुवात होतें. यशवंतराव समाजांतील साऱ्या थरांतील, वेगवेगळचा क्षेत्रांतील, निरनिराळचा प्रांतांतील लोकांत प्रिय होतात, सर्वांना हवेसें वाटतात याचें कारण सर्व क्षेत्रांतील जें जें उत्कृष्ट, भव्य व दिव्य असेल, थोर व पवित्र असेल तें ग्रहण करण्याचा, चिरस्मरणीय, शाश्वत व चिरंतन विचार आत्मसात करण्याचा त्यांचा प्रयत्न अखंड चालूं असतो. युवकांच्यापुढे तें भव्य चित्रें रंगवतात. मानवतेचा दृष्टिकोन देतात. नागपुर महाविद्यालयासमोर भाषण करतांना ते म्हणाले, " विद्यार्थ्यांच्यासमोर कांही तरी गंभीर उपदेशपर भाषण करावें हें मला स्वतःला कधीच आवडत नाही. विद्यार्थ्यांना भेटतांना

मनाचा जो खेळकरपणा लागतो तो माझ्याजवळ आहे...कल्पना करा की, नकाशांतील भारताचें चित्र हा एक राष्ट्रपुरुष असून तो कांखेपर्यंत समुद्रांत उतरलेला आहे. समुद्रांत उतरलेला हा राष्ट्रपुरुष काय करीत आहे ह्याची गुरुदेव टागोरांनी आपल्या विद्यार्थ्यांना कल्पना करण्यास सांगितली तेव्हा एका विद्यार्थ्यानें सांगितलें की, हा राष्ट्रपुरुष समुद्रांत उतरलेला असून सूर्याला अर्घ्य देत आहे; दुसऱ्यानें उत्तर दिलें की, दुःख, दैन्य व दारिद्र्य हें न साहवून तो आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त झाला आहे. व तिसऱ्यानें कल्पना केली व सांगितलें, नाही, हा राष्ट्रपुरुष रत्नाकराच्या तळाशी असलेलें माणिकमोतीं शोधून तें साऱ्या जगाला देण्यासाठी उत्सुक झालेला आहे. तीन प्रतिकांतून जीवनाकडे बघण्याचे तीन दृष्टिकोन स्पष्ट होतात. टागोरांच्या कथेंतील या तीन प्रतिकांपैकी रत्नाकराच्या तळाशी असलेलें माणिकमोतीं वेचून तें साऱ्या जगाला देण्याची जी कल्पना आहे तोच दृष्टिकोन भारताविषयीं साऱ्यांनी ठेवावा."

यशवंतरावांच्या वक्तृत्वाचें आणखी एक आगळें वैशिष्ट्य म्हणजे लोकांजवळ आपलें मन ते मोकळें करतात. सुरुवातीला आपणावर केवढी जवाबदारी आहे हें सांगतील. अडचणीमुळे येणारी काळजी व चिंता व्यक्त करतील. साहजिकच भावनेच्या ओघांत श्रोत्यांच्या मनांत ती चिंता घर करूं लागते. यशवंतरावांची चिंता ही आपलीच आहे असें वाटू लागतें. नकळत ह्यांतून मार्ग कसा काढावा ह्याबद्दल श्रोत्यांचें मन विचार करूं लागतें. तोच यशवंतराव आवेशानें व आत्मविश्वासानें बोलत असलेले दिसतात. आपल्याला दिसणारा प्रकाश दाखवितात. वाटणारी आशा व्यक्त करतात व ह्या मार्गानें गेल्याशिवाय तरुणोपाय नाही हें पटवून देतांना श्रोत्याला आपल्यावरचा भार हलका झाल्यासारखा

वाटतो. ह्यांतच त्यांच्या वक्तृत्वाचें सामर्थ्य व सौंदर्य आहे. बऱ्याचवेळीं भाषणांतून देशाच्या उन्नतीचीं व प्रगतीचीं स्वप्नें रंगवितात. गुंतागुंतीच्या मार्गांतून व प्रश्नांतून मूलगामी विचार प्रगट करतात. १९५२ सालीं पुण्याला वसंत व्याख्यानमालेंत पुष्प गुंफताना ते म्हणाले, "आज अनेक फाटे फुटलेल्या रस्त्याचे चौकांत जग उभें असून कोणत्या मार्गानें गेलें असतां आपला अभ्युदय होईल अशा संभ्रमांत तें आहे. असा या संभ्रम काळांतच लोक-शाहीचा महान् प्रयोग आपण करीत असून येथील यशापशावरच जगांतील लोकशाहीचें भवितव्य अवलंबून आहे. अंतर्बाह्य शत्रू-पासून देशाचें संरक्षण करणें व जनतेस योग्य न्यायाची व्यवस्था करणें एवढेंच कार्य लोकशाहीप्रधान राज्यकारभारांत आता अभिप्रेत नाही. लोककल्याणकारी राज्य निर्माण कसें होईल याचाहि विचार करावयाचा आहे. आपण स्वतंत्र होऊनहि अनेक बिकट प्रश्न सुटलेले नाहीत. केवळ इतर देशांतील प्रश्नासारखेच ते प्रश्न आहेत म्हणून ते रशिया, चीनच्या पद्धतीनें सोडवावयाचे का देशांत गेलीं ६० वर्षें दादाभाईपासून नेहरुपर्यंत आपल्या लोकाग्रणींना जी लोकशाहीची विशिष्ट परंपरा निर्माण केली त्या परंपरेनुरूप सोडवावयाचे हा खरा प्रश्न आहे. व त्या प्रश्नाच्या उत्तरावरच भारतीय लोकशाहीचें भवितव्य हें शुभ आहे का अशुभ आहे तें ठरूं शकेल. फ्रेंच क्रांतींतून लोकशाहीचा उगम होऊन लोकशाहीच्या तत्त्वांचा जगभर झपाट्यानें प्रसार झाला. जगांत कित्येक ठिकाणी लोकशाही तत्त्वांवरील विश्वास उडूं पहात आहे; अशा या संधीकाळांत भारतांत खऱ्या अर्थानें लोकशाहीचा जन्म झालेला आहे.......गरीब जनतेच्या मनांत नव्या आकांक्षा उत्पन्न करून त्यांना कार्यप्रवण करण्यास प्रवृत्त करण्याऐवजीं त्यांच्यांत असंतोष पसरविण्याचा प्रयत्न झाला तर

रात्रीं त्यांचें लक्ष त्या श्रीमंतांच्या तिजोरीकडे जाईल इतकेंच ! पण खरा प्रश्न कायमच राहील. पैसा हा पुंजीपतींच्या किंवा सरकारच्या तिजोरींत नसून तो आकाशांतील ढगांत आहे, त्या ढगांतून खाली पडणाऱ्या जलधारांत आहे, त्या पाण्याच्या प्रवाहरूपी नदींत आहे. नदीच्या दोन्ही काठांस भिजणाऱ्या काळ्या जमिनींत आहे, त्याच जमिनींतील खनिज संपत्तींत आहे, त्याच खनिजसंपत्तीद्वारा निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक यंत्रसामुग्रींत आहे. इतकेंच नव्हे तर त्या सर्वांना एका सूत्रांत बांधणाऱ्या मानवाच्या मनगटांत आहे असें जर ह्या गरीब जनतेस पटवून देऊन त्यांच्यांत सृजनशक्ति निर्माण करून त्यांना कार्यप्रवण केलें तर आपले सारे प्रश्न सुटतील व त्या सुटण्यांतच भारतीय लोकशाहीचें भवितव्य सामावलेलें आहे."

या त्यांच्या भाषणामध्ये विचारांचा क्रम दिसतो. त्यांचा नैसर्गिक विकास दिसून येतो. त्यांमध्ये एक संगति दिसते. गंगे-प्रमाणे वाहणारा विचारांचा ओघ दिसतो. स्फूर्ति देणारे सूचक विचार दिसतात. विचारांचा ओघ अखंडपणे व अप्रतिहतपणे ठेवण्याचें त्यांचें कसब दिसतें. मेलेल्या व निष्क्रिय मनाला जिवंत करणारे आणि दबलेल्या, भ्यालेलेल्या शौर्यास स्फूर्ति देणारे व आत्मविश्वासाचे त्यांचे हे उद्‌गार वाटतात. त्यांच्या रसोत्कट भाषाशैलीची मोहिनी पडते.

विरोधी लोकांनी कितीहि चिडविलें, आरोप-प्रत्यारोप केले, वैयक्तिक निंदा केली तरी ते कधीहि खालच्या पातळीवर येऊन बोलत नाहीत. प्रतिपक्षाची हेटाळणी करणार नाहीत, क्वचित् प्रसंगीं एखादा नर्मविनोद करतील एवढेंच ! पण त्या शब्दांत वा वाक्यांत सारी भरपाई करतील. आपल्या शब्दचापल्याने

व बुद्धिचापल्याने प्रतिपक्षांवर अचूक शरसंधान करतील. मर्मभेदक भाषण करून प्रतिपक्षाला इषारा देतील. विधायक कर्तृत्वांत आमची बरोबरी करा, त्यामध्ये आमच्याशीं स्पर्धा करा असें आव्हान देतील. शांतपणे व समतोलपणे विचार करण्याचें आवाहन देतील व लोकांना बहारदार वक्तृत्व ऐकावयास मिळाल्याचा आनंद होईल. विरोधी पुढाऱ्यांची ते कधीच धास्ती घेत नाहीत. उलट लोकांच्या भावना भडकावून नेलेलें यश ते हातोहात जिंकून परत आणतात. प्रतिपक्षाचे मुद्दे बिनतोड मांडणी करून सफाईने जातां जातां खुडून टाकतात.

निवेदनाला ते कधीहि जाड्य येऊं देत नाहीत; विवेचनाला दुर्बोधता आणूं देत नाहीत, भाषेला रुक्षता प्राप्त होऊं देत नाहीत. लांबलचक, पाल्हाळिक किंवा कंटाळवाणे होईल असें ते कधी बोलत नाहीत.

विरोधी पक्षाचे बहुसंख्य लोक सभेला असोत, प्रा. डॉ. राधाकृष्णन् यांच्यासारखे जगप्रसिद्ध तत्त्वज्ञ शेजारीं असोत, पंडित नेहरूंसारखे जगत्वंद्य नेते असोत, जगाला आदरणीय वाटणारे आपले आजचे राष्ट्रपति असोत, सभेमध्ये गांगारणें, गडबडणें हें त्यांना ठाऊकच नाही. कोणीहि असोत, कितीहि असोत ! तोच संयम ! तोच आवेश ! तोच आत्मविश्वास ! तीच तडफ ! त्यांत तसूभरहि फरक पडणार नाही. याचें कारण आपल्याला काय सांगावयाचें आहे याचें त्यांना सम्यक ज्ञान झालेलें असतें, दर्शन झालेलें असतें व विचारांच्या मागे दांडगे मानसिक बल असतें.

त्यांचे विचार तरुणांना नेहमीच दृष्टी देतील, विचारप्रवण करतील, कार्यप्रवृत्त करतील व ध्रुवताऱ्याप्रमाणे मार्गदर्शन

करतील, प्रकाश देतील. त्यांनी दाखविलेल्या विचारांच्या प्रकाशांत महाराष्ट्रांतील सुबुद्ध तरुण आपला व पर्यायाने महाराष्ट्राचा विकास करतील हीच आशा ! सर्वांगीण सुधारणेची चिंता वाहणाऱ्या, निर्मळ व शुद्ध अंत:करणाच्या, मधुर व गोड वाणीच्या प्रेमळ नेत्याला प्रणाम ! !

११५८६

७

" ......निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु ।
अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसि तत्पर ।......"

श्रीसमर्थ रामदास स्वामींना आपल्या तात्त्विक आदर्शाचें प्रत्यक्ष उदाहरण श्री छत्रपति शिवाजी महाराजांत सांपडलें. यशवंतरावांचें सर्व राजकीय जीवन न्याहाळलें तर रामदासांच्या आदर्शाच्या दृष्टीने यशवंतरावांचें राजकीय जीवन आदर्श ठरेल. रामदासांनी प्रथमपासून शेवटपर्यंत विवेकी राहण्याची शिकवण दिली आहे. परतपरत एकाच विवेकवादाची ते आवर्जून, घोळून चर्चा करीत आहेत. यशवंतराव म्हणजे विवेकी आचाराचें व धोरणाचें मूर्तिमंत प्रतिकच! कोणत्याहि गोष्टीचा, गुणाचा अतिरेक होऊं देऊं नये व प्रपंच काय किंवा राजकारण काय सारासारविवेकाने करावें ही त्यांची शिकवण ! सत्ता मग ती राजेशाहींतील, हुकुमशाहींतील किंवा लोकशाहींतील असो. सत्ता ती सत्ताच. सत्तेमुळे माणसाचा अध:पात होतो. व अमर्याद सत्ता माणसाला संपूर्ण अवनतीकडे नेते. सामान्य माणूस सत्तेमुळे

बिघडतो एवढेंच नव्हे तर थोर, मोठीं माणसें वरच्या पदाला, सत्तास्थानावर गेलीं म्हणजे बिघडतात हा अनुभव सर्वसामान्य आहे. त्यामुळे सत्तेवरील माणसाने तरी 'राजधर्म' व 'क्षात्रधर्म' याची जाणीव आवर्जून ठेवावयास हवी. त्याला मानवाचें, मानवी व्यवहाराचें, मानवी जीवनाचें, मानवी जीवनांचें नियमन करणाऱ्या प्रवृत्तींचें सूक्ष्म ज्ञान असावयास हवें. लोकांच्या मनांचें, भावनांचे, विचारांचे, कल्पनांचे सूक्ष्म पदर समजले पाहिजेत; त्यांतील छटा गुंतागुंत यांची उकल झाली पाहिजे. व्यक्तीचें, जमावाचें व गर्दीचें मानसशास्त्र समजलें पाहिजे.

देशसेवेच्या ईर्षेने, व जिद्दीने यशवंतराव राजकारणांत आले. कार्यकर्ते झाले व नेते झाले, प्रत्येक व्यक्ति पुढारी बनत नाही, प्रत्येक सैनिक सेनापती बनत नाही. व प्रत्येक पुढारी नेता होऊं शकत नाही. सर्वच नेत्यांच्या ठायीं असामान्यत्व येत नाही. जग बदललें आहे. सारें नवें जग विचारांवर चाललें आहे. राजकारणी हा खराखुरा तत्त्वज्ञ असेल तरच आपली छाप जनमतांवर तो कायम ठेऊं शकेल. यशवंतरावांनी लहानपणापासून वेगवेगळ्या देशांचा, तेथील परंपरांचा, वेगवेगळ्या राज्यपद्धतींचा निरनिराळ्या राजकीय प्रणालींचा, अर्थशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास केला आहे. सर्वांशीं समत्वभावनेने, प्रेमाने, ममत्वाने वागण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. आपलें सार्वजनिक व सामुदायिक जीवन स्वच्छ पवित्र ठेवलें आहे. सर्वांशीं ते न्यायाने वागत आहेत. सत्ता आल्यापासून समाजांतील अशांतता, अव्यवस्था, गोंधळ नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे व आपलें धोरण विवेकाने ते चालवीत आहेत म्हणून त्यांचें राजकीय जीवन यशस्वी झालें आहे. मानव्यावर, मानवाच्या चांगुलपणावर त्यांनी अपार श्रद्धा ठेवली आहे. आणि म्हणूनच

अडचणीचे, संकटाचें, प्रत्यहीं शेकडो प्रसंग येऊनहि ते त्यांतून वर निघाले. सत्य मरून जाणार नाही. कांही दिवस जरी, थोडा काळ जरी, असत्याचा विजय झाल्यासारखा दिसला तरी सत्याचाच अंतिम विजय होणार ही त्यांना मनोमन खात्री होती.

राजकारणांत आणि व्यापक अर्थानें जीवनांत यशस्वी होण्याकरितां, अंगीकृत कार्यांत यश मिळण्याकरितां व्यक्तीला बऱ्याच गोष्टी कराव्या लागतात. जाणीवपूर्वक बऱ्याच गोष्टींची संवय लावून घ्यावी लागते. व्यक्तिमत्वाची व मनाची विशिष्ट धारणा करावी लागते. त्याला समय ओळखतां यावा लागतो. माणसांना राजी ठेवतां यावें लागतें. आपल्या कामास येणाऱ्या माणसांकरितां प्रसंगीं तोशीस सोसावी लागते, कांही वेळां धीर धरावा लागतो, माणसांची चांगली पारख असावी लागते. माणसांच्या योग्यतेप्रमाणे, कुवतीप्रमाणे, त्याच्यावर जबाबदारी टाकतां यावी लागते, एखादा कार्यकर्ता हट्टी असला तरी संभाळून घ्यावें लागतें, जर तो फितुरी करूं लागला, दगलबाजी करूं लागेल तर त्याची हकालपट्टी करावी लागते. राजकारणी व्यक्तीला, नेत्याला, कामाला कंटाळून चालत नाही. प्रत्येक गोष्ट तो एकटा करूं शकत नाही. माणसें हुडकून त्यांच्याकडे धुरीणत्व द्यावें लागतें. कोठल्याहि प्रसंगीं नेत्याने भिऊन चालत नाही. रामदासांनी "क्षात्रधर्मा–" बद्दल सांगतांना म्हटलें आहे–

"ज्यास जिवाचें वाटें भयें। त्याने क्षात्रधर्म करूं नये
कांही तरी करूनि उपायें। पोट भरावें ॥"

राजकारणांबद्दल हेंच म्हणतां येईल, राजकारण हा एक संग्राम आहे. अटळ व नित्य संघर्षांनी तें भरलेलें आहे. बऱ्याचशा परस्परविरोधी गोष्टी त्याला कराव्या लागतात. कामाच्या सिद्धि-

करतां समुदायाचा ह्व्यासहि करावा लागतो, तर पुढच्या कामाच्या एकान्तांत तजवीजा कराव्या लागतात. लोकांच्याशीं सलगीहि करावी लागते, पण अती सलगीहि करून अंगांशीं येते. लोकांच्याशीं परिचय ठेवावा लागतो, पण अतिपरिचय ठेवूनहि जमत नाही. सर्वांशीं राजी वागावें लागतें. पण अति गोड वागूनहि जमत नाही. लोक त्याचा गैरफायदा घेतात. दुसऱ्यांवर विश्वास ठेवला तर कार्यभाग बुडतो, पण सर्व कामेंहि एकट्याला करतां येत नाहीत, सर्व गोष्टींत खुल्या मनाने राहावें लागतें, पण कांही गोष्टी कांहीकाळ तरी गुप्त ठेवाव्या लागतातच. या साऱ्या गोष्टींचा समतोल साधणें, योग्यवेळीं योग्य गोष्ट करणें हें किती अवघड गोष्ट आहे हें सांगावयास नकोच. राजकारण म्हणजे सुळावरची पोळी आहे. “देवा, मला, माझ्या मित्रांपासून वांचव.” म्हणण्याचीहि पाळी पुष्कळदां येते. पंडित नेहरूंनाहि शेख अबदुल्लांकडून असाच अनुभव आला राजकारणी नेत्याला असा एक अनुभव येत नाही तर बरेच येतात. जवळचे लोक उलटतात, गुप्त गोष्टी फोडतात, विश्वासाने सांगितलेल्या गोष्टीची वाच्यता करतात म्हणून,–

“ दोष देखोनि झांकावें । अवगुण अखंड न बोलावें ।
दु:ख दुसऱ्याचें जाणावें । ऐकून तरी वांटून घ्यावें ।
बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ ”

जनतेचें बरें वाईट यशवंतरावांनी खूप सोसलें आहे, स्वत: सर्व आघात सोसले आहेत. विरोधकांत मतपरिवर्तन घडविलें आहे. मध्यंतरी यशवंतराव विरोधकांशीं फार सलगीने, गोडीने वागतात म्हणून कॉंग्रेस कार्यकर्ते मनांतून कुरूकुरू लागले. परंतु,

"मागील अपराध क्षमावें। कारबारी हातीं धरावें।
सुखी करुन सोडावें। कामाकडे ॥
पाणवठी तुंब निघेना। तरी मग पाणी चालेना।
तैसे सज्जनांच्या मना। कळलें पाहिजे ॥
जनांचा प्रवाह चालिला। म्हणजे कार्यभाग आटोपला।
जन ठायीं तुंबला। म्हणजे खोटें ॥"

हें त्यांनी ध्यानी ठेवलें असावें. आपल्याविरुद्ध बोलला तो शत्रु, तो विरोधी अशी भूमिका जर त्यांनी ठेवली असती तर आज जे हजारो विरोधी पक्षांतील लोक कॉंग्रेसमध्ये परत येत आहेत ते आले नसते. व जनाचा प्रवाह त्यांना चालता ठेवता आला नसता. व महाराष्ट्राच्या प्रगतीच्या रथाचा वेग मंद झाला असता.

आज कितीतरी विद्वान्, बुद्धिमान्, कर्तबगार मंडळी त्यांनी आपल्याभोवतीं जमा केली आहेत. हजारो अनुयायी त्यांना लाभले आहेत. सामान्य मनुष्यांना आपल्या बरोबर घेऊन जाऊं शकेल तोच खरा पुढारी. तो फार पुढे असेल तर जनता मागे राहते व जनतेंत खूप अंतर राहतें. परंतु अगदी जनतेच्या बरोबर राहूनहि जमत नाही. मार्गदर्शक म्हणून त्याला थोडें पुढे राहावें लागतें इतकेंच! सभोवतालची परिस्थिति त्याला पाहावी लागते व त्यांतूनच साधनांची निवड करावी लागते. परिस्थितीचें नुसतें चित्र त्याच्या डोळ्यांपुढे येऊन चालत नाही तर त्याला त्यांतून मार्ग काढावा लागतो.

राजकारण हें त्यांनी आपलें जीवित मानलें आहे. त्याकरितां पहिल्यापासून होणाऱ्या छळांना, यातनांत मन तयार केलें, कारावासाची अपेक्षा केली, महान् ध्येयासाठी आत्मार्पण करावयाची तयारी ठेवली. सर्वजण स्वतःचा प्रपंच करतातच पण राष्ट्राचा प्रपंच करणारे फारच थोडे! कांही नेत्यांच्या बाबतींत

राजकारण हें योगायोगानेंच आलेलें असतें. कांहीजण सत्तेच्या, कांहीजण संपतीच्या, कांहीजण कीर्तिच्या लोभाने, आशेने राजकारणांत आलेले असतात. यशवंतरावांना वयाच्या १२ व्या वर्षी कांही मुख्यमंत्रीपदाचें स्वप्न पडलें नव्हतें.

राजकारणांत हजारो लोकांशीं संबंध येत असतो. कांही नवीन लोक येत असतात. कांही जुने सोडून जात असतात. अशा वेगवेगळ्या विचारांच्या, वेगवेगळ्या कल्पना असलेल्या माणसांशीं जमवून घ्यावयाचे असते. कांही माणसें शीघ्रकोपी असतात, कांही अति स्वाभिमानी असतात,कांहीच्या मानापमानाच्या कल्पनाच वेगळ्या असतात, कांही हट्टी असतात, कांही तापट असतात, कांहीजण अत्यंत मृदु व भावनावश अंतःकरणाचे असतात, कांही अति साहसी असतात, कांही अति महत्त्वाकांक्षी असतात, कांही माणसें क्षुल्लक गोष्ट मानबिंदुचा प्रश्न करून बसतात, कांही आग्रही व आततायी भूमिका स्वीकारणारे असतात, थोडक्यांत मानवी जीवनांतील सर्व पैलू राजकारणांत आढळतात. अशा सर्वांशीं सामोपचाराने, स्नेहभावाने, सौजन्याने, न्यायाने वागून विकासाची गति अकुंठित ठेवणें हें किती कठीण, दुष्कर व दुर्घट आहे हें त्या जागेचा ज्यांना अनुभव आहे त्यांनाच कळेल.

यशवंतरावांच्या मुत्सद्देगिरीचा महाराष्ट्रांतील जनतेला पूर्ण–पणे प्रत्यय आला आहे. द्विभाषिकाचा कारभार उत्तम रीतीने चालत असला, लोक प्रशंसा करीत असले तरी लोक समाधानी नाहीत हें त्यांना समजून चुकलें होतें; परंतु त्यांनी आपण होऊन ह्या प्रश्नाचा स्फोट वरिष्ट मंडळींत केला नाही. वरिष्ट नेते स्वतः हा प्रश्न केव्हा उपस्थित करत आहेत याची ते वाट पाहत होते. या प्रसंगीं ते म्हणतात, “ वरिष्ट नेत्यांनी विचारल्यावरच आपण मत द्यावयाचें, किंबहुना आपण अशावेळीं जें मत देऊं तें निर्णयासच कारणीभूत व्हावें इतकी

आपली शक्ती निर्माण व्हावयास हवी असें मला वाटे ” आणि शेवटीं त्यांचें मत निर्णायक ठरलें हें आपण पाहत आहोंतच. कोण-तीहि गोष्ट कितीहि खरी असली तरी वातावरण, परिस्थिति, काळ व वेळ यांची अनुकूलता पाहवी लागते हें ते चांगलें जाणतात.

बऱ्याच वेळीं एखादी गोष्ट होणार, घडणार हें माहित असलें तरी तें बोलणें हितावह नसतें. कांही लोकांना हा मोह टाळतां येत नाही. लोकांच्या भावनेला, आग्रहाला, उतावीळ-पणाला ते बळी पडतात. आज महाराष्ट्रांतील संघटना अभेद्य करण्यांत, कार्यकर्त्यांत एकजूट, शिस्त व एकोपा ठेवण्यांत त्यांनी खूप यश मिळविलें आहे. निदान एवढ्या मोठ्या राज्याची व भूतकालीन परिस्थितीची पार्श्वभूमी डोळ्यापुढे ठेवून तरी हें मान्य करावें लागेल. जुन्या कार्यकर्त्यांना न दुखवतां संघटनेंत त्यांनी खूप नवीन रक्त आणण्याचा प्रयत्न केला आहे. नवीन रक्ताला वाव व संधि देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे. पण त्याचबरोबर जुन्यांना मार्गदर्शन करण्याची विनंतीहि ते करत असतात. संघटनेंत गटबाजीला त्यांनी स्थान दिलें नाही. गटबाजीच्या किडीने संघटनेचा वृक्ष पोखरला जातो हें संघटनेचें सूत्र ध्यानांत ठेवून ते वर्तन करीत असतात.

सर्व भारतामध्ये बिकट गुंतागुंतीच्या प्रश्नांची, समस्यांची निरगांठ सोडविणारे एक उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांचा नांवलौकिक झाला आहे. कठीण समस्या सोडविण्यांत त्यांनी बुद्धिचातुर्य दाखविलें आहे. अमुक प्रसंगीं असें वागावें, अमुक प्रसंगीं असें करावें, असें सांगणें, असा उपदेश करणें फार सोपें असतें. ‘ राज्यकर्त्यानें भावनेवर नियंत्रण ठेवावें ’ हें सांगणें सोपें. कारण जगाला जिंकणें, जगांवर स्वामित्व गाजविणें हें एकवेळ सोपें असतें. परंतु स्वत:वर, स्वत:च्या भावनांवर विजय मिळविणें, भावना जिंकणें, संयमन करणें हें अति कठिण असतें. पण ही

अशक्य गोष्ट त्यांनी शक्य करून दाखविली आहे. वीराची, पराक्रमी पुरुषांची कसोटी ही संकटाच्या, अनपेक्षित घटनेच्या प्रसंगाच्या वेळींच लागत असते. गेल्या पांच–सहा वर्षांत अनेक ठिकाणीं व अनेक प्रसंगीं त्यांची कसोटी लागलेली आहे. व ते त्यांत यशस्वी, सहीसलामत बाहेर पडले आहेत. अल्पश्रमाने, थोडच्या सायासाने मिळालेलें यश दीर्घकाल टिकूं शकत नाही. संकटाशीं दोन हात करून त्यांनी हें यश मिळविलें आहे. "कांही माणसें जन्मत: मोठी असतात, कांही मोठेपण कर्तबगारीने मिळवितात; कांहीवर मोठेपणा लादला जातो." यशवंतराव दुसऱ्या प्रकारांत मोडतात.

यशवंतरावांच्या प्रशासनांत मत्सराला, कपटनीतिला, असूयेला जागा नाही. उदार व व्यापक मनाने ते सर्वांशीं वागतील. औरंगजेबासारखे शंका व संशय ह्यांनी त्यांना पछाडलें नाही. कालचा विरोधक असला तरी एकदां त्याचें मन कळलें की लगेच त्याच्यावर ते विश्वास टाकतात. ही गोष्ट श्री. यशवंतराव मोहिते यांना त्यांनी उपमंत्रिपद दिलें यावरून दिसून येतें. प्रसंगीं सहकाऱ्याशीं मतभेद झाले तरी अंत:कलहाचा विषवृक्ष ते वाढून देत नाहीत. त्याचप्रमाणे त्यांच्या धोरणांमध्ये धरसोडहि कधी दिसणार नाही, त्यांची बुद्धि डोळस, चोखंदळ व विचक्षण असल्यामुळे बऱ्याच गोष्टी ते अगोदर हेरतात. अचूक व आश्चर्यकारक दूरदृष्टी असल्यामुळे व चौफेर लक्ष असल्यामुळे संघटना त्यांनी मजबूत ठेवली आहे.

राजकारणांमध्ये तरुण पिढीला तर यशवंतरावांची जास्त आवश्यकता भासते. आठ ते दहा वर्षांपूर्वी व त्याच्याही अगोदर स्वातंत्र्यपूर्वकालांत श्री. जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया इत्यादि समाजवादी नेत्यांवर तरुणांची फार भिस्त होती. परंतु १९४२ चा समाजवादी विचारसरणीचा गट फुटल्यामुळे

कांहीजणांनी राजसंन्यास घेतल्यामुळे तरुणांत निराशा निर्माण झाली. एकप्रकारचें वैफल्य येतें की काय अशी शंका वाटूं लागली. यशवंतरावांच्या तडफदार नेतृत्वाने हा प्रश्न सोडविला आहे. तरुणवर्ग त्यांच्याकडे आशेने व अभिमानाने पाहत आहे. मार्ग-दर्शनाच्या इच्छेने पाहत आहे. यशवंतरावांचें व्यक्तिमत्व भारतांतील तरुणांच्या अपेक्षा पूर्ण करील अशी जाणत्या मंडळीची आशा आहे.

## ८

"ते आले, त्यांनी पाहिले व त्यांनी जिंकले..."

थोर पुरुषांविषयी, मोठ्या व्यक्तीविषयी आदर वाटणें, आकर्षण वाटणें हा मनुष्याचा स्वभावधर्म आहे. त्यांचें कर्तृत्व अद्‌भुतरम्य असतें, विचार रोमांचकारी असतात. भावना दिव्य व उदात्त असतात आणि असामान्य माणसांना याबद्दल कुतूहल असते. हीं माणसें चालतात कशी, वागतात कशी, बोलतात कशी, याचें सामान्य माणसांना जबरदस्त आकर्षण वाटतें. पण याच्यानंतर कांही माणसें असतात तीं एवढ्यावर थांबत नाहीत. तीं विचार करतात. ज्यांच्याबद्दल आकर्षण वाटतें त्यांच्या विचाराचे खोल अध्ययन करतात, त्यांच्या कार्याचें निरीक्षण करतात, त्यांच्या कृतीकडे बारकाईनें पाहतात व ह्या थोर पुरुषाला जी कीर्ति, जें यश, जो लौकिक मिळाला त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात, त्या थोर पुरुषांच्या असामान्यतेचें, असाधारणतेचें, अलौ-किकतेचें रहस्य हुडकून काढण्याची खटपट करतात. त्यांची जिज्ञासा त्यांना गप्प बसूं देत नाही अशा शोध घेणाऱ्या अनेक व्यक्तीपैकी मी एक अभ्यासू आहे.

कांही माणसें विभूतिपूजेमुळें व श्रद्धेमुळे आपल्याला आदर-णीय व थोर वाटणाऱ्या व्यक्तीला देवाच्या अवताराच्या, संतांच्या कोटींत नेऊन बसवितात व त्या व्यक्तीच्या चरित्रांतील चैतन्य

काढून टाकतात असें मला वाटतें. कारण अवतारांच्या व दैवी साहाय्याच्या कल्पनेमुळे त्या व्यक्तीने स्वतःच्या परिश्रमाने, कष्टाने, पराक्रमाने, बुद्धीने मिळवलेल्या यशावर, विजयावर, कीर्तीवर पाणी पडतें. माणूस परिस्थिति बदलूं शकतो, तो इतिहास घडवूं शकतो, काळाचा ओघ पालटूं शकतो, वातावरणाला कलाटणी देऊं शकतो, स्वतःचें नशीब, भाग्य तो घडवूं शकतो ही कल्पनाच मारली जाते. तो अंगीकृत गुणांमुळे यशस्वी झाला, आपणहि यशस्वी होण्यासाठी ह्यांतील परिस्थितीनुरुप कांही गुणांची उपासना, अनुकरण करूं या ही कल्पनाच निघून जाते व देव्हाऱ्यांतील देवा-प्रमाणे नुसत्या पूजा करणाऱ्या मूर्तीप्रमाणे ती व्यक्ति होऊन बसतें.

यशवंतरावांच्या अनेक ठिकाणीं सभा होत आहेत. सभेला हजारों लोक उपस्थित राहत आहेत, स्वागत करणारी मंडळी भारावून जात आहेत, स्तुतिसुमनांचा वर्षाव होत आहे, श्रोत्यांची अंतःकरणें उचंबळून जात आहेत, कांही ठिकाणचे कार्यकर्ते बाव-रून जात आहेत, त्यांचा गौरव करण्यांत अहमहमिका लागली आहे, कार्यकर्त्यांचीं मनें अभिमानाने व आदराने उंचावलीं आहेत, हजारों व्यक्ति व संस्था पुष्पहार अर्पण करीत आहेत अशा हजारों सभा होत आहेत. दृष्ट लागण्याइतका त्यांचा उदोउदो होत आहे, पूर्वीचे विरोधक मित्र झाले आहेत, स्वागतांत तेहि मनापासून सामील झाले आहेत, भाषण ऐकून त्यांचीं मनें हेलावत आहेत, तरुणांच्या अंगावर रोमांच उभे राहत आहेत, सहकारी आनंदाने न्हावून निघाले आहेत, मित्रांचा आनंद डोळ्यांत मावेनासा झाला आहे, मिरवणुका निघत आहेत, ते येणार आहेत म्हणून गावच्या गाव शृंगारलें जात आहे, सारें गाव सुशोभित केलें जात आहे. लोकांची उत्कंठा शिगेला पोहोंचत आहे, तुताऱ्या ललकाऱ्या देत आहेत, सुवासिनी ओवाळीत आहेत, व पुष्पवृष्टीचा वर्षाव होत आहे आणि लोकांचें आपल्यावरील हें निस्सीम प्रेम पाहून

यशवंतराव –मराठ्यांचा नेता– कृतज्ञतेने भारावून जात आहेत, गहिवरून जात आहेत.

सर्वांना सूर्यप्रकाशांत चमकणारा, तळपणारा कळस दिसत आहे. पण याच्यामागे दीर्घ तपश्चर्या आहे. गतानुगतिक नसणाऱ्या माणसांचा अखंड डोळस प्रवास आहे, ज्ञानाची प्रदीर्घ उपासना आहे, महान् गुणांची अविश्रांत साधना आहे, संकटाचे डोंगर ओलांडल्याचा, काट्याकुट्यांतून, खांचखळग्यांतून प्रवास केल्याचा दीर्घ अनुभव आहे. जीवनावर उदार होऊन लढणाऱ्या माणसाचा हा विजय आहे. स्वतंत्र विचाराच्या, अढळ राष्ट्रीय निष्ठा असणाऱ्या व्यक्तीची ही महायात्रा आहे. जनतेच्या सुखा-करतां तळमळणाऱ्या, जनतेच्या दुःखाने कासावीस होणाऱ्या माणसाचा तीन तपांचा हा संचार आहे. राजकारणासारख्या अशाश्वत व अस्थिर घोड्यावर स्वार झालेल्या वीराचा व शूराचा इतिहास आहे. राष्ट्राकरितां जीवित तृणवत् मानलेल्या गृहस्थाची ही कथा आहे.

उत्कट ध्येयवाद हा त्यांच्या यशाला कारणीभूत होणारा सर्वांत मोठा गुण आहे. ध्येयवादी म्हणून मरणें एकवेळ सोपें असतें; परंतु ध्येयवादी म्हणून जगणें कठीण असतें. आयुष्यांत मोहाचे, लाभाचे, स्वार्थाचे अनेक प्रसंग येतात. पावलोंपावलीं माणसाची कसोटी लागत असते. पदोपदीं परीक्षा होत असते. अनेक दिव्यांतून त्याला पार पडावें लागतें. त्या उत्कट ध्येयवादा-पायींच सुख व विलास यांच्यापेक्षा त्याग व सेवा ह्या गोष्टी पसंत केल्या, समृद्धता व संपन्नता याऐवजी गरिबी पसंत केली, राज–प्रासादाऐवजीं कारावास निवडला. ध्येयाकरितां जगण्यांत, जळ–ण्यांत फार काय मरण्यांत एक विलक्षण प्रकारचें समाधान असतें. ध्येयसिद्धीकरितां अणूअणूंनी मरण्यांत जीवनाचें खरें साफल्य आहे. ध्येयाकरितां यातना सोसण्यांतच देशभक्तांना खरें सुख

प्राप्त होतें. एक प्रकारचा अनिर्वचनीय आनंद प्राप्त होतो. लहानपणापासून स्वातंत्र्याचे व क्रांतीचे वारे यामुळेच त्यांच्या अंगांतून संचारूं लागले. स्वातंत्र्याबद्दलची स्पृहा व प्रीति यामुळेच निर्माण झाली. देशाच्या सेवेकरितां, अखिल मानवजातीची सेवा करणें हें त्यांनी आपलें ब्रीद मानलें. त्यांना जें यश मिळालें त्याचें कारण त्यांचा ध्येयावर, स्वतःवर, अंगीकृत कार्यावर, देवाने जणू काय आपणांस या करितांच जन्माला घातलें आहे यावर गाढ विश्वास होता. संयुक्त महाराष्ट्राच्या वेळीं, पक्षांपेक्षा, सर्व गोष्टीपेक्षा देश मोठा ही भूमिका ह्या विशाल ध्येयामुळेच त्यांनी स्वीकारली होती.

आत्मविश्वास हा तर त्यांच्या जीवनाचा स्थायी भाव आहे. माणसाच्या ठिकाणीं मूलप्रेरणा व ध्येयावर गाढ श्रद्धा असावी लागते. तरच त्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न होतो. बरीचशीं विद्वान् माणसें केवळ आत्मविश्वासाच्या अभावीं जीवनाच्या शर्यतींत मागे राहतात. आत्मविश्वास हा आत्मविकासाचा पाया आहे हें यशवंतरावांनी आपल्या उदाहरणांनी सिद्ध करून दाखविलें आहे. टीकेच्या झंजावातांतून केवळ आत्मविश्वासाच्या बळावर ते बाहेर पडले. त्यांच्या आयुष्यांतील सर्वांत प्रमुख गुण कोणते असतील तर निर्धारशक्ति व निश्चयीपणा. कोणतीहि गोष्ट ठरवितांना ते एकदा, दोनदा, चारदा विचार करतील पण एकदा निश्चयाने निर्णय घेतला म्हणजे मग ते परिणामाची काळजी करणार नाहीत. बोलतांना ते असें बोलतात की मी जातों त्या मार्गाने या म्हणजे तुम्हांला योग्य मार्ग सापडेल. अलिकडच्या काळांत संकटाच्या प्रसंगीं एवढें मानसिक धैर्य व एवढा मोठा दृष्टिकोन दुसऱ्या कोणीं दाखविला नसेल. मोठ्या नेत्यांच्या ठिकाणीं मानसिक धैर्याची तर आवश्यकता असते. कारण लोकशाहीमध्ये लोकांना श्रेय काय असेल यापेक्षा त्यांना प्रिय काय असेल, मग

परिणामी ते हितावह कां नसेना, ते बोलण्याचा मोह अनावर होतो. खरें सांगण्याचे प्रसंगीं अप्रियता पत्करून योग्य सांगण्याचें मानसिक धैर्य फार थोडयांच्या ठिकाणीं असतें.

परंतु एका दृष्टीने यशवंतरावांना जी एवढी अफाट लोकप्रियता लाभली आहे, त्याचें कारण वेगळेंच आहे. सर्वच लोकांना राजकारणांमध्ये रस असतो असें नाही. प्रत्येकाला राजकारणाची आवड व हौस असणें शक्य नाही. यशवंतरावांचें मोठेंपण त्यांच्या मुख्य मंत्रीपदांत नाही. त्यांची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे सामाजिक आचाराची एक घडी त्यांनी बसवून दिली आहे. आणि या दृष्टीने त्यांची आठवण चिरस्मरणीय ठेवली जाईल. शत्रूंशीं, मित्रांशीं, थोरांमोठयांशीं, विरोधकांशीं, वरिष्ठ पातळीवरील नेत्यांशीं, सहकाऱ्यांच्या बरोबर, अनुयायांबरोबर कसें वागावें यांचें मूर्तिमंत आदर्श उदाहरण म्हणजे यशवंतराव होत. मृदुता, निर्व्याजता, चारुता, ऋजुता, ही त्यांच्या स्वभावांत वारंवार आढळून येतात. कोमल मनोवृत्ति व मनाचा हळुवारपणाहि त्यांचे जवळ आहे. संयम व विवेकशीलतेचा असला दुसरा आदर्श सापडणार नाही. परंतु ते कोमल असले तरी दुबळ्या मनाचे नाहीत. तत्त्वाच्या बाबतींत तडजोड करणार नाहीत. स्वाभिमानाच्या बाबतींत ते कोणाला हार जाणार नाहीत. स्वाभिमानी वृत्ति असण्याच्या बाबतींत यशवंतराव म्हणजे महाराष्ट्राचें जिवंत व जातिवंत प्रतीक आहेत. महाराष्ट्राबद्दल जागता तळपता अभिमान त्यांच्या ठिकाणीं आहे. महाराष्ट्राबद्दल जातिवंत अभिमान आहे पण दुराभिमान नाही. रामदासांप्रमाणे ते तेजस्वी व स्वाभिमानी आहेत, तर तुकारामादि संतांच्याप्रमाणे अत्यंत नम्र, प्रांजळ, प्रेमळ आहेत. स्वाभिमान व नम्रता यांचें इतकें मधुर मीलन दुसऱ्या ठिकाणीं क्वचितच आढळेल. त्यांच्या आचरणांत त्यांची सहिष्णुता दिसून येते. प्रांजल, नम्र,

विनयशील, प्रेमळ, यशवंतराव म्हणजे भारतीय संस्कृतीचें एक प्रसन्न टवटवीत पुष्प आहेत. त्यांच्या वागण्यांतून, बोलण्यांतून सुसंस्कृतता व्यक्त झालेली दिसते. सत्तेचा कैफ, सत्तेची धुंदी, त्याच्यामुळे येणारी अहंमन्यता यांचा लवलेशही सापडत नाही. पराकोटीचा चांगुलपणा व भलेपणा यांच्या वर्तणुकीतून आढळतो. खेळकर व क्रीडाशील मनोवृत्ति असल्यामुळे सांचे-बंदपणा आढळून येत नाही. आणि त्यामुळेच राजकीय कार्य-कर्त्यांच्या इतकेंच कलावंतांशीं बोलतांना ते समरस झालेले दिसतात. आणि यशवंतरावांच्या बोलण्यांत प्रसन्न वृत्तीचा हृदयंगम विलास कलावंताला आढळून येतो. साधें घर चालवितांना कुटुंब-प्रमुखाला त्रास सोसावा लागतो. एखादी संस्था चालविणेंहि संस्थाचालकांना अवघड जाते. हरएक गोष्टींत मतभेद होतात, भांडणें विकोपाला जातात, हेतूंच्याविषयीं एकमेक एकमेकांवर आरोप करतात. साडेतीन कोटि जनतेचा बुद्धिवादी व डोळस महाराष्ट्राचा कारभार चालवावयाचा तोहि सर्वांना राजी राखून ! इतर घटक राज्यांच्या कारभाराच्या पार्श्वभूमीवर यशवंतरावांचें व्यक्तित्व उठून दिसतें. "बहुतांचीं अंतरें" राजी राखण्यांत ते यशस्वी झाले आहेत.

लोकसंग्रह करण्याच्या त्यांच्या चातुर्यामुळेहि ते यशस्वी झाले आहेत. असामान्य बुद्धिमान् माणसांचें सहकार्य मिळविण्यांत ते यशस्वी झाले आहेत. सर्वांना आपल्या विशाल व्यक्तिमत्वांत सामावून घेण्याची शक्ति व कुवत असेल तरच लोकसंग्रह करतां येतो. विखुरलेल्या फुलांत किंवा रत्नांत सौंदर्य दिसत नाही. त्या फुलांचा किंवा रत्नांचा हार केल्यावर त्या पुष्पहारांचें व रत्न-हारांचें सौंदर्य खुलून दिसतें. सर्व कार्यकर्त्यांची माळ ओवणें हें त्यांना सोपें झालें आहे. अकबराच्या किंवा विक्रमादित्याच्या नवरत्न दरबाराप्रमाणें त्यांच्या भोवतीं असंख्य गुणी माणसांचा वेढा दिसतो. याचें कारण ते नेहमी लोकाभिमुख राहिलेले आहेत.

परंतु वरील सर्व गुण असूनहि जर अपार परिश्रम करण्याची शक्ति नसेल तर परिश्रम वाया जातील. नेत्याच्या ठिकाणी आळस असून चालत नाही. अखंडपणे, अप्रतिहतपणे, अव्याहतपणे त्याला कार्यरत राहावें लागतें. दिवसांतून दहा दहा, पंधरा पंधरा सभा ते घेतात. सुरुवातीला कार्यकर्त्यांपुढे मार्ग-दर्शन, नंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमोर, थोडया वेळाने सरकारी अधिकाऱ्यांच्या समोर, कांही तासानंतर एखाद्या परि-षदेचें वा अधिवेशनाचें उद्‌घाटन, कोठे प्रकाशन, कोठे भूमिपूजन इत्यादि अनेक प्रसंगीं सारख्याच प्रसन्नतेने ते बोलतात. इतके श्रम करूनहि रात्रीं बारा वाजेपर्यंत विसावा नाहीं, विश्रांति नाही. मुलाखती, भेटी, सरकारी कामकाजाची माहिती घेणें व देणें, फायली पाहणें, तपासणी करणें इत्यादि असंख्य कामें उभीं असतात. ह्या गोष्टी न त्रासतां, न कुरकुरतां, न चिडतां मनाची प्रसन्नता न ढळूं देतां ते करत असतात. कारण कष्ट घेण्याची, श्रम करण्याची त्यांची तयारी असते. जनतेवरील अपार प्रेमामुळे ते हें सर्व करूं शकतात.

ते उत्कृष्ट राजकारणी व चतुर मुत्सद्दी आहेत. राज-कारणांत केवळ बुद्धिमान् असून चालत नाही. शक्ति व युक्ति या दोन्ही गोष्टी लागतात. बुद्धि व प्रतिभा यांचा चमत्कार दाख-विण्याऐवजीं बुद्धि व प्रतिभा कार्यान्वित करण्यासाठी त्यांचा जन्म आहे. परंतु प्रसिद्धीची त्यांनी कधी हाव धरली नाही. पुढे येण्यासाठी निष्कारण उलथापालथ केली नाही. नैसर्गिक विकास-क्रमाने घटना घडून याव्यात असें त्यांना वाटतें. अधिकारारूढ पक्षांतील नेत्याने कसें वागावें, त्याचें आचरण कसें असावें, त्याचें बोलणें कसें असावें याचा यशवंतरावांनी आदर्श घालून दिला आहे. शासन व राजसत्ता हीं लोकांच्या भल्यासाठी आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थानप्रत.

लोकांच्या कल्याणासाठी त्यांचा वापर केला पाहिजे हें सूत्र भावी सत्ताधाऱ्यांना त्यांनी घालून दिलें आहे. त्याचबरोबर राज–कारणी पुरुषाला व नेत्याला अत्यंत आवश्यक असलेला गुण म्हणजे लोकोत्तर निर्णय घेण्याची शक्ति होय. कांही पुढारी चंचल मनोवृत्तीचे असतात. त्यांच्या धोरणांत धरसोड असते. वागण्यांत चलबिचल असते. बोलण्यांत ठामपणा नसतो. उद्यां परिस्थितीला कोणती कलाटणी मिळणार आहे हें ते अगोदर जाणतात. भारतीय राजकारणांत वल्लभभाई पटेलांनंतर यशवंतरावांच्याजवळ असे निर्णय घेण्याची शक्ति दिसते.

त्यांच्या यशामध्ये प्रभावी वक्तृत्वाचाहि फार मोठा वाटा आहे. 'विचारांची निर्भयता' हें त्यांचें आगळें वैशिष्टच आहे. बोलण्यामध्ये साहसप्रियता, ओजस्विता व विद्वत्ता आढळून येते. त्याचप्रमाणे ते लढाऊवृत्तीचे आहेत. क्रीडांगण सोडून पळणारे ते नव्हेत. राजकारणांत संन्यस्तवृत्ति असावी पण संन्यास घेऊं नये व कर्मयोग्याप्रमाणे लढावें अशी त्यांची धारणा दिसते.

ईश्वरावर त्यांची श्रद्धा व निष्ठा दिसते पण ते कर्मठ नाहीत, किंवा नित्यनैमित्तिक धार्मिक कार्यांत गुंतत नाहीत. तीर्थांच्या ठिकाणीं मंदिरांत जाऊन परमेश्वराचें दर्शन घेणें, महत्त्वाच्या राज्यकारभार प्रसंगीं मुहूर्त पाहणें इत्यादि गोष्टी ते करतात. यामुळे लोकांना ते आपल्यांपैकी वाटतात. परमेश्वरावर विश्वास असल्यामुळे दुबळेपणा वाटत नाही. याच्या उलट अडचणींच्या प्रसंगीं मानसिक धैर्य निर्माण होतें.

त्यांच्या यशाचें आणखी एक कारण म्हणजे जीवनांत त्यांनी जोडलेले असंख्य मित्र. त्यांचा मित्रपरिवार खूप मोठा आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत त्यांचे मित्र आहेत. मित्रांच्या प्रोत्साहनामुळे बऱ्याच अडचणींच्या प्रसंगींहि ते नाउमेद झाले नाहीत. अडचणींच्या

वेळी साहाय्य करून मित्रांनाहि त्यांनी खचू दिलें नाही. मित्र-परिवार हें त्यांचें एक फार मोठें वैभव, ऐश्वर्य आहे, अर्थात तेहि मित्रांशी इमानीपणाने वागतात. आपल्या इमानाला व इभ्रतीला ते नेहमी जागतात. शाळेंत असतांना वल्लभभाई पटेलांच्या अटकेची बातमी वर्गातील फळ्यावर लिहिली गेली. शाळाधिकाऱ्यांनी त्याची चौकशी केली. कोणीहि नांव सांगितलें नाही. यशवंतरावांच्यासह सगळ्यांना दिवसभर उभे राहण्याची शिक्षा झाली. तसेंच आंदोलनाच्या काळांत रात्रीं ज्या मित्राबरोबर भित्तिपत्रकें चिटकवीत होते त्याच्या मागे पोलिसांचा ससेमिरा आहे हें कळतांच त्या मित्राला त्रास होऊं नये म्हणून ते स्वत: पोलीसाच्या स्वाधीन झाले. स्नेहशील मित्रांच्या सहवासामुळे त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचें मधुर व रम्य चांदणें दिसून येतें. संसारांतील व राजकारणांतील त्रासांवर मित्रांच्या सहवासाचा उतारा त्यांना उपकारक ठरतो.

आणि ह्या सगळ्या गुणाच्याबरोबर व त्यापेक्षाहि कदाचित् जास्त फायदा कशाचा झाला असेल तर त्यांच्या अभ्यासू वृत्तीचा. त्यांच्यामधील अभ्यासू, रसिक, सौंदर्यान्वेषी व विदग्ध सहृदयवृत्ति वजा केली तर त्यांच्यांतील बरेचसें आकर्षण कमी होईल. बऱ्याच नेत्यांतून राजकारण वजा केलें तर त्यांच्यांत खाली कांही शिल्लक राहत नाही. त्यांच्याजवळ जें शब्दभांडार दिसतें, त्यांचीं भाषणें जीं विचारपरिप्लुत दिसतात त्याकरितां त्यांनी पहिल्यापासून श्रम घेतले आहेत. १९३२ सालचा कारावास उलट त्यांना फायदेशीर ठरला. साथी एस्. एम्. जोशी, आचार्य भागवत, श्री. पटवर्धन अशा विचारवंत व्यक्तींचा सहवास त्यांना लाभला. त्यांच्याबरोबर वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्याची त्यांना संधि प्राप्त झाली. लहानपणीं प्रसंगीं मेळ्यांकरितां,

गणपति उत्सवांकरितां, प्रभातफेऱ्यांसाठी कांही कवनें करीत असत. त्यांच्या कवीमनाने त्यांच्या जीवनांत नीरसता येऊं दिली नाही. राजकारणाच्या धकाधकींत, धावपळींत त्यांनी आपल्या बुद्धीवर गंज चढू दिला नाही. नित्य नवीन नवीन इंग्रजी व मराठी भाषेंतील उत्तम ग्रंथ घेऊन त्यांचें तें परिशीलन, मनन व चिंतन करीत असतात. राजकारणाच्या, कामाच्या ढिगाऱ्यांतून वेळ काढून, नवीन कल्पना, नवीन प्रमेयें, ग्रंथांतील नवीन विचार आत्मसात करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो. अभ्यासू वृत्तीच्या व्यक्तीलाच संकुचितता स्पर्श करत नाही. रॉय, ब्रिटिश फेबियन समाजवादी लेखक, स्टॅफर्ड क्रिप्स सारख्या मजूर पक्षांतील पुढाऱ्यांचीं पत्रकें, नेहरू, म. फुले, म. गांधी, रसेल इत्यादि व्यक्तींच्या लेखनाचा, विचारांचा व तत्त्वज्ञानांचा त्यांच्या विचारसरणीवर खोल ठसा उमटलेला आहे. त्यांच्या विचार-सरणीचा त्यांच्या जीवनावर गाढ प्रभाव पडला आहे. रॉय, पं. नेहरू, म. गांधी इ. थोर पुरुषांच्या तत्त्वज्ञानाने त्यांच्या ध्येयाची ज्योत तेवत ठेवली आहे. जिज्ञासू प्रवृत्तीने ते अखंड वाचन करतात व त्याची आत्मविकासाला मदत होते. उच्च व थोर विचारांचे ते नेहमी स्वागत करीत असतात. जीवनाला खरें तेज यावयाचें असेल, जर खरा अर्थ प्राप्त व्हावयाचा असेल तर माणसाने आजन्म विद्यार्थ्याची भूमिका घेतली पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे. पुरवठा, स्थानिक-स्वराज्यादि खात्यांची जबाबदारी अंगावर असतांना त्या विषयांबाबत इतर देशांतील वाङमय-वाचन त्यांनी आवर्जून केलें. ज्ञानाइतका आनंद नाही व ज्ञानाइतकें पवित्र दुसरें नाही हें त्यांना पटलें आहे. नुसतें ग्रंथांचें वाचन नव्हे तर इतरांच्या अनुभवाचाहि ते फायदा घेत असतात. त्यांचे विचार समजावून घेण्याचा प्रयत्न करतात. एकमेकांना सापडलेल्या

सत्याचा अंश, अनुभवाचा अंश एकमेकांना देण्यांत लोकशाहीचें यश आहे हें त्यांनी आपल्या कृतींनी दाखवून दिलें आहे. त्यांचें मन रसिकाचें, कवीचें असल्यामुळे देशाच्या भावी प्रगतीचीं रम्य चित्रें रंगवतांना ते आढळून येतात. त्यांच्या सहृदय स्वभावामुळे माणुसकीला ते पारखे झाले नाहीत.

वेगवेगळ्या व्यक्तींचे विचार व अनुभव ते जरी जाणून घेत असले तरी ते कोणत्याहि एका विशिष्ट तत्त्वप्रणालीचे ठोकळेबाज प्रचारक नाहीत. त्यांच्या विचारांत पंथवेडेपणा दिसत नाही. तत्त्वाच्या निर्जीव शृंखलांत ते स्वत:ला अडकवून घेत नाहीत. सर्वांचा तुलनात्मक अभ्यास करून विविधतेंतून ते एकता निर्माण करतील. सर्वांचें ऐकून घेतील पण शेवटीं स्वतंत्र बुद्धीने निर्णय घेतील.

त्यांच्या यशस्वितेचें आणखी एक कारण म्हणजे लोकांचें त्यांच्यावर असलेलें प्रेम. प्रेम दिलें तर प्रेम मिळतें. सर्वांच्यावर केलेलें प्रेम हें त्यांच्या यशाचें, लौकिकाचें साधन आहे. त्याचबरोबर अनेक गोष्टींचें अखंड स्मरण ते सतत ठेवतात. मुख्यमंत्रीपदांवर असलेल्या व्यक्तीला चौफेर लक्ष पुरवावें लागतें.

त्यांना टीकाकार आहेत. त्यांतील कांहींचा ते पक्षांध नाहीत म्हणून राग आहे. कांहींचा ते विरोधकांशीं खेळीमेळीने वागतात म्हणून राग आहे. तर कांहींचा ते जातीय भावनेने वागत नाहीत म्हणून राग आहे. आणि सर्वांत म्हणजे कांहींचा ते फार गोड बोलतात त्यामुळे जनतेवर आपली छाप कमी पडते म्हणून राग आहे. पण ह्या सर्व गोष्टी करून टीकाकारांना समाधानी करण्यास यशवंतराव समर्थ आहेत.

यशवंतरावांचें मोठेपण त्यांच्या बुद्धिमत्तेंत नाही, त्यांच्या मुख्यमंत्रीपदांत नाही, त्यांच्या नेतेपणांत नाही, त्यांच्या लोक-प्रियतेंत नाही, तर त्यांचें मोठेपण त्यांनी कमावलेल्या मनांत आहे. यश, अपयश, जय, विजय, निंदा, स्तुति इत्यादि सर्व प्रसंगांतून विकसित झालेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वांत आहे. त्याचप्रमाणे त्यांनी समाजाला घालून दिलेल्या आचारपद्धतींत आहे. आणि याशिवाय त्यांचें मोठेपण तत्त्वज्ञान व व्यवहार यांची सांगड घालण्यांत आहे. तत्त्वज्ञान व व्यवहार यांची सांगड घालणारे ते महापुरुष होत. आजच्या युगांत माणसाचा, तत्त्वज्ञानावरचा, मानवी मूल्यावरचा, चांगुलपणावरचा विश्वास उडूं लागला आहे. तत्त्वज्ञानी माणसें जग सोडून चार भिंतीच्या आंत तत्त्वज्ञानाचा काथ्याकूट करीत बसतात. किंवा केवळ चिंतन करतात व सृष्टीची गाढ प्रमेयें उकलण्याचा प्रयत्न करतात. व्यवहारी माणसें रु. आणे पैच्या नादांवर धावत असतात. यशवंतरावांनी आपल्याला प्रत्यक्ष जगांत वावरावयाचें आहे. माणसांशीं बोलावयाचें आहे, त्यांच्यातील उणीवा जाणून घेऊन काम करावयाचें आहे, त्यांच्या चांगुल-पणाला, साधुत्वाला मर्यादा आहे, ह्या गोष्टी जाणल्या आहेत. त्याचबरोबर सामान्य माणूस बऱ्याच गोष्टी करण्यांत अपुरा ठरतो, कांही गोष्टी त्याच्या पचनीं पडत नाहीत, परंतु जर सामान्य माणसाला त्याच्या शक्तीची जाणीव करून दिली, त्याला सहकार्य दिलें, उत्तेजन दिलें तर तो मोठीं कामेंसुद्धा पार पाडतो हें त्यांनी अनुभविलें आहे आणि म्हणूनच हजारों छोटीं मोठीं माणसें त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांत कामाला लावलीं आहेत.

साऱ्यांना ते नवा मंत्र देत आहेत. नव्या संस्कृतीकडे नेत आहेत, सेवेचा, कर्माचा नवीन धर्म शिकवीत आहेत. स्वतःचें जीवन त्यांनी यशस्वी केलें आहे. त्याचप्रमाणे लोकहिताचें लोक-

जागृतीचें त्यांचें काम अखंड चालू आहे. समस्त जनतेचे संसार सुंदर व मधुर करतील अशी आशा आहे.

## ९

" मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा।"

बऱ्याचवेळीं ठराविक पार्श्वभूमीवर, विविक्षित परिस्थितींत विशिष्ट गुणांनी युक्त असलेल्या व्यक्तीची आवश्यकता भासावी व दैवयोगाने म्हणा किंवा योगायोगाने म्हणा अशीच व्यक्ती नेमकी पुढे यावी अशी विधिरचना दिसते.

सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत अगतिकता होती. सारा समाज निःसत्त्व झाला होता. परधर्मीय राज्यशासकांमुळे हिंदु समाजाला दैन्यावस्था प्राप्त झाली होती. महागाई वाढली होती, पदार्थ मिळेनासे झाले, लोकांनी ग्रामत्याग करावयास सुरुवात केली. गावेंच्या गावें ओस पडलीं, कित्येक परधर्मांत जाऊन भ्रष्ट झाले, कित्येक कुलवान् स्त्रियांची अब्रू जाऊं लागली, जिकडे तिकडे बेबंदशाही माजली. कुटुंबें विस्कळित झालीं. लोक कंगाल झाले, माणसांस खावयास अन्न नव्हतें, राहवयास झोपड्याहि नव्हत्या. सत्याचा धर्माचा लोप होऊं लागला, पुण्यक्षेत्रें मोडून गेलीं, ज्ञानाचा विचार लोपला, भक्तिभावाचा लोप झाला, तीर्थक्षेत्रें मोडून पडलीं, नाना मतें निर्माण झालीं, लोक प्रवाहपतित झाले, भूतादेवतांचें थोतांड माजलें, शास्त्रांचा बाजार भरला, असल्याचा अभिमान बळावला, कर्ता कोणीच दिसेना, सारेच करंटे ! जिकडे तिकडे निस्तेजता, अवकळा, लाचारी, दैन्य !! अशा अंधारमय स्थितींत एक तेजस्वी किरण दिसला. ज्याचें जीवित आठवून जीवित तृणवत् मानावें अशा श्रेष्ट, महाप्रतापी, व्यक्तीचा, श्री छत्रपति शिवाजी महाराजांचा उदय झाला.

राष्ट्रीयसभेच्या स्थापनेनंतर मवाळ पुढाऱ्यांच्या ठरावाने चर्चेने, अधिवेशनाने विशेष कांही उपयोग होत नाही असें पाहतांच जनता निराश झाली, अशा वेळीं जहाल विचारांची आवश्यकता होती. निश्चयाचा व निर्भयतेचा महामेरू असलेल्या लो. टिळकांचा जन्म झाला.

त्यांच्यानंतर चळवळ एकदम थंडावली. प्रेस अॅक्ट निघाले, बरेचसे पुढारी तुरुंगांत अडकले. अशावेळीं म. गांधी पुढे आले, जनतेला त्यांनी पुढे नेले. देशाला स्वातंत्र्य मिळालें.

लो. टिळकानंतर महाराष्ट्र निर्नायकी झाला. 'करंटे मिळाले सर्व । जो तो बुद्धीच सांगतो' अशी महाराष्ट्रांत अवस्था आली. स्वार्थत्यागाची अखंड तयारी असलेला, देशभक्तीने भारलेला, बुद्धीची प्रचंड झेप असलेला महाराष्ट्र औद्योगिक विकासाच्याबाबतींत मागे राहूं लागला. सर्व महाराष्ट्रांतील लोकांचें मन जिंकणारा सर्वांचीं हृदयें काबीज करणारा, महाराष्ट्राचा आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास साधू शकणारा नेता हवा होता. यशवंतराव पुढे आले व महाराष्ट्राच्या नेतृत्वाचा प्रश्न सुटला.

संयुक्त महाराष्ट्र झाला. पण तो संपन्न व संतुष्ट कसा होईल तें पाहिलें पाहिजे. सर्व मराठ्यांना- महाराष्ट्रांतील राहणाऱ्या सर्वांना-एकत्र आणून, महाराष्ट्र वाढवला पाहिजे. भारतांतील पहिल्या प्रतीचें मुंबई शहर महाराष्ट्रांत आहे. मुंबईच्या प्रगतीमुळे महाराष्ट्राची प्रगती डोळ्यांमध्यें भरते. परंतु हीं प्रगती मुंबई व त्याच्या आसपासच झालेली आहे. मुंबई व महाराष्ट्रांतील इतर ८-१० शहरें सोडलीं तर औद्योगिक दृष्टया महाराष्ट्र हा मागासलेलाच आहे असें म्हणावें लागेल.

महाराष्ट्र समृद्ध व संपन्न व्हावयास हवा असेल तर भावनात्मक ऐक्य प्रथम साधलें पाहिजे. एकसंध, एकजिनसी

मराठी मन तयार केलें पाहिजे. प्रादेशिक ऐक्याचा प्रश्न केवळ कायदा व करार ह्याने सुटणार नाही. महाराष्ट्राचे आर्थिक व सामाजिक प्रश्न एकजुटीच्या प्रयत्नाने, सामुहिक प्रयत्नाने सोडविले पाहिजेत. प्रत्येकाने आपलें बुद्धिवैभव, आपले प्रयत्न नवीन महाराष्ट्राच्या रचनेकरितां, उभारणीकरितां खर्ची लावले पाहिजे.

नवमहाराष्ट्रांकरितां, सर्व धर्माच्या, जातींच्या व भाषांच्या लोकांनी एकत्र यावें, आपली जात, पात, भाषा विसरावी, भेद सोडून द्यावेत, भांडणें विसरावीत, छोटीं मोठीं किल्मिषें टाकून द्यावीत, हेवा, मत्सर, द्वेष यांना रोखणारीं सारीं बंधनें तोडावीत, आळसाची व रिकामपणाची संवय सोडावी, अकारण वाद घालणाऱ्या वृत्तीचा तिरस्कार करावा, भेदनीति शिकविणाऱ्या माणसाला बाजूला सारावें, वैफल्य, निराशा, अनुत्साह यांना थारा देऊं नये व महाराष्ट्रांतील तरुणांनी निर्धाराने व निश्चयाने, जोमाने, उत्साहाने राष्ट्रबांधणीकरितां पुढे यावें असा यशवंत-रावांचा सारखा आग्रह चालू असतो.

प्रत्येकाने शिक्षण घेतलें, प्रत्येकांत स्वतःची उन्नति करून घेण्याची बुद्धि निर्माण झाली, कष्ट करण्याची व सामुदायिक कार्यांत परस्पर सहकार्याने काम करीत राहण्याची तयारी झाली तर महाराष्ट्राचा नवा इतिहास घडावयास वेळ लागणार नाही अशी त्यांची श्रद्धा आहे.

सर्वांगीण विकास घडविण्याकरितां वैयक्तिक नेतृत्वांपेक्षा कार्यक्रमाधिष्ठित नेतृत्व आवश्यक आहे असें त्यांचें मत आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांप्रमाणे प्रत्येक क्षेत्रांत तळमळीने व कळ-कळीने काम करणारीं मंडळी हवीत अशी त्यांची कल्पना आहे.

औद्योगिक क्षेत्रांत काम करावयाचें म्हटलें तर कुशल तंत्रज्ञ व विशिष्ट कसब अवगत असलेल्या युवकांनी साहसाने व ध्येय–वादाने पुढे आले पाहिजे. धडाडी, उत्साह असलेली वेगवेगळी मंडळी सहकारी साखर कारखान्यांसाठी व इतर छोटे मोठे साखर कारखाने चालविण्यासाठी एकोप्याने पुढे आली पाहिजेत. सहकारी शेती, छोटे धंदे, कुटीर उद्योग, शिक्षण इत्यादि जीवनाच्या सर्व क्षेत्रांत अशीं कष्ट घेणारीं, परिश्रम करणारीं उद्यमशील असलेलीं, मिळून मिसळून काम करणारीं प्रामाणिक माणसें व कार्यकर्ते तयार करणें हा सुद्धा यशवंतरावांच्या कार्यक्रमाधिष्ठित नेतृत्वाचा एक भाग आहे. वेगवेगळ्या विचारांचे, वेगवेगळ्या पक्षांतील कार्यकर्ते एकत्र येणें व त्यांनी आपले मतभेद विसरून काम करून योजना यशस्वी करून दाखविणें हें सोपें नाही. ही कल्पना जरी भव्य असली तरी त्यांतील अडचणींची त्यांना जाणीव आहे. परंतु हें काम जमलें तर त्यांच्याचसारख्या समंजस, वास्तव–वादी दृष्टिकोन असलेल्या, गोडीगुलाबीने लोकांमध्ये काम करणाऱ्या नेत्याला जमूं शकेल.

लोकशाहीवर, सामान्य, छोटया, मोठया कार्यकर्त्यांच्या कर्तबगारीवर व कर्तृत्वांवर त्यांचा विश्वास आहे. महाराष्ट्र सुधारावयाचा असेल तर तो पांच–पंचवीस शहरांतील कार्य–कर्त्यांच्या कामामुळे सुधारणार नाही तर त्याकरितां लहानमोठया खेडयांतून विखुरलेले प्रामाणिक कार्यकर्ते हुडकून, त्यांच्यावर विश्वास टाकून, त्यांना दिलासा देऊन, त्यांना सहकार्य देऊन पुढे आणले तर संयुक्त महाराष्ट्र संपन्न, संतुष्ट व समृद्ध होईल अशी त्यांची भावना आहे. वेगवेगळ्या कार्यक्रमावर वेगवेगळें नेतृत्व उभें केलें पाहिजे. आर्थिक क्षेत्राच्या बाबतींत श्री. धनंजयराव गाडगीळ व श्री. आ. रा. भट, शैक्षणिक क्षेत्रांत श्री. गोवर्धन

पारिख, वैधानिक व राजनैतिक कार्यांत श्री. बाळासाहेब भारदे, श्री. विठ्ठलराव पागे, सांस्कृतिक क्षेत्रांत श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, संघटनेच्या कार्यांत श्री. खेडकर, श्री. राजेसाहेब निंबाळकर, श्री. राजारामबापू पाटील, श्री. किसन वीर, श्री. यशवंतराव पार्लेकर, श्री. सणस, कामगार क्षेत्रांत श्री. तुषार पवार, युवक संघटनेच्या दृष्टीने श्री. चंद्रहार पाटील, साखर कारखान्याचे दृष्टीने श्री. वसंतराव पाटील, श्री. चारुभाई शहा, अल्पबचत मोहिमेंत श्री. विठ्ठलराव जगताप, विकासकार्याच्या क्षेत्रांत श्री. दादासाहेब जगताप, बॅ. जी. डी. पाटील इत्यादि वेगवेगळ्या क्षेत्रांत वेगवेगळीं माणसें त्यांना सहकार्य देत आहेत आणि महाराष्ट्राच्या विकास कार्याकरितां नवीं नवीं माणसें शोधण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीने महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला आता आव्हान मिळालेलें आहे. जनतेच्या सुबद्धतेवर, श्रमशीलतेवर, सहकार्य-प्रवणतेवर, उद्यमशीलतेवर महाराष्ट्राचें व पर्यायानें भारताचें भाग्य अवलंबून आहे. भारतीय राजकारणावर महाराष्ट्राची छाप पडावयाची असेल तर महाराष्ट्राने कारखानदारीवर व उद्योगधंद्यावर आपलें लक्ष केंद्रित केलें पाहिजे. व्यापाराची व उद्धोगधंद्याची कास धरली पाहिजे. धनोत्पादनाचीं साधनें जास्तींत जास्त निर्मिलीं पाहिजेत, उत्पादनाचा वेग वाढविला पाहिजे याबद्दल आता कोणाचेंहि दुमत असणार नाही. मराठी माणसाने जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आमूलाग्र बदलला पाहिजे याबाबत ते अगदी पोटतिडकीने व तळमळीने बोलत असतात. पेशवाई बुडाली. ब्रिटिशांचें राज्य भारतांत आलें. ब्रिटिश राजसत्ता बळकट करण्यास इंग्रजी शिक्षण दिलें पाहिजे हें मेकॉले याने ओळखलें. इंग्रजी शिकून नोकऱ्या करण्याचा मोह

सर्वसामान्य लोकांना होऊं लागला. बुद्धिमान् माणसेंसुद्धा नोकरीच्या सोनेरी पिंजऱ्यांत अडकूं लागलीं. भारतामध्ये ह्या सर्व गोष्टींचा सर्वांत अनिष्ट परिणाम महाराष्ट्रांत झाला. नोकरीपेशा हाच आमच्या मनोवृत्तीला, पिंडाला अनुकूल आहे; तो आमचा स्थायीभाव आहे अशी गैरसमजूत महाराष्ट्रांतील लोकांनी करून घेतली.

यशवंतरावांनी ठिकठिकाणीं या प्रवृत्तीवर कोरडे ओढले आहेत. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या आड हीच पराभूत मनोवृत्ती येते व तिचा आपण पराभव केला पाहिजे. हें ते सारखे आर्जवून सांगत असतात. आपण स्वतःच्या हिंमतीवर, स्वतंत्र कर्तृत्वावर नवा धंदा, स्वतंत्र उद्योग, नवा कारखाना काढूं शकणार नाही; आपलें तें काम नव्हे ही असहाय्यता व अगतिकता सोडून दिली पाहिजे. बाजारांत खपण्यासारखे माझ्या हातांनी मी कांही तरी बनवेन व विकेन हा उत्पादनाचा धर्म प्रत्येकाने डोळ्यांपुढे ठेवला पाहिजे व या वृत्तीचा अंगिकार केला पाहिजे. ह्याचा त्यांनी पुनः पुन्हा पुरस्कार केला पाहिजे. यशवंतरावांचे वैशिष्टय हें की, ह्याची सुरवात कोठून करावी हें त्यांनी जाणलें आहे. ह्या पराभूत मनोवृत्तीचा पराभव करण्याकरतां माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाचा दृष्टिकोनच बदलला पाहिजे. तेथेच उद्यमशीलतेचे, सहकार्य–प्रवणतेचे, दीर्घोद्योग करण्याचे संस्कार होऊं शकतील. तरुण पिढीच्या मनांत नवीन निर्माण करण्याची जिद्द तेथेच निर्माण होऊं शकेल हें त्यांनी द्रष्टेपणाने जाणलें आहे.

महाराष्ट्रांत सर्वच भाग एकसारखे विकसित नाहीत. अशा अविकसित भागांच्या उन्नतीबाबत यशवंतरावांनी आस्था–पूर्वक सहानुभूतीचें धोरण स्वीकारलें आहे. विदर्भ व मराठवाडा

नों. दि.

यांच्यामध्ये व इतर उर्वरित महाराष्ट्रांतील भागांमध्ये समरसता निर्माण व्हावी, एकसंधपणा, एकजिनसीपणा, एकात्मकता निर्माण व्हावी, सामंजस्य निर्माण व्हावें यासाठी यशवंतरावांचे प्रयत्न डोळ्यांत भरतात. प्रत्येक भाग स्वावलंबी व्हावा त्याच्यांत अस्मिता राहवी असा त्यांचा प्रयत्न चालू आहे. त्याचबरोबर अविकसित भागाला जादा मदत, अधिक सहाय्य देतांना उपकारकर्त्याची, मेहेरबानीची भावना असूं नये हाहि त्यांचा आग्रह आहे. ते विदर्भ–मराठवाड्यांतील जनतेच्या भावना समजून घेत आहेत, त्यांचे प्रश्न जाणून घेत आहेत, त्यांच्या समस्यांची सोडवणूक कशी करतां येईल याचें चिंतन करीत आहेत. त्यांच्या व विदर्भ–मराठवाड्यांतील जनतेमध्ये एकोपा, स्नेहभाव व प्रेम निर्माण झालें आहे.

येथून पुढे प्रत्येक गोष्टींत सरकारी यंत्रणेवर अवलंबून चालणार नाही. सरकारी यंत्रणेकडून मार्गदर्शन व तांत्रिक साहाय्य, सल्ला याचीच अपेक्षा केली पाहिजे. कारण शेवटीं सारीं कामें जनशक्तीकडूनच होणार आहेत. जागृत जनतेशिवाय विकासाचीं कामें होणार नाहीत, विकासाच्या कामाला वेग येणार नाही. जनता जागृत केल्याशिवाय इतर सारीं कामें व्यर्थ होत. जनतेच्या साऱ्या गुणांचें आता प्रभावी शक्तींत रूपांतर झालें पाहिजे. जनतेच्या शक्तीचें पाणी वेगवेगळ्या पाटांनीं, काल्व्यांनी नेऊन महाराष्ट्राच्या विकासाची जमीन भिजवली पाहिजे.

भारतांतील शें. ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे कोणत्याहि राज्याचा विकास साधावयाचा असेल तर शेतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यशवंतराव शेतीवरील संपूर्ण मालकी काढून घेण्याच्या विरुद्ध आहेत. शेतकरी हा

अशिक्षित असल्याने धान्य पेरण्यापासून धान्य विकण्यापर्यंतचीं सारीं कामें तो यशस्वीपणाने हाताळूं शकत नाही. येथे सहकारी सोसायटचा काम करूं शकतील व याकरितां सोसायटचांवर भर दिला पाहिजे. शेतीच्या दृष्टीने कोयनेची वीज ग्रामीण भागांत खेळवून कोरडवाहू जमिनींचा प्रश्न सोडवितां येईल. महाराष्ट्रांत खेडोंपाडीं वीज खेळवून छोटे छोटे धंदे उर्जितावस्थेस आणतां येतील.

आज आपणांसमोर डोंगराएवढालीं कामें उभीं आहेत. सामाजिक व आर्थिक विषमता नाहीशीं करावयाची आहे. रोग, दारिद्रय, बेकारी यांपासून समाजाला मुक्त करावयाचे आहे; समाजाची काळजी, चिंता घालवावयाची आहे; सर्वांना समान न्याय, समान संधि उपलब्ध होईल अशी व्यवस्था निर्माण करावयाची आहे, लोकांची अस्मिता जागृत व जिवंत ठेवावयाची आहे, स्वावलंबी वृत्तीचें संवर्धन करावयाचें आहे, जातीजमातींतील घातक स्पर्धेला आळा घालावयाचा आहे. एकजिनसी समाज-जीवन निर्माण करावयाचें. थोडक्यांत सर्वांगीण विकास साधावयाचा आहे. हें प्रचंड काम हिमालयासारखें आहे. याकरितां भगिरथ प्रयत्नांची, निग्रहीवृत्तीची आवश्यकता आहे. साऱ्या भारताला विशेषतः महाराष्ट्राला येणारीं पांच-दहा वर्षें त्यांचें नेतृत्व लाभलें तरच परिस्थितींत सुंदर कायापालट होईल व महाराष्ट्राची मान उंचावलेली आढळून येईल.

## १०

"मनुष्य राजीं राखणें । हींच भाग्याचीं लक्षणें।"

द्विभाषिकाच्या प्रयोगापासून महाराष्ट्रांतील वेगवेगळ्या थरांतील लोक त्यांच्याकडे आकृष्ट झाले. त्यांच्याबद्दलचा गैरसमज निवळूं लागला. सुबद्ध तरुण वर्ग त्यांच्या विचारांचें मनन

करूं लागला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्यावेळीं, कॉंग्रेसची प्रतिष्ठा कमी होत असल्याचीं चिन्हें दिसत असतांना, कॉंग्रेसला धक्का देऊन पाडण्याची भाषा केली जात असतांना, यशवंतरावांवर टीका होत असतांना, केवळ यशवंतरावांचें व्यक्तित्व ओळखून सातारा जिल्ह्यांतील तडफदार, तरुण, पट्टीचे वक्ते असलेले श्री. चंद्रहार पाटील यांनी यशवंतरावांचें अनुयायित्व पत्करिलें. द्विभाषिकाचा प्रयोग चालू असतांनाच श्री. रावसाहेब पटवर्धन, श्री. आप्पासाहेब पटवर्धन, श्री. आचार्य भिसे इत्यादि सर्वोदयी नेत्यांनी यशवंतरावांच्या कारभार कुशलतेची प्रशंसा केली. श्री. कन्हैयालाल मुनशी त्यांच्या प्रशासनाच्या कौशल्याबद्दल बेहद्द खूष झाले. संयुक्त महाराष्ट्र मिळाल्यावर प्रा. राम जोशी, श्री. प्रभाकर पाध्ये यांच्यासारख्या विचारवंतांनी त्यांच्या कार्याचें, कार्यपद्धतीचें समालोचन केलें व त्यांच्या उज्वल भवितव्याची ग्वाही दिली. श्री. जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या आदरणीय नेत्याने, कोणतीहि ऐहिक सुखाची आशा नसलेले, केवळ दुसऱ्यांकरतां जगणाऱ्या संत विनोबासारख्या सर्वोदयी नेत्याने यशवंतरावांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केलें. पं. नेहरूंनी व इंदिरा गांधी यांनी वरचेवर त्यांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केलें. महाराष्ट्रांत विरोधी पक्षाचे पुढारी श्री. एस्. एम. जोशी यांनी यशवंतरावांशीं सद्भावनेचें, स्नेहाचें वर्तन ठेवलें. त्यांच्या प्रामाणिक विचाराबद्दल त्यांनी विश्वास व्यक्त ठेवला. श्री. शि. ल. करंदीकर यांच्यासारखी बुद्धिमान, व्युत्पन्न, समाज-जीवनाचा दीर्घ अभ्यास असलेली व्यक्ति केवळ यशवंतरावांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राचें कल्याण होणार आहे म्हणून कॉंग्रेसमध्ये आली. बहुजनसमाजाच्या विश्वासास प्राप्त असलेले, त्यागी, राजकारणाचा दीर्घ अनुभव असलेले शे. का. पक्षांतील पुढारी

श्री. तुळशीदास जाधव, श्री. माधवराव बागल, श्री. यशवंतराव मोहिते, कायद्याचा दीर्घ व्यासंग असलेले खासदार श्री आनंदराव जाधव, वाई तालुक्यांतील श्री. दादासाहेब जगताप, प्रजासमाज–वादी पक्षांतील तडफदार, तरुण, अभ्यासू श्री. शिवाजीराव काळे, श्री. हरुण अन्सारी, कम्युनिस्ट पक्षांतील अभ्यासु कार्यकर्ते श्री. तुषार पवार इत्यादि वेगवेगळ्या पक्षांतील लोक यशवंतरावांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून, काँग्रेसचा कार्यक्रम पुरोगामी व लोकाभिमुख आहे हें ओळखून काँग्रेसमध्ये दाखल झाले. विदर्भमराठवाड्यांतील श्री. आबासाहेब खेडकर, श्री. कन्नमवार, श्री. सवनेकर, मधुसुदन वैराळे, श्री. नरेंद्र तिडके इत्यादि मंडळी यशवंतरावांच्या पाठीशीं उभीं राहिलीं. केंद्रिय मंत्री श्री. स. का. पाटील, श्री. मेनन यांनीहि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल प्रशंसा केली.

लोकसत्ता, तरुणभारत, विशाल सह्याद्रि, नवशक्ति इत्यादि दैनिकांनी त्यांच्या कार्याचें महत्त्व, त्यांचे विचार इत्यादि गोष्टींचें लोण जनतेपर्यंत नेऊन पोहोचविलें. विशेषतः पुणें येथे निघणाऱ्या 'तरुण भारत' या वर्तमानपत्राने यशवंतरावांचें विचार समजा-पर्यंत पोहोचविण्याची जितकी खटपट केली व पर्यायाने संयुक्त महाराष्ट्राची सेवा केली इतकी कोणीहि केली नसेल. महाराष्ट्रामध्ये समतोल व समंजस वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने या पत्राने खूपच कामगिरी केली. 'ब्लिट्झ्' सारख्या साप्ताहिकाने १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनीं यशवंतरावांवर खास अंक काढून त्यांचा गौरव केला. त्याचप्रमाणे देशांतील कांही इंग्रजी पत्रांनी तसेच लंडनमधील कांही पत्रांनी त्यांच्याकडून खूप अपेक्षा केल्या आहेत.

अर्थात् कॉंग्रेस पक्षांत आल्यानेच यशवंतरावांच्या कार्या-वरचा विश्वास सिद्ध होऊं शकतो असें नाही. यशवंतरावांबद्दल वैयक्तिक आदर असलेले श्री. दत्ता देशमुख, बॅ. नाथ पै, श्री. नानासाहेब गोरे, त्याचप्रमाणे जनसंघ, रिपब्लिकन इत्यादि विरोधी पक्षांतील खूप कार्यकर्ते आहेत. हें युग लोकशाहीचें आहे. सगळेच लोक एका पक्षांत यावेत अशी अपेक्षा करणें रास्त होणार नाही. ज्यांचे विचार, मूलभूत भावना वेगळ्या असतील त्यांनी इतर पक्षांत असणें कांहीच अयोग्य नाही.

महाराष्ट्रांतील नव्हे तर अखिल भारतांतील जनतेच्या त्यांच्याबद्दल अपेक्षा वाढल्या आहेत. ते आता केवळ महाराष्ट्राचे नेते म्हणून राहिले नाहीत. भारतांतील सर्व श्रेष्ठ नेत्यांमध्ये त्यांची गणना होऊं लागली आहे. प्रांतीयतेचें कुंपण त्यांच्या व्यक्तित्वाला चिकटलेलें नाही. आपण भारतांतील आहोंत व भारतासाठी आपला जन्म आहे अशी प्रत्येक व्यक्तीची धारणा असली पाहिजे असें त्यांचें मत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून तेरा वर्षें होऊन गेलीं. तेरा वर्षांच्या मानाने कांही गोष्टींत भारताने निश्चित प्रगति केली आहे. तरी बरेच प्रश्न अजून अनिर्णित आहेत. दररोज नव्या समस्या निर्माण होत आहेत. चीनच्या आक्रमणासारखा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा वेळीं प्रागतिक धोरण असलेल्या, कोणताहि पूर्वग्रह नसलेल्या, स्वातंत्र्यपूर्व कालां-पासून आजपर्यंतचीं सर्व राष्ट्रीय आंदोलनें अनुभवलेल्या, संकुचित विचार नसलेल्या, स्वतःची ठाम व निश्चित मतें असलेल्या, समाजवादी विचारसरणी असलेल्या नेतृत्वाची भारताला आवश्यकता आहे. यशवंतरावांच्या नेतृत्वामुळे भारतीय जनतेला आशा वाटावयास लागली आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी अखिल

भारतीय काँग्रेसचे त्यांना खजिनदार नेमून वरिष्ठ नेत्यांनी, काँग्रेस वर्किंग कमिटीवर त्यांची निवड करून ए. आय. सी. सी. च्या सभासदांनी, त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. भारताचें नेतृत्व महाराष्ट्र करेल असा राजेंद्रप्रसादांनीहि विश्वास व्यक्त केला आहे. पं. नेहरूंच्याबद्दल तर बोलावयासच नको, त्यांचे लक्ष तर यशवंतरावांकडेच लागलें आहे.

महादजी शिंद्यांनी दिल्ली दिपवून सोडली होती, पहिल्या बाजीरावांनी आपलें लक्ष दिल्लीवर केंद्रित केलें होतें, राघोबांनी अटकेपार झेंडे फडकाविले होते. लोकमान्य टिळकांनी आपल्या सिंहगर्जनेने व अद्‌भुत पराक्रमाने ब्रिटिशांकडून 'हिंदी असंतोषाचे जनक' म्हणून पदवी प्राप्त करून घेतली होती आता यशवंतरावांची खेप आहे. नवा इतिहास घडविण्याची व काळाचा ओघ बदलण्याची त्यांच्यांत जिद्द आहे, धमक आहे. नवीन युगाला, नवीन पिढीला नवा विचार, नवा मंत्र देणारा पुढारी लागतो. भारतांमध्ये काँग्रेसपक्षांत किंवा विरोधी पक्षांत ह्या सर्व गुणांनी युक्त असलेला, लोकशाही विचारांवर अढळ निष्ठा असलेला, समाजवादावर श्रद्धा असलेला असा पं. नेहरू सोडून यशवंतरावांच्याशिवाय दुसरा नेता नाही. नव्या पिढीला व जुन्या पिढीला सांधणारा एक महत्त्वाचा दुवा म्हणून त्यांचें कार्य महत्त्वाचें ठरणार आहे. परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो ही ईश्वरचरणीं प्रार्थना !

मराठी ग्रंथ सं[illegible]